CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शनिवार, दि. २४ जानेवारी २०२६ | वर्ष – ३२ | अंक २८८ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## मुंबईच्या महापौरपदासाठी शीतल गंभीर देसाई यांचे नाव आघाडीवर

**त.भा. वृत्तसेवा,**
**मुंबई, २३ जानेवारी :** मुंबई महापालिकेचं महापौरपद सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी राखीव झालेलं आहे. भाजपकडे असलेलं संख्याबळ पाहता त्यांनी हे पद शिंदसेनेला सोडण्यास नकार दिला आहे. बाळासाहेब ठाकरे यांचं जन्मशताब्दी वर्ष असल्यानं या वर्षात महापौर आपल्या पक्षाला मिळावं, अशी शिंदसेनेची मागणी होती. पण भाजपनं त्यास स्पष्ट शब्दांत नकार दिल्याचं समजतं. यानंतर भाजपच्या गोटातून काही नगरसेविकांची नावं महापौरपदासाठी चर्चेत आहेत. यात शीतल गंभीर-देसाई यांचं नाव आघाडीवर आहे.



मुंबई महापालिकेचं महापौरपद सलग दुसऱ्यांदा खुल्या प्रवर्गातील महिलेसाठी आरक्षित झालं आहे. यानंतर भाजपमधील चार ते पाच नगरसेविकांची नावं महापौरपदासाठी चर्चेत आहेत. यात शीतल गंभीर-देसाई यांचं नाव पुढे आहे. त्या प्रभाग क्रमांक १९० मधून विजयी झाल्या आहेत. त्यांनी शिवसेना उबाठच्या उमेदवार वैशाली पाटणकर यांचा अटीतटीच्या लढतीत पराभव केला. गंभीर अवघ्या १२५ मतांनी विजयी झाल्या.

दादर-माहीम परिसर ठाकरेंचा बालेकिल्ला मानला जातो. शीतल गंभीर तिथून निवडून आल्या आहेत. ठाकरेंच्या बालेकिल्ल्यातून विजयी झालेल्या त्या भाजपच्या एकमेव नगरसेविका आहेत. त्यांचे वडील सुरेश गंभीर हे शिवसेनेचे तीन टर्मचे आमदार राहिले आहेत. ते बाळासाहेबांचे शिवसैनिक होते. १९९० ते २००९ या कालावधीत ते माहीमचे आमदार होते. सलग चारवेळा ते माहीममधून विजयी झाले.

भाजप महिला मोर्चाच्या अध्यक्ष म्हणून शीतल गंभीर यांच्याकडे जबाबदारी आहे. शीतल गंभीर यांच्या कामाचं कौतुक खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिवाजी पार्कवरील सभेतून केलं. आदित्य ठाकरे यांच्या टिकेला उत्तर देताना फडणवीस यांनी गंभीर यांचा उल्लेख केला होता. आदित्य ठाकरेंना उत्तर देण्यासाठी माझी गरज नाही. त्यांच्यासाठी आमच्या उमेदवार शीतल गंभीर पुरेशा आहेत, असं फडणवीस म्हणाले आहेत. शीतल गंभीर यांच्या सोबतच माजी उपमहापौर अलका केरकर, राजेश्री शिरवाडकर, रितू तावडे यांचीही नावं शर्यतीत आहेत. अन्य प्रवर्गातूनही महापौरपदासाठी चेहरा दिला जाऊ शकतो. तसं झाल्यास योगिता कोळी आणि प्रीती सातम यांचीही नावं चर्चेत आहेत.

## भुजबळांना ‘महा-दिलासा’!
### महाराष्ट्र सदन घोटाळ्यात ED कडूनही निर्दोष मुक्तता; आरोपांच्या फेऱ्यातून अखेर सुटका

**त.भा. वृत्तसेवा,**
**मुंबई, २३ जानेवारी :** महाराष्ट्राच्या राजकारणातील एक दिग्गज नाव आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) नेते छगन भुजबळ यांच्यासाठी आजचा दिवस दिलासादायक ठरला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून त्यांच्यावर टांगती तलवार असलेल्या कथित महाराष्ट्र सदन घोटाळा प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाने (एऊ) त्यांना मोठा दिलासा दिला आहे. आधी एसीबी आणि आता ईडी, अशा दोन्ही यंत्रणांकडून भुजबळ आता पूर्णपणे निर्दोष मुक्त झाले आहेत.


**८५० कोटींचा आरोप आणि २ वर्षांचा तुरुंगवास**

दिल्लीतील महाराष्ट्र सदन बांधकामात तब्बल ८५० कोटी रुपयांची अफरातफर झाल्याचा गंभीर आरोप छगन भुजबळ यांच्यावर करण्यात आला होता. या प्रकरणात केवळ राजकीय चर्चाच झाली नाही, तर भुजबळांना दोन वर्षे तुरुंगातही राहावे लागले होते. त्यांच्यासह एकूण १४ जणांची नावे या कथित घोटाळ्यात गुंतलेली होती. मात्र, प्रदीर्घ कायदेशीर प्रक्रियेनंतर आता त्यांच्यावरील सर्व आरोपांना पूर्णविराम मिळाला आहे.

**’एसीबी’नंतर ’ईडी’चीही मोहोर**

काही काळापूर्वीच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पुराव्याअभावी भुजबळांना दोषमुक्त केले होते. मुख्य गुन्हाच सिद्ध न झाल्याने ईडीनेही आता त्यांच्या निर्दोष मुक्ततेचा अर्ज मंजूर केला आहे. या क्लिनचीटमुळे भुजबळ आता कायदेशीर कचाट्यातून पूर्णपणे बाहेर आले आहेत.

छगन भुजबळ आणि इतर सह-आरोपींनी निर्दोष मुक्ततेसाठी न्यायालयात धाव घेतली होती. या अर्जावर



सविस्तर सुनावणी झाल्यानंतर न्यायालयाने ईडीचा खटला रद्दबातल ठरवत भुजबळांना दोषमुक्त केले. यामुळे भुजबळ समर्थकांनी जल्लोष सुरू केला असून, सत्याचा विजय नक्की होतो, अशा प्रतिक्रियाही उमटत आहेत.आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर छगन भुजबळ निर्दोष सुटणे हा अजित पवार गटासाठी मोठा राजकीय दिलासा मानला जात आहे. विरोधकांकडून वारंवार होणाऱ्या भ्रष्टाचाराच्या आरोपांना आता उत्तर देण्यासाठी सत्ताधारी महायुतीकडे हे मोठे शस्त्र मिळाले आहे.

## थोडक्यात...

### राज्यपालांविरोधात ‘सर्वोच्च’मध्ये जाणार

**नवी दिल्ली :** कर्नाटकचे राज्यपाल थावरचंद गेहलोत यांनी राज्य विधानसभेत अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी अभिभाषणातील केवळ दोन ओळी वाचल्या आणि ते सभागृहातून निघून गेले. यामुळे मुख्यमंत्री सिद्धरामय्या नाराज झाले असून त्यांनी राज्यपालांच्या भूमिकेविरोधात सर्वोच्च न्यायालयात जाण्याची भूमिका घेतली आहे. राज्यपालांनी भाषणाच्या सुरुवातीला सर्व सदस्यांना अभिवादन केले. त्यानंतर त्यांनी हिंदीत दोन ओळी वाचल्या. ‘माझे सरकार राज्याच्या आर्थिक, सामाजिक व भौतिक विकासाचा वेग दुप्पट करण्यास कटिबद्ध आहे. जय हिंद, जय कर्नाटक’, इतके वाचून राज्यपाल यांनी सभात्याग केला. यानंतर काँग्रेस सदस्यांनी नाराजी व्यक्त करत राज्यपालांविरोधात घोषणाबाजी केली. तामिळनाडू नंतर कर्नाटक राज्याचाही राज्यपालांशी असलेला संघर्ष उघड झाला आहे. राज्यपाल थावरचंद गेहलोत यांनी सभागृहात भाषणाला मंजुरी देण्याआधी ११ उतारे हटविण्यास सांगितले होते. मात्र मुख्यमंत्री सिद्धरामय्या व मंत्रिमंडळाने त्यास नकार दिला होता.

### ओयो हॉटेलमध्ये दोघांमध्ये वाद अन् बॉयफ्रेंडने रुचिताला संपवलं

**नागपूर:** नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर रोडवरील फेटरी गाव परिसरात असलेल्या एका ओयो हॉटेलमध्ये प्रेमसंबंधातून घडलेल्या निर्घृण हत्याकांडाने संपूर्ण शहर हादरून गेले आहे. प्रियकरानेच आपल्या प्रेयसीच्या गळ्यावर चाकूने वार करून तिची निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली असून, परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. मृत तरुणीचे नाव रुचिता राजेंद्र भांगे (वय २१) असे असून, तिचा मूळ मुक्काम आष्टी खुर्द, कळमेश्र्वर येथे आहे. सध्या ती गिट्टीखदान परिसरात वास्तव्यास होती. आरोपी प्रियकराचे नाव सौरभ जामगडे (वय २४, रा. आष्टी खुर्द) असे आहे.

### वाहतुकीच्या नियमाचे उल्लंघन केल्यास परवाना रद्द होणार

**नवी दिल्ली:** रस्ता सुरक्षा मजबूत करण्यासाठी आणि वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी, रस्ते वाहतूक मंत्रालयाने एक मोठा निर्णय घेतलाय. आता सिग्नल तोडणं किंवा कोणतेही वाहतुकीचे नियम तोडणं चांगलंच महागात पडणार आहे. जर एका वर्षात तुम्ही पाचवेळा वाहतुकीचे नियम मोडले तर तुमचा चालक परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स) तीन महिन्यासाठी रद्द होऊ शकतं. ही ड्रायव्हिंग लायसन्स रद्द करण्याची तरतूद दळणवळण मंत्रालयाच्या नवीन मोटर व्हेइकल सुधारणा नियमात करण्यात आल्याचे वृत्त आहे. १जानेवारीपासून लागू झालेले हे नियम भारतीय रस्त्यांवर शिस्त आणण्याच्या दिशेने एक मजबूत पाऊल मानले जात आहे.

### एसटी बसचा थरार; ब्रेक निकामी

**बुलढाणा :** महाराष्ट्रातील बुलढाणा जिल्ह्यात एसटी बसचा अपघात थोडक्यात टळला. चालकाने प्रसंगावधान राखल्यामुळे बसमध्ये असलेल्या ३० जणांचे प्राण वाचले. वरुड परिसरात धाड-बुलढाणा मार्गावरुन बस पुढे जात होती. वरुड-सोयगाव-जामठी मार्गावर धावणाऱ्या बसचा नेहमीप्रमाणे वेगाने प्रवास सुरू होता. प्रवासी बसमध्ये बसले होते आणि आपापल्या कामात मग्न होते अथवा झोपले होते. अचानक जोराचा आवाज ऐकू आला. सगळ्यांचे लक्ष आवाजाच्या दिशेने वेधले गेले. काही क्षणांतच ब्रेक काम करत नसल्याचं चालकाच्या लक्षात आलं. रस्त्याच्या दुतर्फा वस्ती आणि वर्दळ असल्याने परिस्थिती अधिकच धोकादायक झाली होती.

### वैष्णोदेवी यात्राः पाऊस-बर्फवृष्टीमुळे यात्रा स्थगित

**कटरा :** उत्तर हिंदुस्थानात सध्या कडाक्याची थंडी आणि जोरदार बर्फवृष्टी सुरू असून, याचा मोठा फटका माता वैष्णोदेवीच्या यात्रेला बसला आहे. त्रिकुटा पर्वतावर सातत्याने होत असलेला पाऊस आणि मोठ्या प्रमाणावरील हिमवृष्टीमुळे भाविकांच्या सुरक्षेचा विचार करून ’श्री माता वैष्णोदेवी श्राईन बोर्डा’ने यात्रा तात्पुरती स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे दर्शनासाठी आलेल्या हजारो भाविकांना सध्या कटरा येथेच थांबवून ठेवण्यात आले आहे.

त्रिकुटा पर्वत परिसरात गेल्या काही तासांपासून पावसाची रिपरिप सुरू आहे. पावसामुळे डोंगरावरील रस्ते निसरडे झाले असून चालणे कठीण झाले आहे. तसेच बर्फवृष्टीमुळे दृश्यमानता कमी झाल्याने आणि रस्त्यावर घसरण वाढल्याने प्रवाशांच्या सुरक्षेला धोका निर्माण झाला आहे. कोणत्याही प्रकारची दुर्घटना घडू नये म्हणून प्रशासनाने तातडीने चढाई थांबवण्याचे आदेश दिले आहेत. वातावरणातील बदल आणि कडाक्याची थंडी लक्षात घेता, उत्तर हिंदुस्थानातून येणाऱ्या प्रवाशांची नवीन तिकीट नोंदणी सध्या पूर्णपणे थांबवण्यात आली आहे.

## खुल्या प्रवर्गातून महापौर, पण किंगमेकर ठरणार ओबीसी चेहरा?

**त.भा. वृत्तसेवा,**
**छत्रपती संभाजीनगर, २३ जानेवारी :** महापालिका निवडणुकींचे निकाल जाहीर झाले आहेत. आता सध्या निवडणुकीत बाजी मारलेल्या पक्षांमध्ये रस्सीखेच सुरु आहे ती महापौरपदासाठी. आता मोठी घडामोड संभाजीनगरमधून आली आहे. महानगरपालिकेवर पहिल्यांदाच ५७ जागांसह स्पष्ट बहुमत मिळवून कमळ फुलले आहे. पण आता सर्वांच्या नजरा लागल्या आहेत त्या शहराच्या २३ व्या महापौराच्या खुर्चीकडे. आरक्षण खुल्या प्रवर्गासाठी निघालं असलं तरी, शहराचा नवा कारभारी कोण असेल याचा रिमोट कंट्रोल मात्र ओबीसी नेत्यांच्या हातात आहे.

भाजपमध्ये सध्या महापौरपदासाठी एकापेक्षा एक दिग्गज ८ दावेदार मैदानात आहेत. यामध्ये प्रामुख्याने दोन वेळा नगरसेवक महेश माळवतकर,समीर राजूरकर, राजगौरव वानखेडे,शिवाजी दांडगे, रामेश्वर भादवे, विजय औताडे, सुरेंद्र कुलकर्णी, रेणुकादास वैद्य यांसारख्या आक्रमक चेहऱ्यांची नावे आघाडीवर आहेत. मात्र, भाजपमध्ये नेहमीच धक्कातंत्राचा वापर केला जातो, त्यामुळे चर्चेत नसलेले नाव ऐनवेळी समोर येण्याची शक्यता नाकारता येत नाही. यावेळच्या महापौर पदाच्या निवडीचं सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे, खुल्या प्रवर्गातून महापौर निवडायचा असला तरी भाजपचे वजनदार ओबीसी नेते त्यात महत्त्वाची भूमिका बजावणार आहेत.

ज्यात बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे ,खासदार डॉ. भागवत कराड आणि आ.संजय केणेकर यांची कोअर कमिटी नावावर शिक्कामोर्तब करणार आहे. जर या तीन नेत्यांमध्ये शहरात एकमत झाले नाही तर अंतिम फैसला थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस घेतील.

## महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींना अनुदान नाहीच

**त.भा. वृत्तसेवा,**
**पुणे, २३ जानेवारी :** ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण’ योजनेसाठी ‘ई-केवायसी’ केल्यानंतरही गेल्या दोन महिन्यांपासून लाडक्या बहिणींना दरमहा दीड हजार रुपयांचा लाभ मिळालाच नसल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. या तक्रारी महिला व बालकल्याणमंत्री अदिती तटकरे यांच्यापर्यंत पोहोचल्याने त्यांनी अंगणवाडी सेविकांमार्फत प्रत्यक्ष पडताळणीचे आदेश दिले आहेत. मात्र, हा आदेश अद्याप महिला बालकल्याण अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचलाच नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

राज्य सरकारने गेल्या वर्षी लाडक्या बहिणी योजनेचा अनावश्यक लाभ घेणाऱ्या महिलांची पडताळणी करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार चारचाकी असणाऱ्या महिलांची पडताळणी करण्यात आली. त्यातून राज्यभरातून अनेक महिला लाभार्थ्यांना अपात्र ठरवून त्यांना अनुदान बंद करण्यात आले. पडताळणीचा दुसरा टप्पा म्हणून ‘ई-केवायसी’ बंधनकारक करण्यात आले. ई-केवायसी करताना ‘ओटीपी’ येत नसल्याचे आढळले. त्यावर घटस्फोट अथवा पती किंवा पिता निधनाचे प्रमाणपत्र जोडण्याची सक्ती करण्यात आली आहे.आता ‘ई-केवायसी’ केल्यानंतरही पुणे जिल्ह्यासह राज्यातील अनेक लाडक्या बहिणींना दोन महिन्यांपासून योजनेचा लाभ मिळालेला नाही. अनेक महिलांनी याबाबत महिला बालकल्याण विभागासह स्थानिक पंचायत समिती, नगरपालिकेकडे तक्रारी केल्या आहेत. काही महिलांकडे चारचाकी असूनही त्या महिलांना पुन्हा अनुदान सुरू केल्याचेही दिसले. शेजारीच राहणाऱ्या महिलेने ई-केवायसी करूनही आणि चारचाकीसह अन्य लाभ सुरू असूनही त्यांना लाभापासून वंचित ठेवले आहे, अशा तक्रारी महिलांनी केल्या.

## तामिळनाडूत सरकारचे काऊंटडाऊन सुरू: नरेंद्र मोदी

**तिरुवनंतपुरम/वृत्तसंस्था :** पंतप्रधान मोदींनी शुक्रवारी तामिळनाडूतील चेंगलपट्टू येथे सांगितले की, राज्यातील लोकांना द्रमुकच्या कुशासनापासून मुक्तता हवी आहे. आपल्याला तामिळनाडूला भ्रष्टाचारमुक्त राज्य बनवायचे आहे. द्रमुक सरकारची उलटी गणती सुरू झाली आहे.

आज, तामिळनाडू सरकारचा लोकशाही किंवा जबाबदारीशी काहीही संबंध नाही. द्रमुक सरकार फक्त एका कुटुंबाच्या अधीन राहण्यात व्यस्त आहे. त्यांच्या पक्षात, सर्वात जास्त भ्रष्टाचार करणारे





पुढे जातात. तामिळनाडूतील प्रत्येक मुलाला माहित आहे की कुठे आणि किती भ्रष्टाचार होत आहे आणि हा पैसा कोण खिशात घालत आहे.

त्याआधी पंतप्रधानांनी केरळला भेट दिली. तिरुअनंतपुरम येथे ५५ मिनिटांच्या भाषणात ते म्हणाले, केरळमध्ये मला नवीन आशा दिसते. तुमच्या उत्साहामुळे मला विश्र्वास आहे की केरळमध्ये बदल घडेल. येथील डावे विचारसरणी माझे शब्द स्वीकारणार नाही. पण मी तुम्हाला तर्क आणि तथ्यांसह ठामपणे सांगेन.

ते म्हणाले, १९८७ पूर्वी, गुजरातमध्ये भाजप एक सीमांत पक्ष होता. त्याला वर्तमानपत्रात फक्त दोन ओळी मिळाल्या. ज्याप्रमाणे १९८७ मध्ये भाजपने अहमदाबादमध्ये पहिल्यांदाच महानगरपालिका निवडणूक जिंकली, त्याचप्रमाणे आज तिरुअनंतपुरममध्येही भाजपने तेच यश मिळवले आहे. येथून केरळमध्ये भाजपचा पाया रचला गेला आहे. केरळमध्ये या वर्षी एप्रिल-मे मध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत.

## ले. कर्नल सीता शेळके यांना ‘सुभाषचंद्र बोस आपत्ती व्यवस्थापन पुरस्कार’ जाहीर

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रात शौर्य आणि तांत्रिक कौशल्याचा सुयोग्य वापर करणाऱ्या अहिल्यानगरच्या सुकन्या लेफ्टनंट कर्नल सीता अशोक शेळके यांना केंद्र सरकारचा ‘सुभाषचंद्र बोस आपत्ती व्यवस्थापन पुरस्कार २०२६’ जाहीर झाला आहे. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीचे औचित्य साधून (पराक्रम दिवस) केंद्र सरकारने ही घोषणा केली. देशभरातून २७१ नामांकनांतून ले.कर्नल शेळके यांची वैयक्तिक श्रेणीसाठी निवड झाली आहे.

लेफ्टनंट कर्नल सीता शेळके यांनी २०२४ मध्ये केरळमधील



वायनाड येथे झालेल्या भीषण भूस्खलनादरम्यान बजावलेली कामगिरी या पुरस्कारासाठी निर्णायक ठरली. जेव्हा वायनाडमध्ये निसर्गाचे थैमान सुरू होते, तेव्हा त्यांनी अत्यंत प्रतिकूल हवामानात शेकडो नागरिकांचे प्राण वाचवण्यासाठी बचाव मोहिमेचे नेतृत्व केले.

## प्रजासत्ताक दिनानिमित्त दिल्लीतील कर्तव्य पथावर भव्य सोहळा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** २६ जानेवारी रोजी भारत ७७ वा प्रजासत्ताक दिन अत्यंत उत्साहानं आणि अभिमानानं साजरा करणार आहे. ही महान परंपरा नवी दिल्लीतील कर्तव्य पथ वर आयोजित करण्यात येणाऱ्या भव्य परेड आणि विविध कार्यक्रमांच्या रूपात दिसून येईल. या वर्षीचा प्रजासत्ताक दिन हा ’वंदे मातरम’ या राष्ट्रगाणला १५० वर्षे पूर्ण झाल्यामुळे त्याचे स्मरण आणि भारताची एकता, विविधता आणि प्रगती हे मुख्य विषय घेऊन साजरा केला जाणार आहे.

या वर्षी २६ जानेवारीच्या परेडचे मुख्य अतिथी म्हणून युरोपियन संघटनेचे दोन प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत. त्यामध्ये युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष एंटोनियो कोस्टा आणि युरोपियन कमिशनच्या अध्यक्षपदी कार्यरत असलेले उर्सुला वॉन डेर लेयेन यांचा समावेश आहे.

प्रजासत्ताक दिन परेड सकाळी ९.३० वाजता राष्ट्रपतींच्या हस्ते राष्ट्रीय ध्वज फडकवणे आणि वंदे मातरम् गीताच्या



१५० वर्षांचा गौरव साजरा करून सुरू होईल. त्यानंतर १०.३० वाजता कर्तव्य पथावर मुख्य परेड सुरु होईल जी जवळपास दीड ते दोन तास चालेल.

यंदा कर्तव्यपथावर एकूण ३० विविध चित्ररथ पाहायला मिळतील. त्या माध्यमातून वेगवेगळ्या राज्यांची संस्कृती आपल्याला दिसेल. प्रत्येक चित्ररथाचं विषय स्वतंत्रता का मंत्र : वंदे मातरम आणि समृद्धि का मंत्र : आत्मनिर्भर भारत असल्यामुळे भारताच्या इतिहासापासून आधुनिक प्रगतीपर्यंतचा प्रवास रंगून दिसेल.

ऑपरेशन सिंदूर थीमवर आधारित चित्ररथ यंदा विशेष आकर्षण ठरेल, ज्यात भारतीय सैन्याची सामर्थ्य, राफेल आणि अन्य लढाऊ विमानांचे प्रतिनिधीत्व झळकताना दिसेल. विविध राज्यांची चित्ररथ त्यांच्या सांस्कृतिक वारसा, आर्थिक उत्कर्ष, पर्यटन व नवोन्मेष यांचे सान्निध्य दाखवतील.

सैन्य शक्तीचा अभिमान दाखवण्यासाठी भारतीय लष्कर, वायुसेना आणि नौदल आपल्या सर्वोत्तम क्षमतेसह सहभागी होतील. या वर्षी विशेषतः वायुसेनेचे ‘सिंदूर’ फॉर्मेशन फ्लायपास्ट, ज्यात राफेल, सुखोई-३०, मिग-२९ असे लढाऊ विमान दिसतील. ते भारताचे सामर्थ्य दर्शवतील.

पॅरेडमध्ये सुमारे २,५०० कलाकार विविध सांस्कृतिक कला सादर करताना दिसतील. त्यामध्ये पारंपरिक नृत्य, संगीत व विविध कला रूपे सामील आहेत. चित्ररथांसोबत देशाची विविध संस्कृती एकाच रांगेतून जगासमोर सादर केली जाईल. पूरक कार्यक्रमांसाठी आणि पाहुण्यांसाठी कर्तव्य पथावर कडक सुरक्षा व्यवस्था आणि सीसीटीव्ही एकत्रित देखरेख आहे, ज्यामुळे सर्व उपस्थितांचे संरक्षण सुनिश्चित केले जाईल.

## पुणेकरांच्या नावे नकोसा रेकॉर्ड! वाहतूक कोंडीत जगात पाचवे

**पुणे/प्रतिनिधी:** पुण्यात वाहतुकीचा वेग वाढल्याचे निरीक्षण वाहतूक पोलिसांनी काही दिवसांपूर्वीच नोंदविले असताना, जगातील कोंडीमुक्त शहरांच्या यादीतही पुण्याने अंशतः सुधारणा केली आहे. वाहतूक कोंडीत गेल्या वर्षी जगात चौथ्या क्रमांकावर असलेल्या पुण्याला २०२५मध्ये पाचव्या क्रमांकाचे स्थान मिळाले आहे. जगात सर्वाधिक वाहतूक कोंडीत बेंगळुरू दुसऱ्या क्रमांकावर असून, मुंबई १८व्या स्थानावर आहे. जगात अनेक मोठ्या शहरांमधील वाढती वाहतूक ही सर्वांचीच समस्या झाली आहे. जगभरातील प्रत्येक मोठ्या शहरात वाहनांची संख्या वाढल्याने कमी अंतर कापण्यासाठी संस्थेकडून जगातील ४९२ शहरांमधील वाहतुकीची माहिती गोळा करून त्याचे विश्लेषण करून सविस्तर अहवाल तयार केला जातो. ’टॉम टॉम’तर्फे ’ट्रॅफिक इंडेक्स २०२५’ या अहवालात जगभरातील वाहनांचा वेग मोजण्यासाठी ’जीपीएस डेटा’चा आधार घेण्यात आला आहे.

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## प्रजासत्ताक दिनानिमित्त होणार ऐतिहासिक कवायत सादरीकरण

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २३ जानेवारी :** जिल्ह्यात २६ जानेवारी २०२६ रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त राष्ट्रभक्तीपर गीतावर आधारित भव्य कवायत सादरीकरणाचे आयोजन करण्यात आले आहे. लातूर जिल्हा क्रीडा संकुल येथे सकाळी जिल्हास्तरीय ध्वजवंदन कार्यक्रमानंतर सुमारे ५ हजार विद्यार्थ्यांचे एकत्रित कवायत संचलन सादर केले जाणार आहे. शहरातील विविध शाळांमधील विद्यार्थी या उपक्रमात सहभागी होत आहेत.

या कार्यक्रमास पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहूल कुमार मीना, शिक्षणाधिकारी माध्यमिक डॉ. दत्तात्रय मठपती, शिक्षणाधिकारी प्राथमिक तृप्ती अंधारे तसेच मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्रकाश देशमुख हे प्रमुख उपस्थित राहणार आहेत. जिल्ह्यातील इतर नऊ तालुक्यांमध्ये देखील ध्वजवंदनानंतर स्वतंत्रपणे कवायत आयोजित करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील शासकीय, खासगी, अनुदानित व विनाअनुदानित शाळांमधून विद्यार्थी या उपक्रमात सहभागी होणार आहेत. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहूल कुमार मीना यांनी सर्व संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेऊन आवश्यक मार्गदर्शन केले.



# लातूर भाजपला यशाचे 'अजीर्ण'!..

## नजीकच्या काळात अंतर्गत गटबाजी उफाळून येण्याचे संकेत

**तभा वृत्तसेवा/श्रीधर स्वामी**

**लातूर २३ जानेवारी :** देशात आणि जगात सर्वाधिक सदस्य संख्या असणारा राजकीय पक्ष म्हणून भारतीय जनता पार्टीची ओळख आहे. राज्यातहीआजमितीस भाजपच सगळ्यात मजबूत पक्ष म्हणून वेगाने पुढे येत आहे. याचे सर्व श्रेय कणखर नेतृत्वाचे धनी असणाऱ्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आहे. हे सगळे होत असतानाच लातूर भाजपला मात्र दूरदृष्टीहिन नेतृत्वामुळे दुर्दैवाने यशाचे ' अजीर्ण' झाल्याचेदृष्टीपथास येत आहे. त्यामुळे नजीकच्या काळात जिल्हा भाजपमध्ये मोठ्या प्रमाणात अंतर्गत गटबाजी उफाळून येण्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. याकडे राज्याच्या शीर्ष नेतृत्वाने वेळीच गांभीर्याने पाहावे अशीअपेक्षाहीव्यक्त होत आहे.

अगदी सुरुवातीपासूनचलातूर भाजपवर काँग्रेसशीलगट असल्याचा आरोप केला जात होता, हे सर्वज्ञात आहे. कालांतराने यात सुधारणा होत गेली. तरीही भाजपचे काही नेते आणि पदाधिकारी काँग्रेस नेत्यांच्या इशाऱ्यावर चालतात असाही आरोप केला जातो. काँग्रेस नेत्यांचा विरोध झुगारून तोडीस तोड चालणारे नेतेही आजमितीस भाजपमध्ये आहेत, नाही असे नाही. मात्र अशा काही चेहऱ्यांनाही हेतूतः पक्ष संघटनेतूनही डावलले जात असल्याची चर्चा चालू आहे. नुकत्याच पार पडलेल्या लातूर शहर महानगरपालिका निवडणुकीत, निवडणूक कार्यक्रम घोषित होण्यापूर्वी भाजप संपूर्ण बहुमतानिशी मनपात सत्तेत येणार अशी परिस्थिती होती. असे असतानाही ऐन-वेळी अनेक इच्छुक उमेदवारांना उमेदवारीपासून जाणीवपूर्वक बाजूला ठेवून त्यांच्यावर बंडखोरीची वेळ आणली गेली. त्यापैकी अनेकांना पक्षातून निलंबितहीकरण्यात आले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या काही कार्यकर्त्यांनीही कधी नव्हे तो मनपा निवडणुकीत भाजप उमेदवारांऐवजी बंडखोरी करणाऱ्यांच्या पाठीशी राहणे पसंद केल्याचे पाहायला मिळाले. नेमके लातुरातचअसे का घडले ? याचा विचार आता राज्याच्या वरिष्ठ नेतृत्वानेचकरण्याची आवश्यकता असल्याचेही बोलले जात आहे. सर्वसामान्य मतदारांही सद्यस्थितीत विकासात्मक दृष्टीकोनातून मोठ्या प्रमाणात भाजपशी जोडला जात आहे. तरीही लातूर भाजपमध्येच नजीकच्या एवढ्या मोठ्या प्रमाणात गटबाजी उफाळून येण्याची शक्यता का आहे ? असा प्रश्नहीकाही मंडळींनापडू शकतो. पक्ष असो वा संघटना कोणतेही यश सामूहिक असते. आपणचयायशाचे धनी आहोत असे समजून चालण्याची कोणाचीही चूक ' शेखचिल्ली' सारखी ठरू शकते. कोणत्याही पक्ष - संघटनेत सगळ्यांना सोबत घेऊन चालणे सर्वांच्या दृष्टीने हिताचे असते. अशावेळी काही बाबतीत मतभेद - मनभेदही होणे क्रमप्राप्त आहे. मात्र त्यावरहीसकारात्मक तोडगा काढून पुढे चालणे गरजेचे असते. अन्यथा त्याचेपरिणाम भविष्यात सर्वांनाच भोगावे लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.

लातूर जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचाआता अखेरचा टप्पा सुरू आहे. मावळत्या लातूर जिल्हा परिषदेवर भाजपची सत्ता होती. या निवडणुकीतहीसत्तेची दुसरी इनिंग भाजपकडेच राहणार की ऐन-वेळी त्यात ' मनपा' सारखा 'खो' घालण्याचा प्रयत्न ( खेळी ) होणार ? याबद्दलहीकार्यकर्त्यांतसंभ्रम आहे. कोणतीही गोष्ट अति झाली की ती नुकसानच करते, असे म्हटले जाते. मग ते भोजन असो, सत्ता असो की आणखी काही. तूर्तास भाजपला मिळणाऱ्या नेत्रदीपक यशामुळे लातूरमधील काही नेत्यांना जणू त्याचेच 'अजीर्ण' झाल्याचाप्रत्यय येत असल्याचे सूज्ञांचे म्हणणे आहे. या अजीर्णत्वाच्याभावनेमुळेच नजीकच्या काळात भाजपमध्ये मोठ्या प्रमाणात अंतर्गत गटबाजी उफाळून येण्याची चिन्हे आहेत. आजघडीला भाजपकडे येणाऱ्या नेत्यांचाप्रवाह वाढला आहे. विविध राजकीय पक्षातील नेते - पदाधिकारी भाजपकडे आकृष्ट होत आहेत. येणारीसगळी मंडळी पक्षाच्या ध्येयधोरणांशी कितपत प्रामाणिक राहणार ? हा विषय जरी पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांच्या अखत्यारीतील असला तरी त्याचे दूरगामी परिणाम सगळ्यांना भोगावे लागू शकतात, हे वास्तव आहे. लातूर जिल्ह्यात भाजपमधील नेत्यांची संख्याही आता बऱ्यापैकी वाढली आहे. संख्येने वाढले असले तरी किती नेते एकमेकांशी जुळवून घेण्यात यशस्वी झाले आहेत ? हा हीएक संशोधनाचा विषय आहे. कारण नेत्यांमधील समन्वयचपक्षाच्या यश - अपयशातमहत्वाचा ठरत असतो. समन्वय नसेल तर मग गटबाजीसारख्या बाबींनासहजगत्या वाव मिळतो. तूर्तास जिल्ह्यात अशीच परिस्थिती असल्याचे दृष्टीपथास येत आहे.

राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयातील

## अधिकारी, कर्मचाऱ्यांनी घेतली शपथ



**तभा वृत्तसेवा**

**लातूर २३ जानेवारी :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशांनुसार २५ जानेवारी २०२६ रोजी राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्ताने आज जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या उपस्थितीत अधिकारी, कर्मचारी यांनी मतदार जागृतीची शपथ घेतली.

अपर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर, सामान्य प्रशासनाच्या उपजिल्हाधिकारी सायली ठाकूर, तहसीलदार संतोष बनकर, नायब तहसीलदार पंकज मंदाडे यांच्यासह अधिकारी, कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

वयाची अठरा वर्षे पूर्ण केल्यानंतर मतदार नोंदणी करणे आणि मतदान करणे हे आपले प्राथमिक कर्तव्य आहे. या वर्षी राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त भारत निवडणूक आयोगाने 'माझा भारत, माझे मत' ही थीम आणि 'भारतीय लोकशाहीच्या केंद्रस्थानी नागरिक' ही टॅगलाइन जाहीर केली आहे. या थीमच्या अनुषंगाने २५ जानेवारी रोजी मतदार जागृतीसाठी विविध उपक्रम राबवावेत, तसेच प्रत्येक पात्र मतदाराने आपला मतदानाचा हक्क बजावावा. लातूर जिल्ह्यातील सर्व विभागीय अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांनी या राष्ट्रीय उत्सवात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी यावेळी केले.

## शिवलिंगेश्वर फार्मसीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त काव्य संमेलन



**तभा वृत्तसेवा**

**औसा दि. २३ जानेवारी :** तालुक्यातील आलमला येथील शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयात अभिजात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा च्या निमित्ताने १४ जानेवारी ते २८ फेब्रुवारी या कालावधीत मराठी भाषेचा समृद्ध वारसा जपण्यासाठी व वृद्धिंगत करण्यासाठी विविध स्पर्धा, ग्रंथ प्रदर्शने आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यानिमित्त साहित्य व काव्य संमेलन झाले.

माध्यम क्षेत्रात अत्यंत मोलाचे योगदान देत असलेल्या कु. स्वप्नाली भरटे लेखीका, कवयित्री व पॉडकास्टर लातूर, डॉ. अंजली तनपुरे, लेखीका व कवयित्री लातूर यांच्या प्रमुख उपस्थितीत काव्य संमेलन झाले. प्राचार्य डॉ. विश्वेश्वर धाराशिवे, विभाग प्रमुख डॉ. समीर शफी, डॉ. सुरज मालपानी, प्रा. वागदरे एस.एस., प्रा . रुतुजा भिसे व कार्यक्रमाच्या समन्वयीका प्रा. मनिषा बेलुरे आदी उपस्थित होते.

डिजिटल युगात मराठीचा प्रभाव वाढत असून सोशल मीडिया आणि इंटरनेटवर मराठी भाषेचा प्रभावी वापर कसा करावा, याबद्दल तरुणांना मार्गदर्शन करुन मराठी भाषेच्या विविध सांस्कृतीक, सामाजिक,एतेहासिख व प्रेरणादायी काव्य कु. स्वप्नाली भरटे व डॉ. अंजली तनपुरे यानी सादर करुन काव्यप्रतिभेने विद्यार्थ्यांना व कर्मचा-यांना मंत्रमुग्ध केले.

प्राचार्य डॉ. विश्वेश्वर धाराशिवे म्हणाले, मराठी भाषेचा वापर वाढवण्यासाठी कार्यशाळा आणि व्याख्याने आयोजित केली जात आहेत. महाविद्यालयांमध्ये वकृत्व स्पर्धा आणि काव्यवाचन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. मराठी भाषेचे वैभव जपणे आणि ज्ञानभाषा म्हणून विकसित करणे, नवीन पिढीमध्ये भाषेबद्दल आवड निर्माण करणे हाच या पंधरवड्याचा मुख्य हेतू असल्याचे सांगून तांत्रिक अभ्यासक्रमामध्ये मराठी भाषेचे महत्व प्राचार्य डा. धाराशिवे यांनी पटवुन दिले.

महाविद्यालयातील ग्रंथालयाच्या वतीने व गटागट स्टोअर्स, लातूर यांच्या वतीने ग्रंथोत्सवाचे आयोजन करून दुर्मिळ मराठी पुस्तकांचे प्रदर्शन यावेळी भरवण्यात आले होते. नवीन पिढीला वाचनाची गोडी लागावी, यासाठी वाचकांना विशेष सवलती देण्यात आल्या. कु. सानीका चव्हाण व स्मिता स्वामी यांनी सुत्रसंचालन केले तर विभाग प्रमुख डॉ. समीर शफी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## प्रजासत्ताक दिनानिमित्त सोमवारी पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते ध्वजवंदन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर २३ जानेवारी :** भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त सोमवार, २६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ९.१५ वाजता लातूर जिल्हा क्रीडा संकुल येथे मुख्य शासकीय राष्ट्रध्वज वंदन समारंभ होणार आहे. याप्रसंगी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते ध्वजवंदन होईल.

या कार्यक्रमास नागरिकांनी राष्ट्रीय पोषाखात समारंभ सुरु होण्यापूर्वी २० मिनिटे अगोदर आसनस्थ व्हावे. या मुख्य शासकीय कार्यक्रमास सर्वांना उपस्थित राहता, यावे यासाठी इतर सर्व कार्यालय, संस्था आदींनी त्यांचे ध्वजवंदनाचे समारंभ सकाळी ८.३० वाजेपूर्वी किंवा सकाळी १० वाजेनंतर आयोजित करावेत, असेही आवाहन करण्यात आले आहे.



## माजी मंत्री, आ. अमित देशमुख यांनी बाभळगाव निवासस्थानी विविध संस्था, संघटना पदाधिकाऱ्यांसह नागरिकांच्या भेटी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर २३ जानेवारी :** राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री, महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी शुक्रवार दि. २३ जानेवारी रोजी बाभळगाव निवासस्थानी लातूर शहरासह जिल्हाभरातून आलेल्या विविध संस्था, संघटना, पदाधिकारी तसेच काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, नागरिक यांच्या भेटी घेत त्यांच्याशी संवाद साधला. भेटीसाठी आलेल्याच्या अडीअडचणी, समस्या समजून घेत त्यांची निमंत्रने, निवेदने स्वीकारली. आणि संबंधितांना पुढील आवश्यक कार्यवाहीस्तव सूचना केल्या. तसेच राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्याशी



जिल्हा परिषद व पंचायत समिती स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुक २०२६ अनुषंगाने विविध विषयांवर चर्चा केली.

यावेळी लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, माजी महापौर दीपक सुळ, अंबाजोगाईचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर पापा मोदी, विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्हा. चेअरमन समद पटेल, ट्वेंटीवन शुगरचे व्हा. चेअरमन विजय देशमुख, माजी उपनगराध्यक्ष मोहन माने, लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे माजी अध्यक्ष श्रीशैल उटगे, श्री संत शिरोमणी मारुती महाराज सहकारी साखर कारखाना व्हा. चेअरमन सचिन पाटील, माजी चेअरमन-गणपतराव बाजुळगे, पत्रकार- बशीर शेख, व्यंकटेश पुरी, राजकुमार कत्ते, प्रा. सुधीर आणवले, आयुब मणियार, माधव गंभीरे, राजू चिंताले, बालाप्रसाद बिदादा, राजकुमार जाधव, विकास कांबळे, जयराज स्वामी, पूजा पंचाक्षरी, अंजली चिंताले प्रा. शिवाजी जवळगेकर, नारायण कांबळे, बसवंत आप्पा भर्डे, शिवशंकराप्पा बिडवे,ॲड. गंगाधरआप्पा हामने, विजयकुमार चितकोटे, श्रीकांत उटगे, आबासाहेब पाटील, विजयकुमार पाटील, माणिक गायकवाड, गणेश एस.आर.देशमुख, सत्तार शेख, मुख्तार शेख, अमर राजपूत, बादल शेख, सचिन बंडापल्ले, प्रताप पाटील, अंगद गायकवाड, हनुमंत गायकवाड, सुनील यादव, महेश गोजमगुंडे, दिनेश गोजमगुंडे, विक्रम मिरकले, शिवाजी एडके, विवेक साळुंखे, हरिभाऊ गायकवाड, शिवाजी सुरवसे , गोविंद मांडे, अमोल माने आदिसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी कार्यकर्ते,नागरिक उपस्थित होते.

## महेंद्र खंडागळे यांच्या 'भास-आभास' काव्यसंग्रहाचे दिमाखदार प्रकाशन

**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर, दि. २३ जानेवारी :** अहमदपूर च्या सामाजिक, साहित्यिक व व्यावसायिक क्षेत्रात आपल्या कार्यशैलीने नाव कमावताना माणूस म्हणून सर्वांच्या हृदयात वसलेले कवी अभियंता महेंद्र खंडागळे यांच्या 'भास-आभास' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन शेकडो साहित्यप्रेमींच्या उपस्थितीत भारावलेल्या वातावरणात पार पडले. या काव्यसंग्रहाची अभ्यासपूर्ण व आशयगर्भ प्रस्तावना प्रा. फ. म. शाहजिंदे सादर यांनी केली.

कार्यक्रमास विशेष अतिथी म्हणून सुपरचित लेखिका व येथील म. गांधी महाविद्यालय च्या माजी प्राध्यापिका ललिता गादगे यांची उपस्थिती लाभली, कार्यक्रमाचे अध्यक्ष सुप्रसिद्ध कवी अशोक नायगावकर होते. राज्याचे सहकार मंत्री मा. ना. बाबासाहेब पाटील यांनी प्रमुख उपस्थिती दर्शवून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

प्रा. फ. म. शाहजिंदे यांनी आपल्या मनोगतात कवी महेंद्र खंडागळे यांच्या कवितेतील भावनिक प्रामाणिकपणा, शब्दांमागील अनुभवसंपन्नता आणि जीवनाकडे पाहण्याचा संवेदनशील दृष्टिकोन अधोरेखित केला. 'भास-आभास' हा संग्रह केवळ कविता नसून, तो माणसाच्या आतल्या संघर्षांचा, नात्यांचा आणि आत्मशोधाचा दस्तऐवज असल्याचे त्यांनी नमूद केले.

प्रा. ललिता गादगे यांनी कवीच्या लेखनातील आशयगर्भता, साधी पण खोल भाषा आणि वाचकाला स्वतःशी संवाद साधायला लावणारी शैली यांचे सविस्तर विवेचन केले.

अशोक नायगावकर यांनी आपल्या नेहमीच्या मिश्किल, पण टोचून बोलणाऱ्या शैलीत उपस्थितांची दाद मिळवली. आजकाल कविता लिहिताना भावना कमी आणि





प्रदर्शन जास्त असते; मात्र भास-आभास मध्ये भावना आहेत आणि गाजावाजा नाही, अशी फटकेबाजी करत त्यांनी कवीचे कौतुक केले. कविता समाजाशी प्रामाणिक राहिली तरच ती काळ टिकते, असे त्यांनी ठामपणे सांगितले.याच कार्यक्रमात नवनिर्वाचित नगराध्यक्ष ड. स्वप्निल व्हत्ते तसेच उपस्थित नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला. साहित्यिक कार्यक्रमास सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभल्याने कार्यक्रमास विशेष महत्त्व प्राप्त झाले. उपस्थित मान्यवरांचा महेंद्र खंडागळे, सौ संगीता खंडागळे, ड ऋषीकेश व डॉ ओंकरेश खंडागळे आणि डॉ दिपाली खंडागळे यांच्या हस्ते यथोचित सन्मान करण्यात आला.

या कविता संग्रहाचे लेखक महेंद्र खंडागळे यांनी आपल्या भावना व्यक्त करताना कवी कसा झालो या संदर्भात आपले भास व आभास कथित केले.

व्यासपीठावर निमंत्रित मान्यवर व नगराध्यक्ष अँड.स्वप्ननील व्हते , अहमदपूर म.सा.प. चे अध्यक्ष सत्यनारायण काळे व कार्यवाह प्रा द .मा.माने यांची उपस्थिती. मराठवाडा साहित्य परिषद व रोटरी क्लब अहमदपूर हे विनीत होते कवी प्रा अनिल चवळे यांनी कार्यक्रमाचे शब्दबद्ध संचलन केले. यावेळी मोठ्या संख्येने रसिक उपस्थित होते.

एकूणच साहित्य, समाज आणि संस्कृती यांचा सुरेख संगम साधणारा 'भास-आभास' काव्यसंग्रह प्रकाशन सोहळा सर्वांसाठी स्मरणीय ठरला.

## सुभाषचंद्र बोस, ठाकरे यांची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर २३ जानेवारी :** लातूर येथील मातोश्री कलावती प्रतिष्ठान संचलित लॉर्ड श्रीकृष्ण् इंग्लिश स्कुल मध्ये आज नेताजी सुभाष चंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे यांची जयंती उत्साहात साजरी केली.

सर्व प्रथम नेताजी सुभाष चंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन शाळेच्या प्राचार्या रुपाली कुलकर्णी, समन्वयिका रुपाली कोकाटे, नम्रता झांबरे, प्रियांका नागलबोने, विद्या पाटील यांच्या हस्ते करण्यात आली.



विद्यार्थांना भारतातील क्रांतीकारकांची ओळख व्हावी तसेच त्यांचे स्वातंत्र्य लढयातले योगदान काय आहे हे आजच्या तरुण पिढीस कळावे या हेतूने नेताजी सुभाष चंद्र बोस जयंतीचे आयोजन शाळेच्या वतीने केले.

शाळेची विद्यार्थिनी रसिका सूर्यवंशी हिने नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या कार्याची माहिती देत असताना त्यांनी स्थापन केलेली आझाद हिंद फौज व तुम मुझे खून दो, मै तुम्हे आझादी दूंगा या घोषणेची व उल्लेखनीय कार्याची माहिती दिली. या निमित्ताने शाळेचे विद्यार्थी राघव चेवले, शिवांश सुरवसे, विराज आलमले, आयुष वाडेकर, आरुष वाघमारे, सुफियांखान पठाण, शंतनू नराळे, प्रणव शिंदे, राजवीर सोट पाटील, अनिरुद्ध क्षीरसागर, रुद्र मरेवाड, स्वप्नील बनसोडे, प्रतिक हेलाले, रुद्राक्ष आलमले यांनी नेताजी सुभाष चंद्र बोस यांची वेशभूषा साकारून आपले मनोगत व्यक्त केले.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### एक्सप्रेसवेवरील कार्यक्षेत्रातील सुरक्षितता सुधारण्यासाठी अभियंत्यांना प्रशिक्षण

पुणे :त्यांच्या सध्या सुरू असलेल्या झिरो फॅटॅलिटी कॉरिडॉरउपक्रमांतर्गत, सेव्हलाइफ फाउंडेशनने २० जानेवारी २०२६ रोजी मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर अभियंते प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित केली. या उपक्रमाचा उद्देश उच्च-जोखीम असलेल्या रस्ते कॉरिडॉरमध्ये सुरक्षा पद्धती मजबूत करून टाळता येण्याजोग्या रस्ते अपघातातील मृत्यू कमी करणे आहे.आयसीआयसीआय लोम्बार्डच्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सीएसआर) कार्यक्रमांतर्गत समर्थित, प्रशिक्षणात सुरक्षित रस्ते कार्यस्थळ व्यवस्थापनाचे सैद्धांतिक आणि व्यावहारिक पैलू समाविष्ट होते, ज्याचा उद्देश सक्रिय बांधकाम क्षेत्रांमध्ये सुरक्षा मानके सुधारणे आणि अपघाताचे धोके कमी करणे हा होता.

### हायड्रेशन पोर्टफोलिओ केला अधिक बळकट

मुंबई – केनव्ह्यूने आज भारतात 'कम्प्लीट हायड्रेशन'साठी दोन-ब्रँड धोरणाची घोषणा केली असून त्यात ओआरए-सएल आणि एर्झिल यांचा समावेश आहे. डिहायड्रेशन ही वाढती सार्वजनिक आरोग्याची समस्या ठरत असताना, ही रणनीती जुलाबामुळे होणारे तसेच दैनंदिन डिहायड्रेशन – दोन्ही गरजा पूर्ण करणारे नाविन्यपूर्ण उपाय देऊन भारतातील हायड्रेशन श्रेणीतील कंपनीचे नेतृत्व अधिक मजबूत करते. डबल पॉवर फॉर कम्प्लीट हायड्रेशन या ब्रँड धोरणाअंतर्गत, कंपनी ग्राहकांसाठी विज्ञानाधारित दोन हायड्रेशन ब्रँड – औरसल आणि एर्झिल – उपलब्ध करून देणार आहे.

### 'भाभीजी घर पर हैं! – फन ऑन द रन' या चित्रपटाचा धमाल ट्रेलर

मुंबई : 'भाभीजी घर पर हैं!' ही मालिका आता आपल्या विश्र्वाचा विस्तार करत चित्रपटाच्या रूपात सादर होत आहे-'भाभीजी घर पर हैं! – फन ऑन द रन'. झी स्टुडिओज आणि एडिट खख यांनी आज चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित केला असून तो प्रेक्षकांना नेमके जे अपेक्षित आहे तेच देण्याचे वचन देतो – न थांबणारी कॉमेडी, गोंधळ आणि धमाल मनोरंजनाचा पूर्ण डोस! ट्रेडमार्क विनोद, रंगतदार नाट्य आणि अतिशयोक्ती, मोठ्या पडद्याला साजेशा प्रसंगांनी भरलेला हा ट्रेलर प्रेक्षकांना एका झपाट्याने पुढे जाणाऱ्या, खळखळून हसवणाऱ्या सिनेमॅटिक प्रवासाची झलक दाखवतो. झी सिनेमा, संजय कोहली आणि बिनैफर कोहली यांची निर्मिती आणि शशांक बाली यांचे दिग्दर्शन असलेला हा चित्रपट झी स्टुडिओज् ६ फेब्रुवारी २०२६ रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित करणार आहे.

### एलजी इलेक्ट्रॉनिक्स इंडिया लिमिटेड उद्योगात आघाडीवर

छत्रपती संभाजीनगर – उन्हाळ्याच्या शिखर हंगामापूर्वीच, एलजी इलेक्ट्रॉनिक्स इंडिया लिमिटेड , सर्वाधिक विश्र्वासार्ह ब्रँड (इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील)*, यांनी २०२६ च्या नव्या ब्युरो ऑफ एनर्जी एफिशियन्सी (बीईई) स्टार रेटिंग नियमांनुसार पूर्णतः सुसंगत एअर कंडिशनरची संपूर्ण श्रेणी सादर करणाऱ्या पहिल्या ब्रँड्सपैकी एक असल्याची घोषणा केली आहे. एलजीईआयएल च्या या सक्रिय उपक्रमामुळे भारतीय ग्राहकांना आज उपलब्ध असलेल्या सर्वात प्रगत आणि ऊर्जा कार्यक्षम कूलिंग तंत्रज्ञानाचा त्वरित लाभ मिळणार आहे.

### कर्ज घेण्यामागे वैद्यकीय आणीबाणी ही प्रमुख कारण

मुंबई : पैसाबाजारच्या ग्राहक संशोधन अहवालानुसार, शहरांमध्ये वैयक्तिक कर्ज घेण्यामागे वैद्यकीय आणीबाणी ही प्रमुख कारणे आहेत. पैसाबाजारने प्रसिद्ध केलेल्या द पर्सनल लोन स्टोरी या अहवालानुसार, भारतातील ११% कर्जदारांनी वैद्यकीय आणीबाणी आणि वैद्यकीय खर्च भागवण्यासाठी वैयक्तिक कर्ज घेतले. टियर-१ शहरांमध्ये हा आकडा १४% इतका जास्त होता, तर टियर-२ शहरांमध्ये १०% आणि टियर-३ शहरांमध्ये ८% इतका होता. हे आकडे देशातील आरोग्य विम्याची कमी उपलब्धता आणि वाढत्या वैद्यकीय खर्चाकडे निर्देश करतात, ज्यामुळे लोक वैद्यकीय आणीबाणीसाठी वैयक्तिक कर्जावर अवलंबून आहेत.

### ओरिजनल सिरीज देवखेळचा ट्रेलर प्रसिद्ध

मुंबई: मराठी झी५ ने आज त्याच्या आगामी मराठी ओरिजनल सिरीज देवखेळ चा ट्रेलर प्रदर्शित केला. कोकणातील फारशा ऐकिवात नसलेल्या लोककथांपासून प्रेरित, देवखेळ हा एक गहन मानसशास्त्रीय थरारपट आहे. जो शिमगा (होळी) सणाच्या भीतीदायक पार्श्र्वभूमीवर परंपरा, अंधश्रद्धा आणि गुन्हेगारी यांची सरमिसळ करतो. ही सिरीज दिनांक ३० जानेवारीपासून खास झी५ वर स्ट्रीम होणार आहे.

### इनहेलदचेंज मोहीम सुरू

छत्रपती संभाजीनगर : बॉलिवूड अभिनेत्री रवीना टंडन यांच्या साथीने सिप्लाने इनहेलदचेंज नावाचा देशव्यापी जनजागृती उपक्रम सुरू केला असून, इन्सुलिन थेरपीशी संबंधित भावनिक आणि वर्तणुकीतील अडथळ्यांवर मात करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. या वास्तविक जीवनातील अडथळ्यांना तोंड देण्याची गरज अधोरेखित करताना, एंडोक्राइनोलॉजिस्ट डॉ. किशोर डी. खारचे म्हणाले: सोपे आणि अधिक सोयीस्कर पर्याय उपलब्ध करून देताना, या चिंता ऐकून घेण्यासाठी आणि त्यांचे सुलभ निराकरण करण्यासाठी जागा निर्माण करणे आवश्यक आहे..४ इनहेलदचेंज सारखे रुग्ण-केंद्रित शिक्षणाला क्लिनिकल माहितीसोबत जोडणारे जनजागृती उपक्रम उपचारांबद्दलची भीती कमी करण्यात आणि उपचारांवर विश्र्वास निर्माण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावू शकतात.

### गुंतागुंतीची टोटल लॅप्रोस्कोपिक हिस्टरेक्टॉमी यशस्वीरीत्या केली

सातारा : मणिपाल हॉस्पिटल, खराडी येथील डॉक्टरांनी मुंबईतील ४५ वर्षीय महिलेवर अतिशय गुंतागुंतीची टोटल लॅप्रोस्कोपिक हिस्टरेक्टॉमी यशस्वीरीत्या केली. रुग्णाला तीव्र पोटदुखी, अतिप्रमाणात मासिक पाळीतील रक्तस्राव तसेच लघवी करताना त्रास होत होता. ही सर्व लक्षणे गर्भाशयातील प्रचंड आकाराच्या फायब्रॉइडमुळे निर्माण झाली होती. दोन अपत्यांची आई असलेल्या या रुग्णेच्या दोन्ही प्रसूती सिझेरियन पद्धतीने झाल्या होत्या. सुमारे दोन वर्षांपूर्वी तिच्या गर्भाशयात फायब्रॉइड असल्याचे निदान झाले होते.

# आयसीएच नेक्स्ट आणि पेक्लर्स पॅरिस यांची भागीदारी

## भारत-केंद्रित ट्रेंड फोरकास्टिंग रिपोर्ट्सची घोषणा

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. २३ जानेवारी :** भारताच्या आघाडीच्या स्वदेशी ट्रेंड फोरकास्टिंग प्लॅटफॉर्म आयसीएच नेक्स्टने जागतिक कन्सल्टिंग एजन्सी पेक्लर्स पॅरिससोबत धोरणात्मक भागीदारीची घोषणा केली आहे. या सहकार्यांतर्गत 'आयसीएच नेक्स्ट एक्स पेक्लर्स पॅरिस' वेस्टर्न फॅशन श्रेणीतील ट्रेंड फोरकास्ट रिपोर्ट्स लॉन्च करण्यात येणार असून, भारतातील फॅशन आणि लाइफस्टाइल उद्योगासाठी संशोधनाधारित, भारत-केंद्रित ट्रेंड इंटेलिजन्स उपलब्ध करून देण्याचा उद्देश आहे.

भारतातील फॅशन व लाइफस्टाइल बाजाराचे मूल्य २४० अब्ज अमेरिकी डॉलरपेक्षा अधिक असून वार्षिक १० टक्क्यांहून अधिक वाढ होत आहे. मात्र, उद्योगाचा मोठा भाग अजूनही जागतिक ट्रेंड रिपोर्ट्सवर अवलंबून असून भारतीय सांस्कृतिक विविधता, हवामान, शिल्प परंपरा, शरीररचना आणि उपभोग पद्धती यांचा पुरेसा विचार होत नाही. ही उणीव भरून काढण्यासाठी ही भागीदारी महत्त्वाची ठरणार आहे.

आयसीएच नेक्स्टच्या सह-संस्थापक अनुराधा चंद्रशेखर आणि कनिका वोहरा यांनी सांगितले की, भारतीय बाजारासाठी स्थानिक दृष्टिकोनातून ट्रेंड फोरकास्टिंग आवश्यक असून भारत आता केवळ ट्रेंड स्वीकारणारा नाही, तर जागतिक ट्रेंड घडवणारा प्रभावी केंद्रबिंदू बनत आहे. संशोधन, डेटा आणि स्थानिक संस्कृतीवर आधारित ट्रेंड इंटेलिजन्समुळे ब्रँड्सना भविष्याचा अंदाज घेऊन व्यवसाय धोरणे आखण्यास मदत होणार आहे.





## पुलवामा हल्ल्यावर आधारित देशभक्तीपर चित्रपट लवकरच मोठ्या पडद्यावर

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. २३ जानेवारी :** देशभक्तीच्या भावनेला केंद्रस्थानी ठेवत, दहशतवादी हल्ल्यांमुळे सामान्य नागरिकांच्या आयुष्यावर होणारा परिणाम आणि त्यानंतर भारतीय लष्कराकडून दिला जाणारा निर्णायक प्रतिसाद या मुद्द्यांवर आधारित चित्रपट 'द रिटर्न ऑफ द आर्मी मॅन' लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. नय्युम खान एंटरटेनमेंट प्रस्तुत हा हिंदी व तेलुगू भाषेतील चित्रपट ६ फेब्रुवारी रोजी जवळच्या सिनेमागृहात प्रदर्शित होणार आहे.



पुलवामा दहशतवादी हल्ल्यात अतिरेकी गटाकडून मारल्या गेलेल्या एका नागरिकाच्या कथेवर आधारित हा सिनेमा असून, या घटनेनंतर देशभरात निर्माण झालेला रोष, भावनिक तणाव आणि लष्कराची रणनीतिक भूमिका प्रभावीपणे मांडण्यात आली आहे. संवेदनशील विषयाला सिनेमॅटिक फ्रेमवर्कमध्ये सादर करताना, हा चित्रपट भावनिक एंगेजमेंटसोबतच राष्ट्रभावना अधिक बळकट करण्याचे उद्दिष्ट ठेवतो. चित्रपटाचे दिग्दर्शन बाबू भट्ट यांनी केले असून, त्यांच्या परिपक्व दिग्दर्शकीय दृष्टीकोनामुळे कथा अधिक परिणामकारक ठरते. या आयकॉनिक ॲक्शन ड्रामामध्ये गोविंद नामदेव, मनोज जोशी, प्रभाकर (बाहुबली फेम) यांच्यासह शालिनी चव्हाण, शाबास खान, ज्ञानप्रकाश, मुकेश भट्ट, लोकेश शर्मा, अमित शर्मा, मोनिका बंगाळ, दीपक चौबे आदी कलाकार महत्त्वपूर्ण भूमिकांमध्ये दिसणार आहेत. मजबूत स्टारकास्ट, प्रभावी कथा आणि देशभक्तीचा ठोस संदेश यामुळे 'द रिटर्न ऑफ द आर्मी मॅन' हा चित्रपट प्रेक्षकांसाठी एक व्हॅल्यू-ड्रिव्हन सिनेमॅटिक अनुभव ठरण्याची शक्यता आहे.

## आवडता टीव्ही शो आता मोठ्या पडद्यावर

**मुंबई:** 'भाभीजी घर पर हैं! – फन ऑन द रन'. झी स्टुडिओज आणि एडिट खख यांनी आज चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित केला असून तो प्रेक्षकांना नेमके जे अपेक्षित आहे तेच देण्याचे वचन देतो – न थांबणारी कॉमेडी, गोंधळ आणि धमाल मनोरंजनाचा पूर्ण डोस! ट्रेडमार्क विनोद, रंगतदार नाट्य आणि अतिशयोक्ती, मोठ्या पडद्याला साजेशा प्रसंगांनी भरलेला हा ट्रेलर प्रेक्षकांना एका झपाट्याने पुढे जाणाऱ्या, खळखळून हसवणाऱ्या सिनेमॅटिक प्रवासाची झलक दाखवतो. यात प्रेक्षकांच्या परिचयाची ही पात्रे पुन्हा एकदा अनपेक्षित आणि हास्यास्पद परिस्थितींमध्ये अडकताना दिसतात. झी सिनेमा, संजय कोहली आणि बिनैफर कोहली यांची निर्मिती आणि शशांक बाली यांचे दिग्दर्शन असलेला हा चित्रपट झी स्टुडिओज् ६ फेब्रुवारी २०२६ रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित करणार आहे.

## उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेचे तिमाही ३ आर्थिक वर्ष २६ मधील निव्वळ व्याज उत्पन्नाचा उच्चांक, पोहोचले १,000 कोटींवर

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. २३ जानेवारी :** उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेचे एमडी आणि सीईओ श्री. संजीव नौटियाल म्हणाले, भारतातील मॅक्रो इकॉनॉमिक वातावरण हे नेहमीच अनुकूल राहिले आहे, तिमाही २ आर्थिक वर्ष २६ साठी ८.२% च्या मजबूत जीडीपी वाढीने क्रेडिट वाढ आणि सुधारित मालमत्तेच्या गुणवत्तेसाठी सहाय्यक वातावरण तयार झाले आहे. उज्जीवन एसएफबी च्या ठेवी गेल्या तिमाहीच्या तुलनेत ७.७% आणि वार्षिक २२.४% वाढून ४२,२२३ कोटी एवढ्या झाल्या आहेत. क्रेडीट-डिपॉझिट रेशो डिसेंबर २५ पर्यंत ८८% आहे. बँकेच्या नवीन ग्राहकांना दर्जेदार सेवा देण्यावर स्पष्ट लक्ष केंद्रित करून तसेच विद्यमान बँक ग्राहकांना अधिक चांगल्या सेवा देण्यासाठी केलेल्या प्रयत्नांमुळे कासा % सलग २ तिमाहीत २७% च्या वर राहिले. आर्थिक वर्ष २६ चा पहिला भाग मध्ये आधीच घेतलेल्या ठेव दर कपात आणि एकूण तरलता नियोजनामुळे निधीची किंमत कमी होत राहिली

## कलाकारांचे हिवाळी आरोग्याविषयी मंत्र

छत्रपती संभाजीनगर – हिवाळ्यात फिटनेस टिकवणे आव्हानात्मक असले तरी एण्ड टीव्हीवरील लोकप्रिय कलाकारांनी साध्या, शिस्तबद्ध आणि परिणामकारक फिटनेस सवयींमुळे हे उद्दिष्ट साध्य केले आहे. 'घरवाली पेडवाली'मधील पारस अरोरा नियमित स्ट्रेचिंग व बेसिक वर्कआउटवर फोकस करतात. 'हप्पू की उलटन पलटन'मधील सोनल पनवार घरगुती कार्डिओ, योगा व डान्ससह हेल्दी रुटीन फॉलो करतात. तर 'भाबीजी घर पर है २.०'मधील आसिफ शेख योगा, प्राणायाम, चालणे आणि संतुलित आहारावर भर देतात. सातत्य, साधेपणा आणि हेल्दी लाईफस्टाईलमुळे हे कलाकार हिवाळ्यातही फिट आणि एनर्जेटिक राहतात.

ही धमाल पाहण्यासाठी 'हप्पू की उलटन पलटन' रात्री ९.३०, 'घरवाली पेडवाली' रात्री १० आणि 'भाबीजी घर पर है २.०' रात्री १०.३० वाजता दर सोमवार ते शुक्रवार एण्ड टीव्हीवर अवश्य पाहा.

# स्थायी व विषय समित्यांचे सभापतींची निवड बिनविरोध

**तभा वृत्तसेवा**

**खुलताबाद, दि. २३ जानेवारी** :.खुलताबाद गिरीस्थान नगरपरिषदेत आज दि २३ जानेवारी रोजी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६३ तसेच संबंधित नियमांनुसार स्थायी समितीच्या सदस्यांचे नामनिर्देशन व विषय समित्यांच्या सभापतींची निवडणूक घेण्यासाठी विशेष सभा आयोजित करण्यात आली होती.

सदर विशेष सभा गिरीस्थान नगरपरिषद सभागृह, खुलताबाद येथे जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांच्या आदेशानुसार . पिठासीन अधिकारी तथा मुख्याधिकारी . समीर शेख यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. सभेस लोकनियुक्त नगराध्यक्ष, सय्यद आमेर पटेल उपस्थित होते.

कायद्यानुसार आवश्यक कोरम पूर्ण असल्याचे जाहीर करून सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

या विशेष सभेत गिरीस्थान नगरपरिषदेच्या विविध विषय समित्यांची रचना करण्यात आली. त्यानुसार बांधकाम नियोजन, आरोग्य व लाईट, महिला व बालकल्याण, पाणीपुरवठा तसेच शिक्षण, क्रीडा व सांस्कृतिक अशा पाच विषय समित्या गठित करण्यात आल्या. प्रत्येक विषय समितीस पाच सदस्य व स्थायी समितीस सहा पदसिद्ध सदस्य निश्र्चित करण्यात आले.

त्यानंतर विषय समित्यांच्या सभापती पदासाठी नामनिर्देशन प्रक्रिया पार पडली. नियमांनुसार प्राप्त नामनिर्देशन पत्रांची छाननी करण्यात आली. कोणतेही नामनिर्देशन मागे न घेतल्याने सर्व विषय समित्यांचे सभापती बिनविरोध निवडून आल्याचे पिठासीन अधिकारी यांनी जाहीर केले.

निवडून आलेले विषय समित्यांचे सभापती पुढीलप्रमाणे आहेत :

बांधकाम नियोजन समिती : नवनाथ विश्र्वनाथ, बारगळ

आरोग्य व लाईट समिती : शेख समरीन बानो शेख अब्दुल आमेर

महिला व बालकल्याण समिती : अर्चना सचिन पवार

पाणीपुरवठा समिती : शेख मुनिबोद्दीन मुजीबोद्दीन

शिक्षण, क्रीडा व सांस्कृतिक समिती : कैलास मट्टू बारगळ

लोकनियुक्त नगराध्यक्ष सय्यद आमेर, पटेल हे स्थायी समितीचे सभापती असून, सर्व विषय समित्यांचे सभापती हे स्थायी समितीचे पदसिद्ध सदस्य असल्याने स्थायी समितीची रचना पूर्ण झाल्याचे घोषित करण्यात आले.

सदर विशेष सभा शांततेत व कायदेशीर प्रक्रियेनुसार यशस्वीरीत्या पार पडली. उपस्थित सर्व सदस्यांचे आभार मानून राष्ट्रगीतानंतर सभा समाप्त करण्यात आली.

## प्रजासत्ताक दिनाबाबत कलाकारांनी भावना व्यक्त केल्या

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. २३ जानेवारी :** ७७व्या प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्र्वभूमीवर एण्ड टीव्हीवरील लोकप्रिय मालिकांमधील अभिनेत्री प्रियमवदा कांत, गीतांजली मिश्रा आणि विदिशा श्रीवास्तव यांनी आपल्या साजरीकरणाच्या योजना व देशभक्तीप्रती असलेली भूमिका स्पष्ट केली आहे. बालपणीच्या आठवणी, कुटुंबीयांसोबत परेड पाहण्याची परंपरा, संविधानिक मूल्यांचे महत्त्व आणि नागरिक म्हणून जबाबदारी यावर त्यांनी भर दिला.

देशाची विविधता, शिस्तबद्धता, सशस्त्र दलांचे योगदान तसेच सकारात्मक व सर्वसमावेशक भारत घडवण्याबाबत कटिबद्धता व्यक्त करत कलाकारांनी प्रजासत्ताक दिन हा केवळ उत्सव नसून मूल्याधिष्ठित आत्मपरीक्षणाचा दिवस असल्याचे नमूद केले.

दरम्यान, 'हप्पू की उलटन पलटन' रात्री ९.३०, 'घरवाली पेडवाली' रात्री १० आणि 'भाबीजी घर पर है २.०' रात्री १०.३० वाजता सोमवार ते शुक्रवार एण्ड टीव्हीवर प्रसारित होत असून, सर्व भाग झी५ वर उपलब्ध आहेत.

## हिंद-दी-चादर उत्सव अंतर्गत विविध स्पर्धेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. २३ जानेवारी :** शासनाच्या निर्देशानुसार गुरु तेजबहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या जयंती शहीदी समागम वर्षा निमित्त शासनाने हिंद-दी-चादर अंतर्गत त्यांनी दिलेले बलिदान त्यांचे सामाजिक कार्य सर्वाना माहित व्हावे यासाठी महाराष्ट्र शासनाने त्यांच्या जयंती निमित्त विविध उपक्रमाचे आयोजन जिल्हा परिषदेणे घ्यावेत असे निर्देश आहेत त्या अनुषंगाने छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषद अंतर्गत पैठण तालुका स्तरीय स्पर्धेचे आयोजन जि.प.प्रशाला मुलांची पैठण येथे हिंद-दी-चादर,कार्यक्रमाअंतर्गत चित्रकला स्पर्धा,निबंध स्पर्धा,गीत गायन स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

त्या स्पर्धे मधील विजयी विद्यार्थी खालील प्रमाणे.

चित्रकला स्पर्धा:-१) अलमीरा फहीम आतार,इयत्ता ९वी(प्रथम क्रमांक)जि.प.प्रशाला मुलांची पैठण.



२)आरिबा सद्दाम बेग इयत्ता ७ वी(द्वितीय क्रमांक)जि.प.प्रशाला मुलांची पैठण.

गीत गायन स्पर्धा १)मारिया सलीम शेख इयत्ता ९ वी(प्रथम क्रमांक)जि.प.प्रशाला मुलांची पैठण.

२)देवयानी विक्रम खरग इयत्ता ८ वी(द्वितीय क्रमांक)जि.प.केंद्रीय प्राथमिक शाळा कडेठाण.

निबंध स्पर्धा:-१)मशीरा चांद आतार इयत्ता ६वी(प्रथम क्रमांक) जि.प.प्रशाला मुलांची पैठण.

२)फातेमा महेमूद शेख,इयत्ता ६ वी (द्वितीय क्रमांक)पटकावला.

यावेळी पर्यवेक्षक म्हणून,गट साधन व्यक्ती बाळकृष्ण मुळे व क्रीडा विभाग प्रमुख समशेर पठाण यांनी चोख भूमिका बजावली.

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश न्यायालय क.स्तर गंगापुर, ता. गंगापुर जि.औरंगाबाद (श्री.ए.ए. कळमकर साहेब न्यायालय)**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ५४/ २०२६
अंजनाबाई भ्र. किशोर धने व इतर
विरूध्द
निरंक

प्रकरण :- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.
ज्याअर्थी मयत किशोर जनार्धन धने हे दि.०१/१०/२०२५ रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय औरंगाबाद येथे मृत्यु पावले असुन मयत किशोर जनार्धन धने हे कायमचे लासुर स्टेशन, ता.गंगापुर येथील रहिवासी होते. अर्जदार नं.१. अंजनाबाई भ्र.किशोर धने,रा.गोपीनाथ नगर, लासुर स्टेशन,ता. गंगापुर जि.औरंगाबाद २. राज पिता किशोर धने, रा.लासुरगाव रोड, लासुर स्टेशन, सावंगी, ता. गंगापुर जि.औरंगाबाद ३. दिक्षा भ्र. नानासाहेब शितोळे, रा.वडुळे बु. ता. शेवगाव, जि.अहमदनगर ४. कोमल भ्र. सुभाष गायके, रा.जारुल, ता. वैजापुर जि.औरंगाबाद ५. मनिषा भ्र. राजु पंडित, रा.गवळीशिवरा, ता.गंगापुर जि.औरंगाबाद यांनी मयताचे वारस प्रमाणपत्र मिळणे कामी ड.श्री.बी.पी.जोशी, गंगापुर यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.त्याअर्थी अर्जदार नं. १ ते ५ यांना या न्यायालया तर्फे वारस प्रमाणपत्र देणे कामी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप असल्यास जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याचे तारखेपासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात लेखी आक्षेप स्वतः अथवा आपल्या विधीज्ञा मार्फत नोंदवावा. मुदतीचे आत आक्षेप प्राप्त न झाल्यास पुढील कायदेशीर कार्यवाही नियमाप्रमाणे करून अर्जदारांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.
सदरचे जाहीर प्रगटन माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी प्रसिध्दीस देण्यात येत आहे.
दि.२०/०१/२०२६

आदेशावरून
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय क स्तर गंगापूर**

### जाहीर प्रगटन/सायटेशन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब. क. स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

सिव्हिल एम.ए. क्र. ८३७ / २०२५
अर्जदार :- १) सुमनबाई भ्र. मदन अधिकार, वय ५० वर्षे धंदा शेती, रा. अनंतपुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) संकेत मदन अधिकार, वय २७ वर्षे धंदा शेती, रा. अनंतपुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) सौ. माधुरी प्रमोद विसपुते, वय ३४ वर्षे धंदा घरकाम रा. घर नं.८७, चाळीसगाव रोड, कन्नड ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर ४) सौ जया नितीन अहीरराव, वय ३१ वर्षे धंदा घरकाम रा. नामपुर ता. जि. नाशिक ५) सौ. माया राजेंद्र भालेराव, वय २९ वर्षे धंदा घरकाम रा. लक्ष्मीनगर, मोहेगाव जि. नाशिक
विरुद्ध
गैरअर्जदार :- निरंक
प्रकरण :-बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.
या व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ ॲड. एस. पी. लबडे यांचे मार्फत Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत मा. न्यायालयाकडे अर्ज दाखल केला आहे की, असे की, अर्जदार क्र. २ ते ५ हे आपसांत नात्याने सख्खे भाऊ व बहिण असुन अर्जदार क्र. १ ही त्यासर्वांची आई आहे. अर्जदार क्र. १ चे पत्ति व अर्जदार क्र. २ ते ५ यांचे वडील नामे मदन शंकरराव अधिकार हे मौजे अनंतपुर, लासुर स्टेशन ता. गंगापुर येथील रहिवाशी होते, ते दिनांक ५/१०/२०२४ रोजी मौजे अनंतपुर ता.गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहे. मयत मदन शंकरराव अधिकार यांना अर्जदार क्र. १ ते ५ हेच कायदेशीर वारसदार असून अर्जदारांच्या व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाहीत. करीता उपरोक्त अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने, त्यांनी Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र त्यांचे हक्कात देणे बाबत या न्यायालयात अर्ज सादर केला आहेत. त्याअर्थी तमाम जनतेस या व्दारे कळविण्यात येते, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप उजर असल्यास व्यक्तीश अथवा विधीज्ञामार्फत हि सायटेशन नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यात येईल. प्रकणात पुढील तारीख ०४ / ०२ / २०२६ आहे. करीता हे जाहिर प्रगटण माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक २३/०१/२०२६ रोजी दिले.

**कनिष्ठ लिपिक.** **सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय क स्तर गंगापूर**

### जाहीर प्रगटन/सायटेशन

**मा. दिवाणी न्यायाधीश साहेब कनिष्ठ स्तर न्यायालय गंगापूर ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर**

कि. दि. अर्ज क्र. ०७ / २०२६
अर्जदार:-१) शोभाबाई शशिकांत गजहंस वय ५२ वर्ष धंदा घरकाम रा. सुलतानाबाद लासुर स्टेशन ता. गंगापूर जि छत्रपती संभाजीनगर २) विजय शशिकांत गजहंस वय ३८ वर्ष धंदा शेती रा.सुलतानाबाद लासुर स्टेशन ता. गंगापूर जि छत्रपती संभाजीनगर ३) प्रविण शशिकांत गजहंस वय ३३ वर्ष धंदा शेती रा. सुलतानाबाद लासुर स्टेशन ता. गंगापूर जि छत्रपती संभाजीनगर ४) मनीषा सिध्दार्थ साळवे वय ३० वर्ष धंदा घरकाम रा. चौका ता.जि. छत्रपती संभाजीनगर
विरुद्ध
गैरहर्जदार:- निरंक
प्रकरण:-बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.
या व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ ॲड. एस. पी. लबडे यांचे मार्फत Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत मा. न्यायालयाकडे अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र. २ ते ४ हे आपसांत नात्याने सख्खे भाऊ व बहिण असुन अर्जदार क १ ही अर्जदार क. २ ते ४ यांची आई आहे. अर्जदार क. १ चे पती व अर्जदार क. २ ते ४ यांचे वडील नामे शशिकांत धोंडीराम गजहंस हे मौजे सुलतानाबाद लासुर स्टेशन ता. गंगापूर येथिल रहिवाशी होते व ते दिनांक ०६/ १२ /२०२५ रोजी मौजे सुलतानाबाद लासुर स्टेशन ता. गंगापूर येथे मयत झालेले आहे. मयत शशिकांत धोंडीराम गजहंस यांना अर्जदार क. १ ते ४ हे कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाहीत. करीता उपरोक्त अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने, त्यांनी Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र त्यांचे हक्कात देणे बाबत या न्यायालयातअर्ज सादर केला आहेत. त्याअर्थी तमाम जनतेस या व्दारे कळविण्यात येते. अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप उजर असल्यास व्यक्तीश अथवा विधीज्ञामार्फत हि सायटेशन नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांच्या हक्कात त्यानी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यात येईल. प्रकणात पुढील तारीख २३/०२/२०२६ आहे. करीता हे जाहिर प्रगटण माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक २३/०१/२०२६ रोजी दिले.

**कनिष्ठ लिपिक.** **सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय क स्तर गंगापूर**

### जाहीर प्रगटन/सायटेशन

**मा. दिवाणी न्यायाधीश साहेब कनिष्ठ स्तर न्यायालय गंगापूर ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर**

कि. दि. अर्ज क्र. ०७ / २०२६
अर्जदार:-१) शोभाबाई शशिकांत गजहंस वय ५२ वर्ष धंदा घरकाम रा. सुलतानाबाद लासुर स्टेशन ता. गंगापूर जि छत्रपती संभाजीनगर २) विजय शशिकांत गजहंस वय ३८ वर्ष धंदा शेती रा.सुलतानाबाद लासुर स्टेशन ता. गंगापूर जि छत्रपती संभाजीनगर ३) प्रविण शशिकांत गजहंस वय ३३ वर्ष धंदा शेती रा. सुलतानाबाद लासुर स्टेशन ता. गंगापूर जि छत्रपती संभाजीनगर ४) मनीषा सिध्दार्थ साळवे वय ३० वर्ष धंदा घरकाम रा. चौका ता.जि. छत्रपती संभाजीनगी
विरुद्ध
गैरहर्जदार:- निरंक
प्रकरण:-बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.
या व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ ॲड. एस. पी. लबडे यांचे मार्फत Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत मा. न्यायालयाकडे अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र. २ ते ४ हे आपसांत नात्याने सख्खे भाऊ व बहिण असुन अर्जदार क १ ही अर्जदार क. २ ते ४ यांची आई आहे. अर्जदार क. १ चे पती व अर्जदार क. २ ते ४ यांचे वडील नामे शशिकांत धोंडीराम गजहंस हे मौजे सुलतानाबाद लासुर स्टेशन ता. गंगापूर येथिल रहिवाशी होते व ते दिनांक ०६/ १२ /२०२५ रोजी मौजे सुलतानाबाद लासुर स्टेशन ता. गंगापूर येथे मयत झालेले आहे. मयत शशिकांत धोंडीराम गजहंस यांना अर्जदार क. १ ते ४ हे कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाहीत. करीता उपरोक्त अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने, त्यांनी Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र त्यांचे हक्कात देणे बाबत या न्यायालयातअर्ज सादर केला आहेत. त्याअर्थी तमाम जनतेस या व्दारे कळविण्यात येते. अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप उजर असल्यास व्यक्तीश अथवा विधीज्ञामार्फत हि सायटेशन नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांच्या हक्कात त्यानी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यात येईल. प्रकणात पुढील तारीख २३/०२/२०२६ आहे. करीता हे जाहिर प्रगटण माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक २३/०१/२०२६ रोजी दिले.

**कनिष्ठ लिपिक.** **सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय क स्तर गंगापूर**

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# बालेकिल्ले, बुरूज आणि बुलडोझर!

महाराष्ट्राच्या राजकारणात इतिहासातील आदर्शांचे अनुकरण किती होते, या मुद्द्यावर मतभेद असू शकतात. वादविवादही होऊ शकतात. पण, इतिहासातील वानग्यांचा महाराष्ट्राच्या राजकारणावरील प्रभाव अभेद्य आहे याबाबत मात्र कोणाचेच दुमत असू शकत नाही. वानगीदाखल बोलायचे झाले, तर महाराष्ट्राच्या सत्ताकारणाला इतिहासाच्या आदर्श राज्यपद्धतीचा मुलामा देणारे 'शिवशाही'सारखे गोंडस शब्द अनेक वर्षांपासून निवडणुकीच्या राजकारणात घुमत राहिले आहेत. शिवशाहीच्या आणि स्वराज्य स्थापनेच्या आणाभाका घेतच एकत्र येणाऱ्या राजकीय पक्षांनी स्वतःच्याच ताकदीला 'शिवशक्ती'सारखी नावेदेखील बहाल केलेली आहेत आणि राजकारणाच्या प्रचारयुद्धाची वर्णनेदेखील 'रणधुमाळी' वगैरे शब्दांतच होऊ लागली आहेत. या राज्यातील काही राजकीय पक्षांचा कार्यकर्ता हा 'मावळा' असतो, निवडणुकांची रणधुमाळी सुरू झाली की तो युद्धास सज्ज झालेल्या मावळ्याच्या आवेशातच 'रणांगणा'त उतरतो आणि प्रतिस्पर्धी राजकीय पक्ष म्हणजे मुघलांची फौज वगैरे असल्याच्या आवेशांत आपल्या प्रचाराच्या तलवारीपर्यंत, शत्रूचा कोथळा काढण्याची भाषा करतो. महाराष्ट्र हा इतिहासकाळातील लढवय्यांचा देश म्हणून ओळखला जातो. इतिहासकाळातील त्या लढाया आता रणांगणावर होत नसल्या, तरी प्रत्येक मराठी माणसाच्या मनातला मावळा जिवंत ठेवण्यासाठी राजकीय रणांगणावर होणाऱ्या निवडणुकांनाच युद्धभूमी मानून तेथे तलवारी परजण्याची आणि आव्हाने देत शत्रुपक्षास रणांगणावर पराजित करण्याची जबर ऊर्मी मात्र या मातीत अजूनही रुजून राहिली आहे. याचे सारे श्रेय अर्थातच, निःसंशयपणे सध्याच्या राजकारणालाच द्यावे लागेल. 'दगडांचा देश' असलेल्या हा कणखर सह्याद्री देशाच्या संकटकाळात हिमालयाच्या मदतीला धावून गेल्याच्या इतिहासाचा अभिमानही याच भावनेतून अजूनही मनामनांना सुखावत असतो. त्यामुळे राजकारणाने इतिहासाचे अनुकरण केले अथवा न केले असेल, तरी इतिहास जागविण्यात मात्र महाराष्ट्र सर्वांत पुढे आहे, असेच म्हणावे लागेल. त्यामुळेच, महाराष्ट्राच्या राजकारणात प्रस्थापित झालेल्या नेत्यांच्या शिरावर नेहमी संस्थानिक, साखरसम्राट, शिक्षणसम्राट, सहकारसम्राट अशा पदव्यांचे मुकुट चढविले गेले असून त्यांनी राजकीयदृष्ट्या बांधलेल्या मतदारसंघानाही बालेकिल्ले, गड, बुरूज अशीच ओळखही दिली गेली आहे.

निवडणुकांच्या रणभूमीवरील तोफा थंडावल्यानंतर युद्धस्थितीची वर्णने रंगविणाऱ्या माध्यमांच्या मुखातही आजकाल हेच ऐतिहासिक शब्द रूढ झाले असल्याने, महाराष्ट्राच्या राजकारणात एक वेगळीच रंगत आली आहे, हे नाकारता येतच नाही. म्हणूनच, निवडणुकांच्या निकालानंतर चर्चेच्या दिशा बदलतात आणि कोणाचा 'बालेकिल्ला' गमावला, कोणता 'गड' कोणत्या पक्षाने सर केला, कोणते 'बुरूज' ढासळले अशा चर्चा सुरू होतात. कारण, महाराष्ट्राच्या राजकारणात बालेकिल्ला ही संज्ञा केवळ तात्कालिक विजयाची नव्हती, तर एखाद्या राजकीय पक्षाने बांधलेल्या आणि अभेद्य ठरलेल्या मतदारसंघाची होती. अशा प्रकारे भक्कम बांधलेला बालेकिल्ला म्हणजे त्या नेत्याच्या किंवा कोणत्याही राजकीय पक्षाच्या मक्तेदारीचा किंवा राजकीय मालकीचा म्हणूनच ओळखला जायचा. कोणत्याही निवडणुकीत सातत्याने त्याच नेत्याचे किंवा राजकीय पक्षाचे वर्चस्व प्रस्थापित झाले, म्हणजे बालेकिल्ला अभेद्य झाला असे मानले जायचे आणि मतदारसंघाच्या एखाद्या कोपऱ्यात धक्का लागला, तरी 'बुरूज' ढासळू लागल्याच्या चर्चेने वर्तमानकाळातील इतिहासाच्या वानग्यांना धडकी भरायची. गेल्या काही दशकांत अनेक नेत्यांनी आपापले बालेकिल्ले आपल्या राजकीय कौशल्याने, सत्तेला सोबत घेऊन भक्कम केले, तर काही पक्षांनी जनमानसावर पकड प्राप्त करून नवे बालेकिल्ले बांधले. काही पक्षांचे गड निर्माण झाले आणि शत्रूंनी, म्हणजे प्रतिस्पर्धी राजकीय पक्षांनी गडाच्या बुरुजांवर कितीही धडका दिल्या, तरी भक्कम तटबंदीमुळे गडाचे बुरूज ढासळले नाहीत, एवढेच नव्हे, तर बुरुजांच्या तटबंदीला साध्या भेगादेखील पाडणे शत्रूस साध्य झाले नाही.

गेल्या दीड-दोन दशकांत मात्र राजकारणातील या इतिहासातील वानग्यांचे भविष्य उलटेसुलटे होत गेले आहे. वर्षानुवर्षांच्या मेहनतीने बांधलेले अनेक बालेकिल्ले खिळखिळे झाले आहेत, काही बालेकिल्ल्यांची तटबंदी ढासळत चालली आहे, तर काही बुरुजांना भगदाडेही पडू लागली आहेत. काही गड आणि किल्ल्यांचे अवशेषदेखील नामशेष होण्याच्या मार्गावर असल्याने या इतिहासप्रिय राजकारणातून या शब्दांचादेखील 'कडेलोट' वगैरे होणार की काय अशी भीती या राकट अशा दगडांच्या देशात व्यक्त होऊ लागली आहे. तसे झाले, तर राजकारणाची गाडी वर्तमानाच्या रुळावरून धावू लागेल आणि वर्षानुवर्षांची सवय संपुष्टात येऊन सपक राजकारणाचे दिवस सुरू होतील अशीही शंका व्यक्त होऊ लागली आहे. सध्याच्या राजकारणास इतिहासाचा मुलामा देण्यात आघाडीवर असणाऱ्या मावळ्यांच्या फौजेवर आपल्या भाले-तलवारी म्यान करण्याची वेळ येणार असेल, रणभूमीवर शत्रुपक्षाचा कोथळा काढण्यासाठी आणि छाताडावर पाय देऊन उभे राहण्यासाठी सेनापतीकडे फौजा शिल्लक राहणार नसतील तर दोन हात करण्याकरिता पुढे कोणास करावयाचे असा प्रश्न सेनापतींना पडणार आहे. दहा वर्षांपूर्वीच्या दशकात, म्हणजे ढोबळमानाने २००४ ते २०१४ या काळात पश्चिम महाराष्ट्र हा राष्ट्रवादी काँग्रेसचा अभेद्य बालेकिल्ला ठरला होता. मराठवाडा-विदर्भात काँग्रेसने भक्कम तटबंदी उभारली होती, तर सहकाराची ढाल घेऊन काही भागांत राष्ट्रवादी काँग्रेसचे सैनिक जागता पहारा देत होते. २०१४ नंतर राजकारणाची व्याख्याच बदलून गेली आणि नेतृत्वाच्या आधारावर उभे राहिलेले हे गडकिल्ले ढासळू लागले. सेनापतींनीच तहाची निशाणे उंचावून आक्रमकांच्या तंबूत शरणागती पत्करल्यावर किल्ले काबीज करण्यात फारसे कष्ट पडत नाहीत. भाजपने नेतृत्वापेक्षा, निष्ठेस महत्त्व देणाऱ्या कार्यकर्त्यांच्या रूपाने उभी केलेली फौज असे गडकिल्ले काबीज करत सुटली आणि विकासाचे हत्यार परजत प्रस्थापितांची पारंपरिक तटबंदी खिळखिळी केली. राष्ट्रवादी काँग्रेसने सहकार, संस्था आणि स्थानिक सत्ता यांचा वापर करून मजबूत केलेले बालेकिल्ले सर करण्यासाठी सहकार आणि संस्थांना लक्ष्य केले आणि स्थानिक सत्ता काबीज करून राष्ट्रवादीचे बुरूज भेदले. पक्षफुटीच्या तोफा डागल्या गेल्या आणि रणांगणावर न लढता गनिमी काव्याने बालेकिल्ले सर करून टाकले. तरीही, अजूनही महाराष्ट्रात या पक्षाचा झेंडा एखाद्या किल्ल्यावर फडकलेला दिसतो. तो काबीज करणे सोपे नाही, हे लक्षात आल्यावर येथे अधनूमधून तहाची बोलणी होते, वाटाघाटी केल्या जातात, आणि खलबते शिजली की हा किल्लादेखील मांडलिकत्वाची भूमिका मान्य करतो. श्रद्धेचा मुद्दा समोर आला की बाळासाहेब ठाकरे यांनी बांधलेल्या बालेकिल्ल्यांचा इतिहास टाळता येत नाही. मुंबईशी रोजीरोटीचे नाते असलेल्या कोकण प्रांतास आपलेसे करण्याचे ठरवून बाळासाहेबांनी आपल्या फौजेत कोकणातील मावळ्यांना सामावून घेतले आणि मुंबई-ठाण्याचा गड काबीज केल्यानंतर कोकणाचा बालेकिल्ला बांधणे सोपे झाले. अनेक दशके या बालेकिल्ल्याची तटबंदी अभेद्य होती. तिच्या बुरुजाला धक्का लावणेदेखील कोणास शक्य होणार नाही, अशा हिमतीने कोकणातील शिवसैनिक छातीचा कोट करून संरक्षणासाठी सज्ज होता. पुढे काही मावळ्यांनीच बंड केले आणि या बुरुजाची तटबंदी ढासळत गेली. असे झाले की तटबंदीमुळे अभेद्य राहिलेले गडदेखील गुडघे टेकतात. मुंबईचा अभेद्य गड यामुळेच खिळखिळा झाला, बुरुजांवर भगदाडे पडली, तटबंदी ढासळत गेली आणि मावळ्यांच्या फौजादेखील गडावरच चाल करू लागल्या. आता हा गड हातातून गेल्यातच जमा आहे, याची जाणीव सध्याच्या सेनापतीस झाल्याने तहाचे निशाण हाती घेऊन कोणासोबत जाता येईल याची चाचपणी सुरू झाली आहे. मुंबईचा किल्ला मजबूत होता. हातोडा मारून त्याचे दगडदेखील हलणार नाहीत, हे लक्षात आलेल्या आक्रमकांनी या बालेकिल्ल्यावर थेट बुलडोझरच चढविल्याने, आता त्यावरचा झेंडा उतरवावा लागला आहे. उद्या या गडावर फडकणाऱ्या झेंड्याचा रंग मात्र, इतिहासाच्या आठवणी जिवंत ठेवणाराच असेल.

## प्रासंगिक

**पीयूष गोयल**

# नवीन वर्ष, नवीन गती

नवीन वर्ष भारताच्या वाणिज्य आणि उद्योग क्षेत्रासाठी नवीन आत्मविश्वास आणि आशावाद घेऊन आले आहे. २०२५ मध्ये उचललेली निर्णायक पावले व्यापार आणि गुंतवणुकीला गती देण्यास, लहान व्यवसाय आणि स्टार्टअप्ससाठी जागतिक बाजारपेठेतील प्रवेश विस्तारण्यास, रोजगार निर्माण करण्यास आणि प्रत्येक नागरिकासाठी जीवन सुलभ करण्याच्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ध्येयाला पुढे नेण्यास सज्ज आहेत. स्टार्टअप्सना प्रोत्साहन देणे हा मोदी सरकारचा एक प्रमुख उपक्रम राहिला आहे. आज भारतात २ लाखांहून अधिक सरकारमान्य स्टार्टअप्स आहेत. स्टार्टअप इंडियाच्या १० व्या वर्धापनदिनानिमित्त पंतप्रधानांनी म्हटल्याप्रमाणे, आपले स्टार्टअप्स विविध समस्यांवर उपाय देत आहेत आणि भारतीय अर्थव्यवस्थेला लवचीक व आत्मनिर्भर बनण्यास मदत करत आहेत. स्टार्टअप्सना पाठिंबा देणे हा मोदी सरकारच्या आर्थिक वाढीला गती देऊन रोजगार निर्माण करण्याच्या तसेच प्रत्येक नागरिकाचे, विशेषतः गरिबांचे जीवनमान सुधारण्याच्या व्यापक धोरणाचा एक भाग आहे.

पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली २०१४ पासून भारताने केलेल्या परिवर्तनशील प्रवासात २०२५ हे एक महत्त्वाचे वर्ष ठरले. धाडसी निर्णय आणि दूरगामी सुधारणांद्वारे, आमच्या सरकारने व्यावसायिक वातावरणाला नव्याने आकार दिला आहे, त्याचबरोबर प्रत्येक धोरण हे नागरिकांचे, विशेषतः अतिशय गरीब लोकांचे जीवनमान सुधारण्यास हातभार लावेल याची खात्री करण्यात आली आहे. भारत हा आता जागतिक आकर्षणाचे केंद्र बनला आहे आणि एक विश्वासार्ह भागीदार म्हणून ओळखला जात आहे. भारताची एकूण निर्यात २०२४-२५ मध्ये ६ टक्क्यांनी वाढून विक्रमी ८२५.२५ अब्ज डॉलर्सवर पोहोचली आहे. जागतिक अनिश्चितता असूनही विकासाची गती कायम राहिली आहे. निर्यातदारांना आणखी पाठिंबा देण्यासाठी सरकारने २५,०६० कोटी रुपयांच्या निर्यात प्रोत्साहन अभियानाची घोषणा केली आहे.

**जन विश्वास आणि व्यवसाय सुलभता :** २०२५ च्या निरसन आणि सुधारणा कायद्याने ७१ कालबाह्य कायदे रद्द केले, त्यापैकी काही १८८६ सालापासूनचे होते. जन विश्वास उपक्रमांतर्गत मोदी सरकारने अनेक किरकोळ गुन्ह्यांमधील फौजदारी तरतुदी काढून टाकल्या आहेत. या सुधारणांमुळे सुशासनाला चालना मिळते, व्यवसाय सुलभता वाढते आणि भारताची कायदेशीर चौकट आधुनिक अर्थव्यवस्थेशी सुसंगत राहते याची खात्री होते.

संसदेच्या गेल्या वर्षीच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान, जहाज वाहतूक आणि बंदरांशी संबंधित पाच महत्त्वपूर्ण विधेयके मंजूर करण्यात आली. हे कायदे दस्तऐवजीकरण सुलभ करतात, विवाद निराकरण सोपे करतात आणि लॉजिस्टिक्सचा खर्च लक्षणीयरीत्या कमी करतात. वाणिज्य क्षेत्रात परकीय व्यापार महासंचालनालयाने पारदर्शक आणि सुलभ धोरणांद्वारे निर्यातदारांना सक्रियपणे पाठिंबा दिला आहे, ज्यामुळे व्यवसाय करण्याची सुलभता वाढली आहे.

**मुक्त व्यापार करार आणि 'लोकल फॉर ग्लोबल' :** स्थानिक उद्योजक विशेषतः लहान व्यवसाय, स्टार्टअप्स, शेतकरी आणि कारागीर यांना प्रोत्साहन देणे आणि त्यांना जागतिक स्तरावर यशस्वी होण्यासाठी सक्षम करणे हे भारताच्या व्यापार आणि गुंतवणूक धोरणाचे एक मार्गदर्शक तत्त्व राहिले आहे. या दृष्टिकोनाचा पाठपुरावा करत, भारताने गेल्या वर्षी तीन मुक्त व्यापार करार (एफटीए) केले, ज्यामुळे भारतीय वस्तूंना यूके, न्यूझीलंड आणि ओमानच्या विकसित बाजारपेठांमध्ये शुल्कमुक्त प्रवेश मिळाला. मुक्त व्यापार करार हे देखील सुधारणा प्रक्रियेचा एक भाग आहेत. पूर्वी यूपीए सरकारने राष्ट्रीय हिताकडे दुर्लक्ष करून जागतिक स्तरावर भारताशी स्पर्धा करणाऱ्या देशांसोबत निष्काळजीपणे करार केले होते. मोदी सरकारने विकसित देशांसोबतच्या मुक्त व्यापार करारांना योग्यरीत्या प्राधान्य दिले आहे आणि दोन्ही पक्षांसाठी फायदेशीर ठरतील असे करार केले आहेत. हे मुक्त व्यापार करार रोजगार निर्मितीला गती देतील, गुंतवणुकीला चालना देतील आणि संपूर्ण भारतातील लहान व्यवसाय, विद्यार्थी, महिला, शेतकरी आणि तरुणांसाठी परिवर्तनकारी संधी उपलब्ध करून देतील.

**भारताच्या हितांचे संरक्षण :** या करारांव्यतिरिक्त स्वित्झर्लंड, नॉर्वे, आईसलँड आणि लिक्टेनस्टाईन यांचा समावेश असलेल्या युरोपियन फ्री ट्रेड असोसिएशनसोबतचा मुक्त व्यापार करार, ज्यावर २०२४ मध्ये स्वाक्षरी झाली होती, तोही कार्यान्वित करण्यात आला आहे. सर्व मुक्त व्यापार करारांमधील एक समान सूत्र म्हणजे भारताच्या कृषी आणि दुग्ध क्षेत्रांचे संरक्षण, ज्यात न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलियासारख्या प्रमुख जागतिक दुग्ध उत्पादक देशांसोबतच्या करारांचाही समावेश आहे. न्यूझीलंडने पुढील १५ वर्षांत २० अब्ज डॉलर्सच्या थेट परकीय गुंतवणुकीची वचनबद्धता दर्शवली आहे.

**भारत : एक जागतिक गुंतवणुकीचे केंद्र :** २०२४-२५ पर्यंतच्या गेल्या ११ आर्थिक वर्षांमध्ये भारताने ७४८ अब्ज डॉलर्सची थेट परकीय गुंतवणूक आकर्षित केली जी मागील ११ वर्षांत मिळालेल्या ३०८ अब्ज डॉलर्सच्या गुंतवणुकीच्या सुमारे अडीच पट आहे. हे फार महत्त्वाचे आहे कारण मोदी सरकारने एक गैरव्यवस्थापित अर्थव्यवस्था वारशाने स्वीकारली होती, जिला एकेकाळी जगातील सर्वांत नाजूक पाच अर्थव्यवस्थांपैकी एक म्हणून ओळखले जात होते. यूपीए सरकारच्या काळात वारंवारच्या आर्थिक धक्क्यांमुळे विकसित देशांनी भारतासोबतच्या व्यापार चर्चांमधून माघार घेतली होती.

**गरिबांना मदत करण्यासाठी सुधारणा :** भारताने २०२५ या वर्षाचा शेवट मोठ्या यशाने केला, जपानला मागे टाकून भारत जगातील चौथी सर्वांत मोठी अर्थव्यवस्था बनला आणि आता जर्मनीला मागे टाकण्याच्या मार्गावर तो ठामपणे वाटचाल करत आहे. महत्त्वाचे म्हणजे, यूपीए सरकारच्या काळाच्या विपरीत, आर्थिक लाभांचा फायदा सर्वांत गरीब लोकांपर्यंत, विशेषतः ग्रामीण भारतातील लोकांपर्यंत पोहोचला आहे. कामगारांसाठी फायदे वाढवण्यासाठी मोदी सरकारने ऐतिहासिक कामगार सुधारणा केल्या आहेत, ज्यामध्ये २९ विखुरलेले कायदे चार आधुनिक संहितांमध्ये विलीन केले आहेत. योग्य वेतन, वेळेवर पगार, सामाजिक सुरक्षा आणि सुरक्षितता यावर लक्ष केंद्रित केले आहे.

**पुढील वाटचाल :** २०२५ हे सेतू बांधण्याचे वर्ष होते: देशांतर्गत उद्योग आणि जागतिक मागणी यांच्यात; धोरणात्मक सुधारणा आणि डिजिटल सक्षमीकरण यांच्यात; तसेच उदयोन्मुख लहान व्यवसाय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठा यांच्यात.

पुढे आणखी खूप उत्साहवर्धक गोष्टी घडणार आहेत. नीती आयोगाचे सदस्य राजीव गौबा यांच्या नेतृत्वाखालील एक समिती व्यापक सुधारणांचा अभ्यास करत आहे. यामुळे पंतप्रधान मोदींच्या रिफॉर्म एक्सप्रेसला आणखी गती मिळेल. भारत जसजसा पुढे जात आहे, तसतसा स्पर्धात्मक व्यापार, नावीन्यपूर्ण उद्योग आणि आत्मविश्वासपूर्ण व आत्मनिर्भर असलेल्या लवचीक अर्थव्यवस्थेद्वारे विकसित भारताची उभारणी करण्याची दृष्टी भारतासमोर स्पष्ट होत आहे. भारताचे निर्यातदार, उत्पादक, शेतकरी आणि सेवा पुरवठादारांचे यश हेच राष्ट्राचे यश आहे.

भारत केवळ भविष्याची तयारी करत नाही, तर तो भविष्य घडवत आहे. निर्णायक नेतृत्व, धाडसी सुधारणा आणि स्पष्ट जागतिक धोरणामुळे देशाच्या महत्त्वाकांक्षेला कृतीची जोड मिळाली आहे. भारत जगासोबत व्यापार करतो, विकास करतो, नवनवीन शोध लावतो आणि संबंध प्रस्थापित करतो, तेव्हा तो एक सामर्थ्यवान, आत्मनिर्भर आणि विश्वासार्ह देश म्हणून आपल्या स्वतःच्या अटींवर हे सर्व करतो.

(लेखक केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री आहेत)

## वेध

**रेवती जोशी-अंधारे**

# क्रिकेटमध्येही 'खेला होबे'!

क्रिकेटप्रेम हा नवा धर्म आहे, हे विधान धाडसाचे ठरणार नाही. धर्मांध सूडाग्नीने पेटलेल्या बांगलादेशने मात्र या धर्माशी प्रतारणा केली आहे. भारतासारख्या धर्मनिरपेक्ष देशात होऊ घातलेल्या झटपट क्रिकेटच्या विश्वचषक स्पर्धेसाठी जगभरातील क्रिकेट चाहते उत्सुक आहेत. पण, बांगलादेशने या आयोजनात मिठाचा खडा घातला आहे. भारताविषयी विनाकारण आकस ठेवून विश्वचषक स्पर्धेत खेळण्यास नकार देणाऱ्या दिवाळखोर बांगलादेशचा सर्वार्थाने 'खेला' होणार आहे.

क्रीडा, फॅशन, फिल्म आणि संगीत या क्षेत्रांना सीमांचे बंधन नाही, हे तर आम्ही बरीच वर्षे ऐकलेले सुविचार आहेत पण, कदाचित बांगलादेशींना अशी शिकवण कोणी दिली नाही. म्हणूनच, बिघडलेल्या राजकीय संबंधांचे प्रतिबिंब क्रिकेटच्या मैदानावर पाडण्याची 'नादानी' त्यांना सुचली आहे. पण, हे करताना 'बाप तो हमेशा बाप ही रहेगा' या पाकिस्तानला माहिती असलेल्या सत्याचा, बांगलादेशला मात्र विसर पडला आहे. आमची टीम भारतीय मैदानांवर खेळणार नाही, आमची व्यवस्था सहआयोजक श्रीलंकेच्या मैदानावर करून द्या, अशी मागणी बांगलादेश क्रिकेट मंडळाने आंतरराष्ट्रीय क्रिकेट नियामक मंडळाकडे केली. पण, आयसीसीने त्यांच्या या मागणीला अजिबात भीक न घालता, खेळायचे असेल तर भारतातच खेळावे लागेल, असा सज्जड दम भरला. भारताचे उपकार विसरलेल्या बांगलादेशने स्पर्धेत न खेळण्याचा निर्णय घेतला आणि स्कॉटलॅण्डचा स्पर्धेत प्रवेश झाला.

बांगलादेश क्रिकेटचा इतिहासच मुळात भारताने लिहिला आणि दुर्दैवाने त्याच जोरावर आज ही मुजोरी सुरू आहे. वर्ष १९९८ पर्यंत बांगलादेश आयसीसीचा पूर्णकालीन सदस्य नसतानाही, मंडळाचे तत्कालीन अध्यक्ष जगमोहन डालमिया यांनी ढाक्यातील वंगबंधू नॅशनल स्टेडियममध्ये आयसीसीची नॉकआऊट टूर्नामेंट आयोजित केली. या आयोजनामुळे बांगलादेश क्रिकेटला जगभरात ओळख मिळाली. भारत, पाकिस्तान आणि श्रीलंकेच्या पाठिंब्यामुळेच जून २००० मध्ये आयसीसीने बांगलादेशला टेस्ट क्रिकेट स्टेटस दिला. त्याच वर्षी नोव्हेंबर महिन्यात बांगलादेश डेब्यू कसोटी सामना भारताच्याच विरोधात ढाक्यात खेळला. विशेष म्हणजे कर्णधार म्हणून सौरव गांगुलीचाही हा पहिलाच कसोटी सामना होता. यानंतरही दोन्ही देशांमध्ये नियमितपणे क्रिकेट सामन्यांच्या मालिका खेळल्या गेल्या. भारतीय क्रिकेट संघ, भारतीय खेळाडू यांच्याभोवतीचे वलय बघता, या मालिकांचा अप्रत्यक्षरीत्या फायदा बांगलादेश क्रिकेटलाच मिळाला. पण, गेल्या दोन वर्षांत बांगलादेश बदलत्या राजकारणामुळे भारताला सोडून, नवे मित्र जोडण्यास उत्सुक झाला आहे. बीसीबीच्या निर्णयामागे दोन कारणे दिसतात. पहिले म्हणजे आयपीएलमधून मुस्तफिजुर रहमानची हकालपट्टी! अभिनेता शाहरुख खानच्या मालकीच्या कोलकाता नाईट रायडर्सने रहमानला साभार परत केल्यानंतर, अकडूपणा दाखवत बांगलादेशने आयपीएल प्रसारणावर बंदी घालण्याचा निर्णय घेऊन आर्थिक दिवाळखोरीची पायाभरणी केली. तर, दुसरे कारण म्हणजे बांगलादेशातील सत्तापालटानंतर भारताच्या आश्रयाला आलेल्या शेख हसीना! शिवाय, बीसीसीआयच्या कठोर भूमिकेनंतर भारत-पाकिस्तान सामने दुबईत खेळवले गेले. या पृष्ठभूमीवर आपणही संधी साधावी, असा केविलवाणा प्रयत्न बांगलादेशने करून बघितला. पण, कुठे भारतीय क्रिकेट नियामक मंडळ ज्यांचे वार्षिक उत्पन्न जवळपास १० हजार कोटी रुपये आहे जे आयसीसीच्या उत्पन्नापेक्षाही जास्त आहे आणि कुठे बांगलादेश क्रिकेट बोर्ड ज्यांची वार्षिक कमाई ४२५ कोटी इतकी आहे. भारतीय चलनात एका टक्याची किंमत ७५ पैसे आहे, हे उल्लेखनीय! 'कहां राजा भोज, कहां गंगूतेली' असेच हे समीकरण आहे. या सगळ्यावर कडी म्हणजे बीसीबीचा अध्यक्ष आसिफ नजरुलचे वक्तव्य! 'आम्ही कोणाच्याही दबावाला बळी पडणार नाही. बांगलादेश विश्वचषक खेळला नाही तर काय परिणाम होतील, हे जग बघेल,' असा धमकीवजा इशारा नजरुलने क्रिकेटजगताला दिला आहे. बांगलादेशचे सामने भारताऐवजी श्रीलंकेत खेळवावेत का? यावर आयसीसीने घेतलेल्या एकूण १६ देशांच्या मतदानात फक्त पाकिस्तान आणि बांगलादेशने समर्थनाचे मत दिले आणि उर्वरित १४ देशांनी याचा विरोध केला. दररोज सरासरी एका हिंदूची हत्या करणाऱ्या बांगलादेशींना भारतात येणाऱ्या त्यांच्या क्रिकेट चमूच्या सुरक्षेची काळजी आहे, म्हणे! खरे तर आम्हीच बांगलादेशासोबत खेळणार नाही, पाकिस्तानप्रमाणे त्यांच्यासोबतही औपचारिक वागणूक ठेवू ही भूमिका भारतीय क्रिकेटनेच घ्यायला हवी होती. पण, आपल्या मनावर 'सुविचार' पक्के कोरलेले असल्यामुळे, उदारमतवादी भूमिका घेणाऱ्या भारतापुढे बांगलादेश अडेलतट्टूपणा करतोय. परिणामी, आंतरराष्ट्रीय क्रिकेट राजकारणात बांगलादेशचाच 'खेला होबे'!

९८५०३३९२४०

## दखल

**मोरेश्वर बडगे**

# एकनाथ शिंदे म्हणजे उद्धव ठाकरे नाहीत

मुंबई महापालिकेत तब्बल २५ वर्षांनी भाजपची सत्ता येताना दिसत आहे. खऱ्या अर्थाने उद्धव ठाकरे आणि त्यांच्या शिवसेनेची सत्ता खालसा झाली आहे. मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत भाजप हा सर्वांत मोठा पक्ष म्हणून निवडून आला आहे. पण बहुमतासाठी आवश्यक २५ जागा कमी पडल्याने युतीतला मित्रपक्ष एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेची भाजपला मदत घ्यावी लागते आहे. पण मुंबईचा महापौर भाजपचाच होणार हे पक्के. 'देवाची कृपा झाली तर आमचा महापौर बसेल' असे बोलून उद्धव ठाकरे यांनी खळबळ उडवून दिली खरी. शिंदे यांनीही आपले नगरसेवक हॉटेलमध्ये ठेवून सनसनाटी पसरवली. पण काहीही झाले तरी एकनाथ शिंदे हे 'उद्धव ठाकरे' नाहीत. देवेंद्र फडणवीस आणि भाजप यासारख्या विश्वासार्ह मित्रपक्षाशी गद्दारी करणे म्हणजे स्वत:साठी खड्डा खोदणे आहे हे त्यांना छान कळते. शरद पवारांनी २०१९ मध्ये मुख्यमंत्रिपदाचे गाजर दाखवताच उद्धव ठाकरे धावत सुटले होते. शिंदे हे त्यातले नाहीत. ते ताणून धरू शकतात. पण तुटू देणार नाहीत. 'माझा बाप चोरला' अशी ओरड उद्धव ठाकरे नेहमीच करतात. मात्र बाळासाहेबांचा खरा वारस एकनाथ शिंदेच आहेत. त्यांनी ते कृतीने दाखवूनही दिले आहे. 'ठाकरे ब्रॅण्ड'चा बॅण्ड वाजला आहे. त्यामुळे मीडियामध्ये कशाही बातम्या रंगून येऊ द्या. महापौर भाजपचाच होणार. गुंतवणूकदारांच्या जागतिक परिषदेसाठी देवेंद्र फडणवीस दावोसला गेले आहेत. २४ जानेवारीला ते भारतात येतील. त्यानंतर हालचाली वाढतील. देवाभाऊ म्हणजेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सामर्थ्यशाली नेतृत्वाने हा चमत्कार घडवला आहे. देवाभाऊ नसते तर? साधी गोष्ट नव्हे. जन्माने नागपूरकर असलेल्या फडणवीसांनी मुंबई जिंकून दाखवली आहे. लोकसभा निवडणुकीतल्या धक्क्यानंतर फडणवीसांनी विधानसभा जिंकली. नंतर नगर परिषद निवडणुका जिंकल्या आणि आता महापालिका. पुढच्या महिन्यात जिल्हा परिषद निवडणुका आहेत.

मुस्लिम व्होट बँकेवर विश्वास ठेवणे उद्धव ठाकरे यांच्या अंगलट आले. मुख्यमंत्री होण्याच्या स्वार्थापायी ठाकरेंनी हिंदुत्व सोडले. हिंदू सोडून जातील म्हणून 'सेक्युलर' बनले. मुस्लिम, दलित आणि मराठी माणूस या फॉर्म्युल्यावर आपण निवडणूक काढू असा ठाकरेंना विश्वास होता. पण मुस्लिम मतदारांची एक स्पेशालिटी आहे. जेव्हा पर्याय उपलब्ध असतो तेव्हा ते मुस्लिम पर्याय



निवडतात. पर्याय नसेल तर ते भाजपविरोधकाला निवडतात. विधानसभेत त्यांना उद्धव ठाकरे यांच्या रूपात पर्याय सापडला. मात्र आता महापालिका निवडणुकीत त्यांना एमआयएम पक्षाच्या रूपात पर्याय सापडला होता. मुसलमान आपल्यासोबत नाहीत हे ठाकरेंना उमगले तेव्हा उशीर झाला होता. मालेगावमध्ये ६१ जागांवर मुस्लिम उमेदवार निवडून आले. छत्रपती संभाजीनगरमध्ये एमआयएमने ३३ जागा जिंकल्या. हिंदूंनी अंतर्मुख होऊन विचार करावा असे हे निकाल आहेत. ठाकरे असा विचार करू शकत नाहीत. त्यांना फक्त मुंबई खिशात पाहिजे होती. मुंबई पाहिजे म्हणजे मुंबईची तिजोरी पाहिजे. मराठी माणूस वाचवायचा आहे हे त्यांचे बोलणे शुद्ध भंकसपणा होता. मुंबई महापालिकेचे वर्षाचे बजेट ७५ हजार कोटी रुपये आहे. त्याशिवाय, केंद्र सरकारचा निधी म्हणून विविध योजनांसाठी ५० हजार कोटी रुपये या महापालिकेला दरवर्षी येतात. म्हणजे एकट्या मुंबई महानगर प्रदेशात वर्षाला दोन हजार कोटी रुपये खर्चायला मिळतात. म्हणूनच सारी मारामारी या सोन्याच्या कोंबडीसाठी असते. या निवडणुकीत फडणवीस यांनी विकास हाच अजेंडा पुढे केला. विकासाच्या नावावर मतं मागितली. ठाकरेंनी मराठीच्या अस्मितेचा इश्यू केला. त्यासाठी राज ठाकरे या आपल्या भावाला सोबत घेतले. पण मराठी माणूस आता शहाणा झाला आहे हे दोन्ही भाऊ विसरले. राज ठाकरेंनी गौतम अदानी या उद्योगपतीवर हल्लाबोल करून काय मिळवले? हाही प्रश्न आहेच. मुंबई हे कॉस्मोपॉलिटन शहर आहे. साऱ्या जातिधर्माची माणसे इथे पोटासाठी येतात. इथे तामिळ मतदारही चांगल्या संख्येने आहेत. त्यांचा नेता भाजपचे अण्णामलाई प्रचारासाठी आले होते. राज ठाकरेंनी 'रसमलाई' म्हणत त्याची टिंगल उडवली. राज ठाकरे यांच्या सभांना गर्दी होते. मात्र ही गर्दी मतांमध्ये परिवर्तित होत नाही हा नेहमीच अनुभव आहे. या वेळीही तसेच घडले. अवघ्या ६ जागांवर मनसेला समाधान मानावे लागले. २० वर्षांनंतर एकत्र आलेले हे भाऊ आता किती दिवस एकत्र राहतात तेच पाहायचे. राज यांच्याऐवजी उद्धव ठाकरेंनी काँग्रेसला सोबत घेतले असते तर निकाल काही वेगळे असते. आताही लातूर, कोल्हापूर, परभणी, चंद्रपूर अशा शहरांमध्ये काँग्रेसने आपले अस्तित्व दाखवले. पण उद्धव यांना आपल्या शक्तीचा मोठा अहंकार होता. ते मुख्यमंत्री असतानाच्या अडीच वर्षांच्या काळात महाराष्ट्राला त्याचे दर्शन झाले. कंगना राणावत ही प्रसिद्ध अभिनेत्री तेव्हा उद्धवना म्हणाली होती, ''आज मेरा घर टूटा है. कल तेरा घमंड टूटेगा.' तिची शापवाणी खरी ठरली. उद्धव यांच्या हातातल्या सत्तेच्या ठिकऱ्या उडाल्या. नियतीचा खेळ पाहा. उद्धव आज एकदम रिकामे झाले आहेत. चार वर्षांपूर्वी देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरेंना एक इशारा दिला होता. ''तुम्ही म्हणजे मराठी नाही, तुम्ही म्हणजे मुंबई नाही, तुम्ही म्हणजे महाराष्ट्र नाही.'' आता 'तुम्ही म्हणजे बाळासाहेब ठाकरेसुद्धा नाही' हे मुंबईच्या मतदारांनी दाखवून दिले आहे. मुंबई जिंकणं सोपं नव्हतं. स्थापनेच्या ४५ वर्षांनंतर भाजपच्या हातात मुंबई महापालिका आली आहे. हिंदुत्वाचा ब्रॅण्ड आणि विकासाचा अजेंडा या जोरावर फडणवीस यांनी हे यश कमावलं. फडणवीस यांनी केवळ ठाकरेंना संपवले नाही तर शरद पवार नावाचे संस्थानही खालसा केले. यावेळी नरेंद्र मोदी किंवा अमित शाह यापैकी कोणीही प्रचाराला आले नव्हते. आपल्या टीमच्या जोरावर फडणवीस यांनी मुंबई जिंकून दिली. निवडणुका जिंकून देणारा मुख्यमंत्री अशी फडणवीस यांची ख्याती झाली आहे. सध्या उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना यासाठी ओळखले जाते. त्या जोडीला आता फडणवीस आले आहेत. गुजरातचे मुख्यमंत्री असताना नरेंद्र मोदी यांनी राज्याचा विकास आणि पक्षाचा विस्तार केला. मोदींनी केले तेच फडणवीस करीत आहेत. विकासपुरुषाचा अजेंडा आहे. मुंबईतला धारावीचा प्रकल्प मार्गी लागला, बुलेट ट्रेन धावू लागली तर फडणवीस यांची राजकीय उंची किती वाढेल याची कल्पनाच करवत नाही.

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## वसंत पंचमी आणि त्याचे महत्त्व

भारतातील धार्मिक आणि सामाजिक-सांस्कृतिक परंपरांचा अगदी थोडासा अनुभव असलेल्या व्यक्तीलाही हे ठावूक आहे की, वसंत पंचमी हा सण संपूर्ण देशभर मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. हिंदू समाजासाठी हा सण कुटुंबीय व मित्रमंडळींच्या आनंदी पुनर्मिलनाचा दिवस असतो.

**धार्मिक व ज्योतिषशास्त्रीय महत्त्व :** हिंदू उपासना परंपरेच्या अभ्यासकांसाठी आणि भारतीय ज्योतिषशास्त्राच्या जाणकारांसाठी वसंत पंचमी हा अत्यंत शुभ दिवस आहे. धार्मिक दृष्टिकोनातून, हा माघ नवरात्र कालावधीतील देवीपूजेचा मुख्य दिवस मानला जातो. ज्योतिषशास्त्राच्या दृष्टिकोनातून, हा दिवस एवढा शुभ मानला जातो की कितीही अमंगलकारी योग जरी असले तरीही उपनयन, विवाह आणि इतर शुभ कार्य या दिवशी कोणत्याही संकोचाशिवाय करता येतात.

**निसर्गाच्या दृष्टीने खऱ्या नववर्षाचा प्रारंभ :** जर आपण निसर्गशास्त्रीय दृष्टिकोनातून विचार केला, तर वसंत पंचमी हा वसंत ऋतूच्या आगमनाचा उत्सव आहे.

ख्रिश्चन, पारशी, इस्लाम धर्मीयांची नवीन वर्षे ऐतिहासिक कारणांमुळे वेगवेगळ्या वेळी येतात. मात्र, हिंदू नववर्ष (चैत्र महिन्यातील गुढीपाडवा) हे खऱ्या अर्थाने निसर्गनियमांवर आधारित आहे, कारण वसंत हा पहिला ऋतू आहे आणि मेष राशी ही हिंदू आणि पाश्चात्त्य दोन्ही ज्योतिषशास्त्रांमध्ये पहिली राशी मानली जाते.

**वसंताचा सर्वोच्च दर्जा का? :** प्रश्न पडतो की ऋतूंचा चक्राकार प्रवास असताना वसंतालाच प्रथम क्रमांक का दिला जातो? त्याचे उत्तर असे की, वसंत ऋतूला निसर्गशास्त्रीय दृष्टिकोनातून विशेष स्थान आहे. उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळ्यामुळे ज्याचे अस्तित्व मावळते, ते वसंताच्या आगमनाने पुन्हा फुलते आणि जिवंत होते.

**वसंत आणि निसर्ग :** उन्हाळ्यात जळलेली पाने, पावसाळ्ययात कुजलेली पाने आणि हिवाळ्यात सुकून गळून गेलेली पाने वसंत ऋतूत पुन्हा नवीन अंकुर धारण करतात. पक्षी, विशेषतः कोकिळ, जी हिवाळ्यात गप्प असते, ती वसंत ऋतूमध्ये गोड गाणे गाऊ लागते. म्हणूनच संस्कृत सुभाषितात म्हटले आहे --

**काकः कृष्णः पिकः कृष्णः को भेदः पिककाकयोः।**
**वसंतकाले संप्राप्ते काकः काकः पिकः पिकः॥**

(कावळा आणि कोकिळ दोघेही काळे असतात, पण त्यांच्यातील फरक वसंत ऋतूत सहज कळतो -- कारण कोकिळेचा आवाज गोड असतो आणि कावळा करकस ओरडतो.)

## वाचक पत्रे

**मानवी जीवनावर परिणाम :** फक्त निसर्गावरच नव्हे, तर मानवी मनोवृत्तीवरही वसंत ऋतूचा प्रभाव पडतो.

**शारीरिक आणि भावनिक प्रभाव :** हिवाळ्यात संथ झालेली जीवनशक्ती वसंत ऋतूमध्ये पुन्हा जागृत होते. म्हणूनच वसंत पंचमीला मदन पंचमी असेही म्हणतात, कारण हा दिवस प्रेम आणि सौंदर्याचे प्रतीक आहे.

**बौद्धिक आणि आर्थिक प्रभाव :** लेखक, विचारवंत आणि व्यापारी हिवाळ्यातील मरगळ झटकून नवीन जोमाने कार्यरत होतात. म्हणून वसंत पंचमीला सरस्वती पंचमी (विद्येची देवी) आणि श्री पंचमी (संपत्तीची देवी लक्ष्मी) असेही म्हटले जाते.

**सामाजिक आणि धार्मिक प्रभाव :** वसंत पंचमी हा परोपकारी कार्यांचा सण आहे. शंकराचार्यजींनीही म्हटले आहे-

**वसंतवल्लोकहितं चरन्तः॥**

(वसंत ऋतूप्रमाणे सत्पुरुष निःस्वार्थपणे समाजकल्याणासाठी कार्य करतात.)

**वसंताचे आध्यात्मिक शिक्षण :** वसंत फक्त निसर्गाच्या पुनरुत्थानाचा साक्षीदार नाही, तर तो आध्यात्मिक गुरूही आहे.

**आत्म्याचे अमरत्व :** भगवद्गीतेच्या दुसऱ्या अध्यायात श्रीकृष्ण म्हणतात --

**वासांसि जीर्णानि यथा विहाय - नवानि गृह्णाति नरोऽपराणि॥**

(जुन्या वस्त्रांचा त्याग करून माणूस नवीन वस्त्रे परिधान करतो, त्याचप्रमाणे आत्मा जुने शरीर सोडून नवीन शरीर धारण करतो.)

वसंत ऋतूमध्ये गळून पडलेली जुनी पाने नवी पालवी धारण करतात, त्याचप्रमाणे शरीराचा नाश होतो, पण आत्मा अजरामर असतो.

**वसंत पंचमी आणि वसंत ऋतू :** प्रश्न पडतो की वसंत ऋतू चैत्र महिन्यात सुरू होतो, मग वसंत पंचमी माघ महिन्यात का साजरी करतात?

उत्तर सोपे आहे - हिंदू परंपरेत कोणत्याही गोष्टीचा हिशेब केवळ प्रकट झाल्यानंतर केला जात नाही, तर त्याच्या गर्भधारणेपासून केला जातो.

जसे गर्भधारणेपासून बाळाच्या अस्तित्वाची नोंद केली जाते, तसेच वसंत पंचमी हा वसंत ऋतूच्या आगमनाचा पूर्वसूचक दिवस आहे. गीतेच्या दहाव्या अध्यायात श्रीकृष्ण म्हणतात-

**ऋतूनां कुसुमाकरः॥**

(ऋतूंमध्ये मी वसंत आहे, कारण तो सृष्टीला फुलवतो.)

**निष्कर्ष :** वसंत पंचमी हा फक्त एक सण नाही, तर निसर्गाच्या पुनरुज्जीवनाचा आणि आध्यात्मिक शिकवणीचा संदेश देणारा दिवस आहे.

भगवंत वसंताप्रमाणे आपले जीवनही सतत नवा जोम, नवी उमेद आणि नव्या आशेने भरू दे.

*(शंकराचार्य भारती कृष्ण तीर्थ यांचा इंग्रजी लेख 'वसंत पंचमी ॲण्ड इट्स सिग्नीफिकन्स'चा मराठी अनुवाद)*

**श्रीकांत देशपांडे**

(विश्वस्त : श्री विश्व पुनर्निर्माण संघ, जगद्गुरू परिसर, तेलंगखेडी, नागपूर)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# जिल्हा परिषद- पंचायत समिती निवडणुकीपूर्वी कार्यकर्ते व मतदारांमध्ये संतापाची लाट!

**तभा वृत्तसेवा/शंकर मिटकर**

**शिरूर अनंतपाळ, दि. २३ जानेवारी :** आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्र्वभूमीवर शिरूर अनंतपाळ तालुक्यातील राजकीय वातावरण कमालीचे तापले असून, सर्वच राजकीय पक्षातील स्थानिक,निष्ठावंत व वर्षानुवर्षे पक्षासाठी घाम गाळणाऱ्या कार्यकर्त्यांवर अन्याय करण्याचे संभाव्य प्रकार तात्काळ थांबवावेत. अन्यथा त्याचे गंभीर परिणाम पक्षांना थेट मतदानातून भोगावे लागतील, असे मत सर्व पक्षातील कार्यकर्ते व सुज्ञ नागरिक उघडपणे व्यक्त करत आहेत.



ज्या जिल्हा परिषद गटात व पंचायत समिती गणात उमेदवाराची खरी ओळख,वास्तव, सामाजिक बांधिलकी आणि सातत्यपूर्ण काम आहे, त्याच ठिकाणी त्याला उमेदवारी देण्यात यावी,हीच तालुक्यातील मतदारांची ठाम भूमिका असल्याचे सांगण्यात येत आहे. पक्षासाठी रस्त्यावर उतरून झेंडे उचलणारे,प्रचारात आघाडीवर असणारे आणि निवडणूक संपताच दुर्लक्षित केले जाणारे कार्यकर्ते आता गप्प बसणार नसल्याचा इशारा देत आहेत. निवडणूक आली की कार्यकर्त्यांची आठवण काढणारे आणि सत्तेची गणिते जुळवण्यासाठी त्यांना बाजूला सारणारे निर्णय यावेळी चालणार नाहीत, अशी भावना कार्यकर्त्यांतून व्यक्त होत आहे.

केवळ पैशाचे गणित,जातीय समीकरणे आणि बंद दाराआड घेतले जाणारे निर्णय यांवर उमेदवारी ठरवणाऱ्या अदृश्य शक्तींना यावेळी जशास तसे उत्तर मिळणार अशी उघड चर्चा तालुक्यात सुरू आहे.पक्षाची तत्त्वे बाजूला ठेवून व्यक्तिकेंद्रित राजकारण करणाऱ्यांना मतदार जागा दाखवतील, असा इशारा देण्यात येत आहे. स्थानिक प्रश्र्नांची साधी जाण नसलेले,गावात वर्षभर न दिसणारे,विकासकामांशी काडीमात्र संबंध नसलेले आणि निवडणूक जाहीर होताच अचानक अवतरणारे उमेदवार लादण्याचा हट्ट पक्षांना चांगलाच महागात पडणार असल्याचे चित्र आहे. अशा उमेदवारांना मतदार 'शिक्षा' नव्हे तर 'धडा' शिकवतील,असा स्पष्ट आणि ठाम इशारा दिला जात आहे. कार्यकर्त्यांसाठी पक्ष मोठा असतो,पण मतपेटीवर कुणाचाही आदेश चालत नाही. हा जहाल टोला सध्या तालुक्यातील राजकीय चर्चेचा केंद्रबिंदू ठरत आहे.

कार्यकर्त्यांनी पण आपला स्वाभिमान व हक्क सिद्ध करून पक्षासाठी केलेले काम दाखवणे गरजेचे आहे. तरच निष्ठावंत कार्यकर्त्यांना योग्य न्याय मिळेल, असा संदेशही तालुक्यात स्पष्ट होत आहे.

त्यामुळे येणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका केवळ सत्तेसाठीची लढाई नसून, बंद दाराआड निर्णय घेणाऱ्या नेतृत्वाची, स्थानिक वास्तव ओळखण्याच्या क्षमतेची,तसेच कार्यकर्त्यांशी असलेल्या नात्याची खरी कसोटी ठरणार असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे. शिरुर अनंतपाळ तालुक्यातील मतदार यावेळी कोणत्याही दबावाला बळी न पडता आपली भूमिका ठामपणे मांडणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. तालुक्यातील राजकीय वातावरण पाहता,निवडणूक ही केवळ पक्षांची नव्हे तर कार्यकर्त्यांच्या न्यायाची,स्थानिक वास्तवाची आणि जनतेच्या स्वाभिमानाची कसोटी ठरणार आहे. कार्यकर्त्यांनी पक्ष नेतृत्वाचे कान उघडले नाहीत,तर मतदारही कानाडोळा करतील,हे स्पष्ट संकेत आजच दिसत आहेत.शेवटी कागदावर सही कुणाचीही असो,मतदारांनी ठरवलेले बटन चुकणार नाही.

# मुक्तांगण इंग्लिश स्कुल मध्ये बोस, ठाकरे यांची जयंती उत्साहात साजरी



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२३ जानेवारी :** लातूर येथील मातोश्री कलावती प्रतिष्ठान संचलित मुक्तांगण इंग्लिश स्कुल मध्ये आज नेताजी सुभाष चंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे यांची जयंती उत्साहात साजरी केली. सर्व प्रथम नेताजी सुभाष चंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन शाळेच्या प्राचार्या सुमेरा शेख यांच्या हस्ते करण्यात आले.

शाळेच्या शिक्षिका माधुरी वाघमारे यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या कार्याची माहिती देत असताना त्यांनी स्थापन केलेली आझाद हिंद फौज व तुम मुझे खून दो, मै तुम्हे आझादी दूंगा या घोषणेची व उल्लेखनीय कार्याची माहिती दिली. या निमित्ताने शाळेचे विद्यार्थी रेधांश धनराज सोमवंशी, ओजस शीतल कोकरे, ओजस अभय देशपांडे यांनी नेताजी सुभाष चंद्र बोस यांची वेशभूषा साकारून आपले मनोगत व्यक्त केले. शाळेच्या शिक्षिका प्रणिता सुरवसे यांनी बाळासाहेब ठाकरे यांच्याविषयी माहिती सांगताना बाळासाहेब ठाकरे हे उत्तम वक्ते म्हणून लोकप्रिय होते. त्यांच्या भाषणाने सबंध शिवसैनिकांमध्ये नवी स्फूर्ती निर्माण व्हायची. या निमित्ताने शाळेच्या शर्विल प्रवीण गायके, वेदांत विलास कोलपुके, शिवांश सुनील रेजीतवाड या विद्यार्थ्यांनी बाळासाहेब ठाकरे यांची वेशभूषा साकारून आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी शाळेतील विद्यार्थ्यांनी नेताजी सुभाष चंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेस अभिवादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या शिक्षिका सुवर्णा माळवदकर यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांच्या हस्ते स्वामी विवेकानंद पॉलिटेक्निकमधील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२३ जानेवारी :** महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ मुंबईद्वारे घेण्यात आलेल्या हिवाळी २०२५ चा निकाल नुकताच जाहीर झाला असून यामध्ये लातूर येथील जेएसपीएम संचालित स्वामी विवेकानंद इन्स्टिटयूट ऑफ पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांनी या परीक्षेमध्ये देदिप्यमान यश संपादन केलेले आहे. या परीक्षेमध्ये इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागातील ऋतुजा बालाजी शेटकार या विद्यार्थीनीने ९७ टक्के गुण घेऊन लातूर जिल्ह्यातून प्रथम येण्याचा मान पटकाविला आहे. त्याबद्दल जेएसपीएम संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांच्याहस्ते सन्मानचिन्ह देऊन गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

# शकुंतलादेवी बाहेती यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि.२३ जानेवारी :** निलंगा येथील दिवंगत पत्रकार भारतलाल बाहेती यांच्या धर्मपत्नी श्रीमती शकुंतला भारतलाल बाहेती



यांचे गुरुवार दि २२ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास निलंगा येथील राहत्या घरी वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यू समयी त्या ८२ वर्षाच्या होत्या. त्यांच्यावर शुक्रवार दि २३ जानेवारी २०२६ रोजी दुपारी १२-३० वाजता शांतीवन सार्वजनिक स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. मयत श्रीमती शकुंतलादेवी बाहेती यांच्या पश्र्चात १ मुलगा, २ विवाहीत मुली, सुन,जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्या लातूर येथील सुप्रसिद्ध सर्जन डॉ. हंसराज बाहेती, सेवानिवृत्त असिस्टंट पोलीस कमिशनर खुशालचंद बाहेती, लातूर येथील व्यापारी ईश्र्वरचंद बाहेती यांच्या त्या वहिनी तर ऑस्ट्रेलिया स्थित अभियंता वेदप्रकाश बाहेती यांच्या त्या मातोश्री होत्या.

# मयत खातेदारांच्या वारसांना विमा योजनेचा मोठा दिलासा

**तभा वृत्तसेवा**

**वलांडी, दि.२३ जानेवारी :** वलांडी : देवणी तालुक्यातील बोंबळी येथील मयत सरस्वती श्रीपती भोसले यांनी महाराष्ट्र ग्रामीण बँकेत प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना कार्यान्वित केली होती. त्यांच्या दुर्दैवी अपघाती मृत्यूनंतर या योजनेअंतर्गत त्यांची मुलगी दिव्या भोसले यांच्या खात्यात २ लाख रुपये जमा करण्यात आले आहेत.

या विमा रकमेच्या माध्यमातून मृत व्यक्तीच्या कुटुंबाला आर्थिक दिलासा मिळून त्यांच्या संकट काळात मोठा हातभार मिळाला आहे.

महाराष्ट्र ग्रामीण बँक, वलांडी शाखेचे व्यवस्थापक भगवान संवडकर यांनी माहिती देताना सर्व खातेदारांना आवाहन केले की, फक्त २० रुपयांचे प्रीमियम असलेली प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना नक्की कार्यान्वित करा. अचानक अपघात, अपंगत्व किंवा मृत्यू यांसारख्या परिस्थितीत कुटुंब आर्थिक संकटात सापडू नये, यासाठी ही योजना अत्यंत महत्त्वाची असल्याचे त्यांनी सांगितले.

अल्प प्रीमियम - मोठा लाभ, अपघाती मृत्यू व अपंगत्वासाठी आर्थिक संरक्षण, ग्रामीण कुटुंबांसाठी अत्यंत उपयुक्त सुरक्षा कवच.



संवडकर यांनी पुढे सांगितले की, बँकेमार्फत ४३६ रुपये मधे प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, अटल पेन्शन योजना, तसेच इतर सामाजिक सुरक्षा योजना देखील सुरू आहेत. सर्व खातेदारांनी या योजनांचा लाभ घेऊन आपल्या कुटुंबाचे आर्थिक भविष्य सुरक्षित करावे, असे आवाहन त्यांनी केले.

महाराष्ट्र ग्रामीण बँक वलांडी शाखेच्या या उपक्रमामुळे ग्रामीण भागात विमा योजनांचे महत्त्व आणि त्यातून मिळणारे संरक्षण पुन्हा ठळकपणे समोर आले आहे.हा विमा मिळवून देण्यासाठी कागदपत्रे इतर मदत कर्मचारी मस्तान शेख,बॅंक सखी अंजली सगर यांनी मदत केली.

# मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी मतदान जनजागृती पथकातर्फे खरोळ्यात कार्यक्रम



**तभा वृत्तसेवा**

**रेणापूर, दि.२३ जानेवारी :** जिल्हा परीषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या निमित्ताने रेणापूर तालुक्यातील मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी गुरुवार दि. २२ जानेवारी २०२६ रोजी खरोळा येथे जनजागृती पथकाचा कार्यक्रम संपन्न झाला.

निवडणूक निर्णय अधिकारी संदीप कुलकर्णी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसिलदार प्रशांत थोरात, तहसिलदार रामेश्र्वर स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली मतदान जागृती पथकाचे प्रमुख सुदर्शन लहाने, मंगेश सुवर्णकार, अमृतेश्र्वर स्वामी, सुरेखा चंदिले यांनी खरोळा गावात प्रभात फेरीच्या माध्यमातून जनजागृती केली. याप्रसंगी केंद्रप्रमुख गणेश मेनगुले, केंद्रप्रमूख ब्रह्मदास येमले, मुख्याध्यापक अजय रेणापुरे,केंद्रीय मुख्याध्यापक सुरनर, साधन व्यक्ती व्यंकोबा खंदाडे यांची उपस्थिती होती. जिल्हा परिषद प्रशाला खरोळा, जि प. केंद्रीय शाळा खरोळा या विद्यार्थ्यांनी संपूर्ण गावातून मतदान जागृतीचे फलक हातात घेऊन मतदार राजा जागा हो लोकशाहीचा धागा हो अशा घोषणा देत १०० टक्के मतदान करण्याचे आवाहन केले. लोकगीताच्या माध्यमातून महादेव बन यांनी सुंदर गीत रचना सादर करून मतदान करण्याचे आवाहन केले . याप्रसंगी अमृतेश्र्वर स्वामी यांनी मतदानाचे महत्त्व समजावून सांगितले तर सुरेखा चंदिले यांनी मतदारांना मतदानाची शपथ दिली. याप्रसंगी गावातील नागरिक विद्यार्थी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, सुजाण नागरिकांची उपस्थिती होती.

# मोनिका सोमवंशीची सचिव पदी निवड

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि.२३ जानेवारी :** येथील महाराष्ट्र महाविद्यालयातील विद्यार्थीनी मोनिका सोमवंशी हीची



विद्यार्थी संसदेवर 'सचिव' म्हणून निवड करण्यात आली. तिची ही निवड गुणवत्तेवर आधारित झालेली आहे. सूत्रसंचालन, वक्तृत्व, वादविवाद व गुणवत्ता यात प्राविण्य मिळवलेल्या मोनिका सोमवंशी हिची निवड अभिनंदनीय ठरली आहे. तिच्या या निवडीबद्दल महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष विजय पाटील निलंगेकर, सचिव बब्रूवानजी सरतापे, प्राचार्य डॉ. कर्मवीर कदम, उपप्राचार्य डॉ. भास्कर गायकवाड, प्रा. प्रशांत गायकवाड, विद्यार्थी विकास विभागाचे डॉ. हंसराज भोसले, अंतर्गत गुणवत्ता आणि कक्षाचे डॉ. ज्ञानेश्र्वर चौधरी, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी तीचे अभिनंदन केले आहे.

# श्यामार्य कन्या विद्यालयात कथाकथन व फॅशन शो उत्साहात संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि.२३ जानेवारी :** श्यामार्य कन्या विद्यालयात सकाळ सत्रात कथाकथन तर संध्याकाळ सत्रात फॅशन शो स्पर्धा आयोजित करण्यात आलेल्या होत्या. सकाळ सत्रातील कथाकथन स्पर्धेचे अध्यक्ष श्यामार्य कन्या विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रवीण भोळे होते. प्रमुख पाहुणे म्हणून संगीता खादीवाले व श्रीहरी निडवंचे उपस्थित होते. मंचावर पर्यवेक्षक विजय बैले, वनमाला मुक्कावार, प्रमोद कावरे, परीक्षक म्हणून आम्रपाली गायकवाड, स्वाती मोरतळे, कथाकथन विभागाचे प्रमुख संगीता सुतार उपस्थित होते.

संगीता खादीवाले यांनी बोधपर कथाकथन करून उद्घाटन करण्यात आले.

कथाकथन स्पर्धेमध्ये खूप मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवलेला होता. श्रीहरी निडवंचे यांनी विनोद पर आधारित बोधकथा सांगितली. संस्कार व मार्मिक बोधपर पर्यवेक्षक विजयकुमार बैले, स्वाती मोरतळे, विक्रम मलकापूर यांनी कथाकथन केले. कथाकथन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्नेहा मोरतळे व साक्षी मलकापूर या विद्यार्थिनीने केले.

फॅशन शो कार्यक्रमाचे अध्यक्ष श्यामलाल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ड सुपोषपाणि आर्य होते.

प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षण विस्तार अधिकारी थोटे उपस्थित होते. या कार्यक्रमा वेळी ड रमाकांत चटनाळे, भागवत घोळवे, सुनील बागडे, श्यामार्य कन्या विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रवीण भोळे, श्यामलाल माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक भारत खंदारे, श्यामलाल प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक विवेक उगिले, शिवाजी विद्यालय रोहिण्याचे मुख्याध्यापक आनंद चोबळे, सार्वजनिक वाचनालयाचे प्रभारी ग्रंथपाल रेखालाला, बालवाडीच्या संयोजिका अवंतिका मोरतळे, पर्यवेक्षक राहुल लिमये, विजयकुमार बैले उपस्थित होते. खूप मोठ्या संख्येने पालक प्रेक्षकीही उपस्थित होते. या फॅशन शोच्या कार्यक्रमात खूप मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवलेला होता.

शालेय फॅशन शोमुळे डिझायनर्सना त्यांची सर्जनशीलता दाखवण्यासाठी, नवीन ट्रेंड्स सेट करण्यासाठी, ब्रँडची ओळख निर्माण करण्यासाठी, व्यवसाय वाढवण्यासाठी आणि उद्योगातील लोकांशी जोडले जाण्यासाठी एक महत्त्वाचे व्यासपीठ आहे, ज्यामुळे विक्री, प्रसिद्धी आणि सांस्कृतिक प्रभाव वाढतो. हे कला आणि व्यवसाय यांना एकत्र आणून फॅशन जगतात नवीन दिशा देतात. शालेय जीवनात अभ्यासासोबत आपल्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी हे व्यासपीठ मिळवून देण्याचे कार्य संस्था अध्यक्ष सुपोषपाणी आर्य यांनी केले आहे. त्यांचेही कार्य कौतुकास्पद आहे. विद्यार्थ्यांना आवडी व निवड करण्याचा अधिकार असल्याने त्यांना ज्या गोष्टीत रस आहे त्या गोष्टी करू देण्याचं कार्य पालकांनीही करायला हवे असे उद्घाटन प्रसंगी विस्तार अधिकारी थोटे यांनी उद्घाटन प्रसंगी मत व्यक्त केले.

श्यामलाल स्मारक शिक्षण संस्थेतील सर्व आस्थापना अंतर्गत विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी वर्षभरात कला पंधराव्या व क्रीडा पंधरवडा आयोजित केला जातो.कला, क्रीडा, कौशल्य आणि इतर जन्मजात क्षमतांना ओळखणे, त्यांना प्रोत्साहन देणे आणि विकसित करण्यासाठी योग्य संधी व वातावरण उपलब्ध करून देणे, ज्यामुळे त्यांचा सर्वांगीण विकास होतो आणि ते आत्मविश्र्वासू, सर्जनशील व यशस्वी नागरिक बनतात. यासाठी शाळा, पालक आणि समाजाने एकत्र येऊन सांस्कृतिक कार्यक्रम, स्पर्धा आणि नाविन्यपूर्ण उपक्रम राबवणे महत्त्वाचे आहे, असे उद्घाटन प्रसंगी संस्थाअध्यक्ष सुपोषपाणी आर्य यांनी मत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विभाग प्रमुख विक्रम मलकापूर सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी काम पाहिले.

उद्घाटनाच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मदन पाटील, तर फॅशन शोच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधव कांबळे व आभार विजय बैले यांनी व्यक्त केले.

# शेवटच्या दिवशी शक्ती प्रदर्शनासह उमेदवारी अर्ज दाखल

**तभा वृत्तसेवा/संगम डोंगरे**

**जळकोट २३ जानेवारी :** जिल्हा परिषद व जळकोट पंचायत समितीच्या होऊ घातलेल्या निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर जळकोट तालुक्यात पहिल्याच दिवसापासून आजपर्यंत एकून ७२ निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी ७२ नामनिर्देशन अर्ज घेऊन भरल्याची माहिती निवडणूक विभाग कडून देण्यात आली आहे.

जळकोट तालुक्यात तीन जिल्हा परिषद गट व सहा पंचायत समिती गण स्थापित असून जिल्हा परिषद तसेच पंचायत समितीच्या विविध गट व गणासाठी निवडणूक लढविणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी शुक्रवारी ७२ नामनिर्देशन अर्जाची खरेदी केली आहे . त्यामुळे थंडीत निवडणुकीचे वातावरण तापू लागले असून विविध राजकीय पक्षासह अपक्ष उमेदवार ही निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याची तयारीत असल्याचे चित्र दिसून आले. नामनिर्देशन अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया शुक्रवार दिनांक १६ जानेवारी २०२० पासून सुरू करण्यात आली असून अर्ज भरण्याची



शेवटची तारीख २१ जानेवारी पर्यंत असून आज शेवटच्या दिवशी आर्ज स्वीकृतीसाठी गर्दी केली जाणार आहे हेच दिसून येते होते . तसेच झाले आज दिवसभर पक्षचे तथा अपक्ष उमेदवार नामनिर्देशन अर्ज दाखल करण्यासाठी उमेदवारांची गर्दी केली होती.

या सर्व अर्जाची दि. २२ जानेवारी २६ रोजी नामनिर्देशन पत्राची छाननी होणार आहे त्यांनी नंतर वैद्य नामनिर्देशन झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्यात येऊन दि.२३ जानेवारी ते २७ जानेवारी २६ पर्यंत उमेदवारांनी आपली उमेदवारी मागे घेता येणार आहे. त्याच दिवशी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करणे व त्यांना निशाणी वाटप करण्यात येणार असून दि. ५ फेब्रुवारी २०२६ गुरुवार रोजी मतदान होणार आहे.

दोन दिवसांनी म्हणजेच ७ फेब्रुवारी २०२६ रोजी मतमोजणीची प्रक्रिया पूर्ण होणार आहे. जळकोट तालुक्यातील जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणूक प्रक्रिया शांतपणे पारदर्शक राबविण्यासाठी प्रशासन सज्ज असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी स्वाती दाभाडे व तहसिलदार राजेश लांडगे यांनी दिली आहे.

**गट आणि गणानुसार नाम निर्देशनपत्र दाखल**

**अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी जिल्हा परिषद वाजरंवाडा गरासाठी - ११**

माळहिप्परगा - ४, गुत्ती - १०,
पंचायत समिती गण
वाजरवाडा - ७
जगळपूर बू. - ७
माळहिप्परगा - ८
मंगरूळ - ८
गुती - ५
अंतनूर - १२

**एकून जिल्हा परिषद गटासाठी २५**

तर पंचायत समिती गणासाठी ४७ अर्ज शेवटच्या दिवशी दाखल करण्यात आले आहे .

# शास्त्री विद्यालयात हळदी कुंकू व माता पालक मेळावा संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि.२३ जानेवारी :** लालबहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात मकर संक्रांती निमित्त हळदीकुंकू समारंभ व माता पालक मेळावा उत्साहात संपन्न झाला.

याप्रसंगी व्यासपीठावर उपस्थित विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय कुलकर्णी पर्यवेक्षक माधव मठवाले कार्यक्रमाचे अध्यक्ष्या सुनिता नेलवाडकर प्रमुख पाहुण्या महानंदा सोनटक्के उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या महानंदा सोनटक्के यांनी आपल्या वक्तव्यातून मुलांना संस्काराची गरज आहे आईने मुलाकडे लक्ष दिले पाहिजे त्यांच्यातील विविध गुण लक्षात घेऊन त्यांच्या क्षमतेप्रमाणे मुलांना शिक्षण दिले पाहिजे मुलांना घडवण्यामध्ये शिक्षकांचा, पालकांचा फार मोठा वाटा असतो असे विचार याप्रसंगी व्यक्त केले.

अध्यक्षीय समारोपामध्ये सुनिता नेलवाडकर यांनी आजच्या पिढीला संस्काराची गरज आहे. आईंनी मुलांना घडवताना त्याचा सर्वांगीण विकास कसा होईल याकडे विशेष लक्ष दिले पाहिजे राहणीमान, वर्तन या गोष्टी मुलांच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत अत्यंत समर्पक अशा शब्दात माता पालकांना मार्गदर्शन केले

हळदी कुंकवा निमित्त माता पालकांना हळदी कुंकू, तिळगुळ व व्यंकटेश स्तोत्र वाटप करण्यात आले शाळेतील सर्व महिला शिक्षकांनी अत्यंत उत्साहाने या कार्यक्रमांमध्ये सहभाग घेतला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक कार्यक्रम प्रमुख प्रमोदिनी रेड्डी यांनी केले व आभार लक्ष्मी चव्हाण यांनी मानले. कल्याण मंत्र रूपाली थोरात यांनी घेतला.

व्यवस्थेतील सर्वच शिक्षकांचे या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहकार्य लाभले.



स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र विभागा अंतर्गत कार्यरत एकात्मिक सल्ला व चाचणी केंद्र, स्टेट रेफरंस लॅबोरेटरी आणि व्हायरल लोड या प्रयोगशाळा २०२० पासून *एन ए बी एल* मानांकन प्राप्त आहेत.सदरील प्रयोग शाळेत एचआयव्ही संशयित रुग्णांची चाचणी व समुपदेशन तसेच एचआयव्ही बाधित रुग्णांमधील विषाणूंची संख्या या तपासण्या करण्यात येतात.

# जिल्हा परिषद प्रशासन अखेर जागे; अतिरिक्त कामकाजच्या नावाखालील १५० प्रतिनियुक्त्या रद्द

**प्रजासत्ताकदिनी आंदोलनाच्या इशाऱ्याची दखल-डॉ. गणेश ढवळे**

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२३ जानेवारी**

बीड जिल्हा परिषदेच्या शिक्षण, बांधकाम व आरोग्य विभागात सुरू असलेल्या मनमानी कारभारावर अखेर जिल्हा परिषद प्रशासनाला जाग आली असून, अतिरिक्त कामकाज या गोंडस नावाखाली करण्यात आलेल्या तब्बल १५० हून अधिक प्रतिनियुक्त्या रद्द करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.



प्रजासत्ताकदिनी ध्वजारोहणासाठी येणाऱ्या पालकमंत्र्यांसमोर लक्षवेधी आंदोलनाचा इशारा सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ (महाराष्ट्र राज्य) डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी दिल्यानंतर, प्रशासनाने प्रजासत्ताक दिनाच्या आधीच याची दखल घेतली.दि. २२ जानेवारी रोजी प्रदीप काकडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन), जिल्हा परिषद बीड यांनी सर्व विभागप्रमुखांना लेखी आदेश देत -अतिरिक्त पदभार तात्काळ कमी करून संबंधित कर्मचाऱ्यांना त्यांच्या मूळ पदस्थापनेच्या ठिकाणी पूर्णवेळ रुजू करून घ्यावे, असे स्पष्ट निर्देश दिले आहेत.आदेश न पाळल्यास जबाबदारी निश्चित या संदर्भात जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त आणि सामान्य प्रशासन विभागाकडे वारंवार तक्रारी प्राप्त झाल्याचे नमूद करत, दि. २३ जानेवारीपासून संबंधित कर्मचाऱ्यांना मूळ पदस्थापनेवर कार्यमुक्त न केल्यास - विभागप्रमुख व सहाय्यक / कनिष्ठ प्रशासन अधिकारी यांना वैयक्तिक जबाबदार धरले जाईल,असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे.

# स्वा.सावरकर महाविद्यालयात माता पालक मेळावा संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२३ जानेवारी**

मकरसंक्रमणाच्या निमित्ताने महाविद्यालयातील शिक्षक पालक योजना कमिटी आणि सखी सावित्री महिला तक्रार निवारण समिती ( महिला कक्ष) यांच्या संयुक्त विद्यमाने महिला पालक मेळावा आणि हळदी कुंकू कार्यक्रम २१ जानेवारी रोजी संपन्न झाला. हळदी कुंकू कार्यक्रमाचे निमित्त साधून महाविद्यालयाने महिला पालकांशी पाल्याच्या प्रगती विषयी चर्चा केली. तसेच महिला पालकांमध्ये बॉडी मास इंडेक्स या विषयी जनजागृती करण्याचा प्रयत्न केला. यात जमलेल्या महिला पालक तसेच महाविद्यालय परिसरातील महिला यांचा बॉडी मास इंडेक्स प्रत्यक्ष मोजून दाखवण्यात आला. तसेच बॉडी मास इंडेक्स विषयी डॉ. स्वाती कुलकर्णी यांनी तयार केलेल्या पावर पॉइंट प्रेझेंटेशनचेही प्रदर्शन करण्यात आले. यावेळी मनोरंजन आणि बॉडी मास इंडेक्स सामान्य ठेवण्यासाठीचा उपाय सुचवण्याच्या हेतूने महिलांची चालण्याची स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत जमलेल्या सर्व महिलांनी उत्साहाने सहभाग नोंदवला. यात महिला पालक, परिसरातील महिला आणि संस्थेचे पदाधिकारी ड. लोहिया, डॉ.अविनाश देशपांडे, प्रा.चंद्रकांत मुळे सर , उपप्राचार्य लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर सर यांच्या सौभाग्यवतीने सहभाग नोंदवला. कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे यांनी पालकांशी संवाद साधला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक पालक योजनेचे प्रमुख प्रा.डॉ. गोपाळ धोंड, महिला कक्षाच्या प्रमुख डॉ. सुनिता कुरुडे आणि महाविद्यालयातील सर्व महिला यांनी उत्साही सहभाग घेतला. इचख मोजणी आणि महिलांची स्पर्धा आयोजनात महाविद्यालया क्रिडा संचालक डॉ. छत्रपती पांगारकर यांनी विशेष परिश्रम घेतले. ग्रंथालयाच्या विस्तार सेवा अंतर्गत जागरूक माता: कुटुंबाचा केंद्रबिंदू-वैचारिक हळदी कुंकू अशा आशयाचे परिपत्रक विचारांचे वाण म्हणून देण्यात आले.

# अपघातग्रस्तांना मदतीसाठी धावणाऱ्यांना २५ हजार रु.ची मदत योजना सुरू करा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२३ जानेवारी**



रस्ते अपघातातील जखमींना कॅशलेस वैद्यकीय उपचार योजनेअंतर्गत सात दिवसांसाठी दीड लाखापर्यंत मोफत उपचार मिळणार तसेच जखमी व्यक्तींना तातडीने रुग्णालयात पोहोचणाऱ्या व्यक्तींना मदत करणाऱ्यास २५ हजार रुपयांचे बक्षीस देणार असल्याची घोषणा केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी नुकतीच जाहीर केली आहे. याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयातील गृह व आपत्कालीन विभाग तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरण.महामार्ग अभियंता यांच्याकडे चौकशी केली असता अद्याप पर्यंत आमच्याकडे याबाबतची कोणत्याही प्रकारची माहिती किंवा जी.आर. आलेला नाही असे सांगण्यात आले. सदरील योजना लवकरात लवकर सुरू करण्यात यावी अशी मागणी निवेदनाद्वारे बीड जिल्हा सामाजिक कार्यकर्ता संघटनेच्या वतीने दि. २२ जानेवारी २०२६ गुरुवार रोजी निवासी उपजिल्हाधिकारी सोनी साहेब यांच्याशी चर्चा करून त्यांच्या मार्फत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा तसेच केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांना पाठवलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.यावेळी बीड जिल्हा सामाजिक कार्यकर्ता संघटनेचे अध्यक्ष डॉ. संजय तांदळे, सुदाम कोळेकर, बीड शहर बचाव मंचचे मार्गदर्शक प्राचार्य डी.जी. तांदळे ,अध्यक्ष नितीन जायभाये, आम आदमी पार्टीचे अध्यक्ष माजी सैनिक अशोक येडे. शिवशक्ती भीमशक्ती विचार मंचचे अध्यक्ष प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील, सामाजिक कार्यकर्त्या किस्कींदा पांचाळ आदींची उपस्थिती होती.

# तुलसी महाविद्यालयाची विद्यार्थिनी पलक सावंतची देशसेवेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२३ जानेवारी**



देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, बीड येथील बीसीए तृतीय वर्गाची विद्यार्थिनी पलक सूरज सावंत हिची नुकतीच सीमा सुरक्षा दल (बीएसएफ) मध्ये निवड झाली असून पहिल्याच प्रयत्नात तिने हे यश मिळवून महाविद्यालयाचे नाव उज्वल केले आहे.

पलक सावंत सध्या बीसीएच्या शेवटच्या वर्षात शिक्षण घेत असून पदवीचे शिक्षण घेत असतानाच तिने देशसेवेचे ध्येय उराशी बाळगून स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू केली होती. महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा विभागामार्फत देण्यात येणारे नियमित मार्गदर्शन आणि तिची स्वतःची मेहनत यांच्या जोरावर तिने सीमा सुरक्षा दलाच्या परीक्षेत यश मिळवले.

पलकच्या या यशाबद्दल महाविद्यालयाच्या वतीने गौरव समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी तुलसी शैक्षणिक समूहचे संचालक मा.प्रा.प्रदीप रोडे, मुख्याध्यापक मा.राम वाघुंबरे,मा.अतुल मुळे,मा.प्रा.अर्जुन राठोड तसेच प्राचार्य प्रा.डी.जी.निकाळजे यांच्या हस्ते पलकचा प्रेरणादायी पुस्तक व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला आणि तिच्या मेहनत व चिकाटीचे कौतुक करून तिला पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

महाविद्यालयाच्या स्पर्धा परीक्षा विभागातून यापूर्वीही अनेक विद्यार्थ्यांनी भारतीय सैन्य दलात व विविध शासकीय सेवांमध्ये यश मिळवले आहे. पलकच्या निवडीमुळे महाविद्यालयाच्या यशात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून तिच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# प्रशांत चव्हाण यांना पीएच.डी पदवी प्रदान

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२३ जानेवारी**



माजलगाव येथील सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील प्रबंधक प्रशांत रमेश चव्हाण यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठा अंतर्गत मॅनेजमेंट सायन्स (व्यवस्थापन शास्त्र) विषयात पीएच.डी प्रदान करण्यात आली आहे.

प्रशांत चव्हाण यांनी डॉ. विवेक वायकर यांच्या मार्गदर्शनाखाली अ स्टडी ऑफ कॉटन प्रोडक्शन न्ड मार्केटिंग इन द महाराष्ट्र स्टेट (२००६-२०१६) या विषयावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात शोध प्रबंध सादर केला होता.प्रशांत चव्हाण यांच्या यशाबद्दल म.शि. प्र.मंडळाचे अध्यक्ष आ.प्रकाश सोळंके,उपाध्यक्ष मा.आ.अमरसिंह पंडित,सरचिटणीस आ. सतीश चव्हाण, यांच्यासह महाविद्यालय विकास समिती सदस्य ऍड.बी.आर.डक, प्राचार्य डॉ. जी.के. सानप, प्रभारी प्राचार्य डॉ. एन. के. मुळे,उपप्राचार्य डॉ.एम.ए.कव्हळे, उपप्राचार्य प्रकाश गवते, उपप्राचार्य पवन शिंदे यांनी अभिनंदन केले आहे.



कै. दत्ताजी भाले शैक्षणिक संकुलात नेताजी सुभाष चंद्र बोस व हिंदू हृदय सम्राट श्री बाळासाहेब ठाकरे यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजनानी झाली. प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री प्रदीप जोशी सर यांनी आझाद हिंद सेनेचे प्रणेते नेताजी सुभाष चंद्र बोस व हिंदुहृदयसम्राट श्री बाळासाहेब ठाकरे यांच्या जीवन कार्याबद्दल सर्वांना माहिती दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्रीमती प्रतिभा आजबे यांनी केले. या कार्यक्रमाला माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री सुधाकर घायतडक, श्रीमती निशा जोशी सौ.रेखा देशमुख श्री. गजानन उबाळे लक्ष्मीकांत सामग ,मारोती झाटे, नितेश चव्हाण हे सर्व शिक्षक उपस्थित होते.

# गजानन विद्यालयाचा चित्रकला ग्रेड परीक्षेचा निकाल १०० टक्के

**तभा वृत्तसेवा**
**नवगण राजुरी दि.२३ जानेवारी**



कला संचालनालय मुंबई च्या वतीने घेण्यात आलेल्या चित्रकला ग्रेड परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय नवगण राजुरी चा निकाल शंभर टक्के इतका लागला आहे.

सन २०२५- २६ या शैक्षणिक वर्षात घेण्यात आलेल्या एलिमेंट्री या ग्रेड परीक्षेला गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातून ए ग्रेड मधून ९ आणि बी ग्रेड मधून २४ तर सी ग्रेड मधून २६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. आणि इंटरमिजिएट या ग्रेड परीक्षेला ३ विद्यार्थ्यांना ए ग्रेड तर १६ विद्यार्थ्यांना बी ग्रेड व ४८ विद्यार्थी सी ग्रेड मधून उत्तीर्ण झाले. त्यांना कलाशिक्षक श्रीमती पल्लवी भगत यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर युवा नेते रोहित क्षीरसागर संस्थेचे प्रशासन अधिकारी डॉ.राजा मचाले गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे सर्व कर्मचारी आणि ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

# आजच्या युवक युतींनी शिक्षण हे निरंतर घेतले पाहिजे-प्राचार्य डॉ.हरिदास फेरे

**सरस्वती महाविद्यालयात आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग कार्यशाळा उद्घाटन कार्यक्रम संपन्न**

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.२३ जानेवारी**

माऊली विद्यापीठ संचलित, सरस्वती महाविद्यालय, केज येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर व आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थी समुपदेशन, व्यवसाय मार्गदर्शन व प्लेसमेट कार्यशाळेचे दिनांक २१ जानेवारी रोजी कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे व उद्घाटक म्हणून वसंतराव काळे महाविद्यालय, ढोकी ता. जि. धाराशिव येथील मा प्राचार्य प्रोफेसर डॉ. हरिदास फेरे सर लाभले होते. दुसऱ्या सत्राचे प्रमुख पाहुणे म्हणून मा.जाधव राजेश उत्तम ( सदस्य-एलआयसी कॉर्पोरेट क्लब बीड) व जनविकास महाविद्यालय, बनसारोळा येथील राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ. राजेश गायकवाड हे लाभले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे मा.प्राचार्य डॉ. जी. बी. पाटील. व आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाच्या कार्यक्रमाधिकारी डॉ.अर्चना वाघमारे यांची विचार मंचावर उपस्थिती होती. प्रमुख पाहुणे यांचा परिचय इंग्रजी विगाग प्रमुख व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या समन्वयक डॉ. वैशाली आहेर यांनी करून दिला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाच्या कार्यक्रमाधिकारी डॉ. अर्चना वाघमारे यांनी आपल्या प्रस्ताविकेमध्ये कार्यशाळेचे उद्दिष्ट व हेतू सांगताना म्हटले की, समुपदेशन, व्यवसाय मार्गदर्शन व प्लेसमेंट कार्यशाळेचे आयोजन महाविद्यालयीन स्तरावर युवक- युवतीना पदवीनंतर रोजगाराच्या वेगवेगळ्या संधी प्राप्त व्हाव्यात व विद्यार्थ्यांना सक्षम बनविण्यासाठी पदवी अभ्यासक्रमाबरोबरच व्यावसायीक व इतर नोकरीच्या संधी जसे की स्पर्धा परीक्षा, लेखी व तोंडी मुलाखती कशा असतात, एम.पी.एस.सी., यु.पी.एस.सी.आणि नेट-सेट व स्थानिक नोकर भरतीत विशेष कौशल्य संपादन कसे करावे अशा प्रकारची माहिती सांगून आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग कार्यशाळेचा मुख्य उद्देश सांगितला आहे.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा.प्राचार्य प्रोफेसर डॉ. हरिदास फिरे यांनी म्हटले की, आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात कौशल्य आत्मसात केले पाहिजे. विद्यार्थ्यांनी आपले ज्ञानेंद्रिय सक्षम करावी लागतील ,जीवनात काय चांगले आणि काय वाईट यातील फरक कळण्यासाठी ज्ञानेंदिय सतत कार्यशिल राहणे आपेक्षित आहे. जीवनात संधी मिळाली तर माणसाची शक्ती प्रकट होत असते आणि ती प्रकट होत असताना ती वाढतही असते म्हणून आत्मपरीक्षण करून स्वतः मधील अवगुणांचे उच्चाटन करणे हे एक मोठे आव्हान आहे. आजीवन शिक्षणाचे महत्त्व ओळखून शिक्षण घ्या. प्रौढ शिक्षण, अनौपचारिक शिक्षण व



आजीवन शिक्षण ही व्यक्ती, समाज व राष्ट्र प्रगतीची प्रमुख त्रिसूत्री आहे. या विश्वातील अनेक प्रगत राष्ट्रांनी या त्रिगुणात्मक विकास करून घेतला आहे. सध्याच्या आधुनिक युगात आजीवन शिक्षणाची आबाल-वृद्धांना स्त्री-पुरुषांना शिक्षित-अशिक्षितांना नितांत गरज आहे कारण प्रचंड प्रमाणात वाढणारे सर्वच ज्ञान आपण फक्त सध्याच्या औपचारिक पद्धतीने घेऊच शकत नाही. असे म्हटले जाते की, मानव हा विकसनशील सामाजीक, बद्धिमान, प्राणी आहे मानव प्राणी इतर प्राण्यांहून श्रेष्ठ समजला जातो तो त्याच्या बद्धिमत्तेमुळेच परंतु ज्या बद्धिमत्तेच्या जोरावर मानवाने प्रगतीची घोडदौड केली आहे. ती केवळ शिक्षणामुळेच केली आहे .तेव्हा आजच्या युवक -युतींनी शिक्षण हे निरंतर घेतले पाहिजे असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले.

अध्यक्षीय समारोप प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. बी. पाटील यांनी म्हटले की, आधुनिक संगणकयुगाच्या काळात फक्त औपचारिक शिक्षण घेऊनच व्यक्तीची प्रगती होणार नाही. तर समाजातील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, धार्मिक मूल्यांचा विचार देखील विद्यार्थ्यांनी केला पाहिजे .तरच राष्ट्राच्या प्रगतीला हातभार लागू शकतो. यासाठी विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास निर्माण करून सक्षम बनले पाहिजे. यासाठी आजीवन शिक्षणाने विद्यार्थ्यांना आत्मविश्वास निर्माण होऊन वेगवेगळ्या नोकरीच्या संधी काय आहेत हे जाणून घेण्यासाठी आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग अतिशय महत्वाची कामगिरी बजावताना दिसत आहे. असे सविस्तर मार्गदर्शन त्यांनी या प्रसंगी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. किरणकुमार धिमधिमे यांनी केले तर आभार महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. अशोक घोडके यांनी मानले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षिकेतर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# अभाविपच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम रूजविण्याचे काम– चामणीकर

## अभाविपच्या देवगिरी प्रांत अधिवेशाचे थाटात उद्घाटन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ जानेवारी**

विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम रुजविण्याचे काम विद्यार्थी परिषदेच्या माध्यमातून होत आहे. यातून घडलेले नागरिक विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी महत्त्वाची भूमिका पार पाडत असल्याचे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत प्रचारक स्वप्निल चामणीकर यांनी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या साठव्या देवगिरी प्रांत अधिवेशनाच्या उद्घाटन प्रसंगी केले.

संत नामदेव नगरी साई रिसॉर्ट येथे आज शुक्रवार दि २३ जानेवारी रोजी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या देवगिरी प्रांत अधिवेशनाचा उद्घाटन सोहळा जल्लोषात पार पडला. या अधिवेशनाला उद्घाटक म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत प्रचारक स्वप्निलजी चामनीकर यांची उपस्थिती होती. आपल्या उद्घाटनपर भाषणामध्ये त्यांनी विद्यार्थी परिषदेच्या विविध उपक्रमांचे कौतुक केले. समाजाच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या नागरिकांमध्ये राष्ट्र प्रेमाची भावना जागृत झाली तर त्या प्रत्येक क्षेत्रातून विकसित राष्ट्र निर्मितीची प्रक्रिया तेवढ्याच भक्कमपणे सुरू होईल. ज्या स्वामी विवेकानंदांनी युवकांच्या माध्यमातून सामर्थ्यशाली राष्ट्र निर्मितीचे स्वप्न बघितले होते ती प्रतिभा आज विद्यार्थी परिषदेच्या कार्यकर्त्यांमध्ये दिसून येत आहे. विद्यार्थी तसेच युवकांमध्ये राष्ट्रप्रेम रुजविण्याचे काम विद्यार्थी परिषद करीत असून यातून निर्माण होणारे राष्ट्रप्रेमी नागरिक हे भविष्यातील सामर्थ्यशाली आणि विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी महत्त्वाचे योगदान देणारे ठरणार असल्याचा विश्वास यावेळी त्यांनी व्यक्त केला.

याप्रसंगी विद्यार्थी परिषदेच्या राष्ट्रीय उपाध्यक्ष सुरभी दवे यांनी बदलत्या तंत्रज्ञानाच्या काळात विद्यार्थ्यांमध्ये असलेले सुप्त गुण पुढे आणण्यासाठी विद्यार्थी परिषद राष्ट्रीय स्तरावर एकत्रित काम करत असल्याची माहिती दिली. विद्यार्थ्यांना सामाजिक दायित्वाची जाण करून देताना आपण या राष्ट्राचे देणे लागतो ही भावना जोपासत चारित्र्यवान युवा संघटन निर्माण करण्यासाठी आम्ही कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले.

या उद्घाटन समारंभाला नवनिर्वाचित प्रदेशाध्यक्ष डॉक्टर सुरेश मुंडे, प्रदेश मंत्री डॉ. वरूनराज नन्नावरे, स्वागत समितीचे उपाध्यक्ष गजेंद्र बियाणी, स्वागत समिती सचिव ॲड. पंकज जोशी, शहराध्यक्ष डॉ. सुधीर वाघ, शहर मंत्री अविष्कार गिरीकर यांच्यासह संरक्षक गजानन घुगे, प्रज्ञाताई सातव, तेज कुमार झांजरी, डॉ. मुरलीधर तोष्णीवाल, डॉ. सिद्धांत येस्के, प्रा. डॉक्टर संजय जामठीकर, डॉक्टर सोनाली भरतीया यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

# शिवजयंती महोत्सव समितीच्या अध्यक्षपदी सुनीता मुळे



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ जानेवारी**

यंदाच्या सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीच्या अध्यक्षपदाची जबाबदारी सुनीताताई मुळे यांच्यावर सोपवण्यात आले असून सचिव म्हणून रजनी पाटील ह्या काम पाहणार आहेत.

हिंगोली येथील शासकीय विश्रामगृहात पुतळा समिती व सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीची बैठक दि.२१ जानेवारी रोजी पार पडली. यंदाच्या वर्षात जिजाऊ च्या लेकी शिवजयंती समितीत पुढाकार घेणार असून त्यांच्या त्यांच्या ही जबाबदारी राहणार आहे. जिजाऊच्या लेकी यावर्षी महोत्सव पूर्ण करण्यासाठी पुढे आलेल्या आहेत. निवड प्रसंगी बैठकीला पुतळा समितीचे पदाधिकारी त्र्यंबकराव लोंढे, डॉ. प्रल्हाद शिंदे, बाबाराव शृंगारे, तसेच यावेळी खंडेराव सरनाईक, मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष शिवाजी ढोकर पाटील, कल्याण देशमुख, ॲड अमोल जाधव, ॲड शिंदे, ॲड. उल्हास पाटील, पप्पू चव्हाण, नंदकुमार नायक, डॉ. नामदेव कोरडे आदींसह जिजाऊ ब्रिगेडच्या ज्येष्ठ पदाधिकारी कांताबाई कल्याणकर, ज्योतीताई कोथळकर, विद्याताई पवार, जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्ष प्रियंका भोयर, पतंगे ताई आदींची उपस्थिती होती. सर्वांच्या उपस्थितीत सुनिता ताई मुळे यांच्यावर सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीच्या अध्यक्षपदाची जबाबदारी सर्वांच्या वतीने देण्यात आले. जिल्हा सचिव म्हणून बैठकीत रजनी पाटील यांची तर उपाअध्यक्ष म्हणून, विद्याताई पवार, उषाताई इंगोले, अनिताताई सूर्यतळ, रेश्माताई चव्हाण, अर्चनाताई जाधव. सहसचिव पदी अलकाताई थोरात, सीमाताई वडदकर, साधनाताई हेंबाडे, तर कार्याध्यक्षपदी महिला व्यापारी प्रतिनिधी निवडला जाणार आहे. सदस्य म्हणून शिल्पाताई भालेराव, सुजाताताई जोजार, अरुणाताई अंभोरे, मीराताई सूर्यवंशी, वंदनाताई गायकवाड, रेखाताई जाहीराव, मंदाकिनीताई चव्हाण, वर्षाताई सरनाईक, नीताताई सावके, सुनिता ताई भालेराव सुवर्णाताई बोरकर सविताताई सरनाईक जयाताई पवार मायाताई गवळी अदी पदांच्या जबाबदाऱ्या देखील बैठकीत देण्यात आल्या. लवकरच पुढील बैठक घेतली जाणार असून त्यामध्ये इतर निवडी घोषित केल्या जाणाऱ्या त्याची माहिती जिल्हाध्यक्ष सुनीताताई मुळे यांनी दिली आहे. समन्वयक म्हणून खंडेराव सरनाईक, ऐड.शिंदे, त्र्यंबकराव लोंढे तसेच ऐड.उल्हास इंगोले पाटील,ऐड. अमोल जाधव हे काम पाहणार आहेत.लधकरच जयंती अध्यक्षा स्वतंत्र बैठक घेऊन विस्तारित कार्यकारिणी जाहीर करणार आहेत.

# हिंगोलीत गायत्री शक्तीपीठावर साधक भवनाचे उद्घाटन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ जानेवारी**

वसंत पंचमीच्या शुभ मुहूर्तावर गायत्री परिवार ट्रस्टद्वारे संचालित गायत्री शक्तिपीठाच्या विस्तार योजनेअंतर्गत नव्याने उभारण्यात आलेल्या साधक निवास (साधक भवन) इमारतीचे भव्य उद्घाटन मोठ्या उत्साहात पार पडले.

सदर इमारतीचे उद्घाटन डॉ. मुरलीधर तोष्णीवाल यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी रामचंद्र कयाल, मुंशी मुंदडा तसेच इमारतीचे आर्किटेक्ट सुनील चौधरी यांची प्रमुख उपस्थिती होती. उद्घाटनप्रसंगी संवर यांच्या हस्ते विधीवत पूजन व हवन करण्यात आले. नवीन साधक भवनाचे बांधकाम सुमारे ११,००० स्केअर फूट क्षेत्रफळावर करण्यात आले असून येथे एकावेळी १०० साधकांच्या निवासाची सुसज्ज व्यवस्था उपलब्ध आहे. साधकांच्या साधना व विविध आध्यात्मिक उपक्रमांसाठी भव्य सभागृहाचीही व्यवस्था करण्यात आली आहे. या भवनामुळे गायत्री शक्तिपीठाच्या आध्यात्मिक, साधना व प्रशिक्षण उपक्रमांना मोठा आधार मिळणार आहे.

या प्रसंगी चंद्रकुमार खंडेलवाल, वामजी ठोके, प्रकाश कावना, एम एम राऊत, मेहेत्ते, भरत चौबनी तसेच संस्थेचे प्रमुख विजय काबरा यांच्यासह अनेक मान्यवर व मोठ्या संख्येने साधक उपस्थित होते. सर्व उपस्थितांनी या उपक्रमाचे स्वागत करत गायत्री परिवाराच्या सेवाभावी व आध्यात्मिक कार्याचे कौतुक केले. साधक भवनाच्या उद्घाटनामुळे गायत्री शक्तिपीठाच्या कार्याला नवी दिशा मिळून अधिकाधिक साधकांना साधना, प्रशिक्षण व निवासाची सोय उपलब्ध होणार असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.



हिंगोली– येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी अप्पर जिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे, निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवाड यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी, विद्यार्थी यांची उपस्थिती होती. छाया– विजय गुंडेकर

## संक्षिप्त वृत्त

### जिजाऊ विद्यानिकेतनमध्ये हळदी–कुंकू



हिंगोली– येथील ॲड. ग्यानबारावजी शिरसाट संस्थेअंतर्गत असणाऱ्या राष्ट्रमाता जिजाऊ विद्यानिकेतन विद्यालयामध्ये महिला सक्षमीकरण आणि सांस्कृतिक परंपरेचे जतन करणाऱ्या उद्देशाने हळदी कुंकू कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने करण्यात आली. उपस्थित महिलांचे पारंपारिक पद्धतीने हळदीकुंकू देऊन स्वागत करण्यात आली. महिलांसाठी विविध मनोरंजक खेळ घेण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थित महिलांसाठी स्नेह भेट देण्यात आली. महिलांनी आपले विचार व अनुभव सांगून कार्यक्रमाचे शोभा वाढवली. यावेळी विद्यालयातील महिला शिक्षिका पडघन, ठोके, पाईकराव, कान्हेड, वाबळे, टेकाळे, सोळंके इत्यादींची उपस्थिती होती. कार्यक्रमाला पूर्ण प्रतिसाद शाळेचे मुख्याध्यापक बल्लाळ, कान्हेड, चाटसे यांनी दिला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी इम्रान व नरवाडे ताईने पुढाकार घेतला.

### सहकार भारती स्थापना दिन साजरा

हिंगोली– येथील संत नामदेव नागरी सहकारी पतसंस्थेच्या मुख्य शाखेमध्ये सहकार भारती स्थापना दिनानिमित्त कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र प्रदेश सहकार भारती पतसंस्था सहप्रकोष्ट प्रमुख जनकराज खुराणा हे होते. सहकार भारतीच्या स्थापना दिनानिमित्त मान्यवरांच्या हस्ते भारतमातेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी सहकार भारतीचे जिल्हाध्यक्ष प्रकाशचंद सोनी, महामंत्री सुनीलकुमार सिन्हा, संघटन प्रमुख निलेश लाखकर, लेखा परिक्षक प्रकोष्ट प्रमुख महेश बियाणी, सहकारी ग्राहक भांडार प्रकोष्ट प्रमुख ए.एस. पांपटवार, कर सल्लागार प्रकोष्ट प्रमुख अशोक डुब्बेवार, संजय देवडा, ॲड. राहूल अग्रवाल, डॉ. केशवराव वाघमारे, प्रा.डॉ. एस.जी. साहू, किशोर नायसे, आशिष घुगे, मनोजकुमार गौतम, प्रेम साकळे, हार्दिक दुबे, केदारनाथ देशमुख, नामदेव थोरात, ओम सुर्यवंशी आदींची उपस्थिती होते.

### अवैध धंद्याविरोधात पोलिसांची कारवाई

हिंगोली– आखाडा बाळापूर पोलिस ठाणे हद्दीत सुकळीवीर येथे तंबाखूजन्य सुगंधीत पान मसाला गुटखा बाळगणाऱ्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. ३९२९० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. वसमत शहरात मटका जुगार कायद्यांतर्गत एक कारवाई करीत नगदी व जुगाराचे साहित्य असा १०९०० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. कळमनुरी पोलिस ठाणे हद्दीत जुगार व अवैध दारूविक्री संदर्भात छापा मारून ३०८० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

# संवर्ग–१ व २ बदलीसाठी लाभ घेतलेल्या शिक्षकांच्या प्रमाणपत्रांची चौकशी करा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ जानेवारी**

सन २०२५ या वर्षात शिक्षण विभागांतर्गत संवर्ग–१ व संवर्ग–२ मध्ये शिक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत परंतु जिल्ह्यातील पाचही तालुक्यात बदली प्रक्रियेमध्ये जी समिती नेमण्यात येते त्या समितीचे शिक्षकांनी संवर्ग–१ व संवर्ग–२ मध्ये लाभ मिळविण्यासाठी जी दिव्यांग प्रमाणपत्र युडीआयडी, आजारग्रस्त यांचे प्रमाणपत्र, बांधकाम विभागाने दिलेले अंतराचे प्रमाणपत्र जोडण्यात आले आहेत. त्या प्रमाणपत्राची पाचही तालुक्याच्या बदली समितीने तपासणी न करता बदली प्रक्रिया राबवली. या प्रमाणपत्रांची चौकशी करून दोषी शिक्षकांवर कार्यवाही करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते मुनीरखान कौसरखान पठाण यांनी शिक्षणाधिकारी यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, संवर्ग–१ व संवर्ग–२ मध्ये बदलीमध्ये पारदर्शकता नाही. शासन निर्णय व शासन परिपत्रक दि १६ जून २०२५ आणि दिव्यांगाचे शासन निर्णय दि १४ सप्टेंबर २०१८ नुसार बदली प्रक्रिया पार पाडण्यात आलेली नाही. माजी सैनिक, स्वातंत्र्य सैनिक शासन निर्णयानुसार बदली प्रक्रिया पार पाडण्यात आली नाही. शिक्षकाने बदलीसाठी जोडण्यात आलेल्या कागदपत्रे माहीतीच्या अधिकारात मागविले त्यामध्ये बदली प्रक्रिया शासनाच्या निर्णयाची पायमल्ली समितीने केली असल्याचे दिसत आहे. शिक्षकाने जोडलेल्या प्रमाणपत्राची आजारग्रस्त, वैद्यकीय प्रमाणपत्र, अंतराचे प्रमाणपत्र यांची परत फेर तपासणी करण्यासाठी आजारग्रस्त शिक्षकांची यादी पाहीली असता त्यावर आवक जावक क्रमांक नाहीत. अंतराचे प्रमाणपत्र चुकीचे अंतर दाखविण्यात आले आहेत. दिव्यांग, आजारग्रस्त व अंतराचे चुकीचे व बोगस प्रमाणपत्र जोडण्यात आले आहेत. चुकीच्या प्रमाणपत्रामुळे ही बदली प्रक्रिया चुकीची झाली आहे. यासंदर्भात बदली समितीची चौकशी तसेच शासनाची दिशाभूल करणाऱ्या करून बदलीचा चुकीच्या पध्दतीने लाभ घेणाऱ्या शिक्षकांची चौकशी करून दोषींवर कार्यवाही करण्याची मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

# कामात कुचराई करणारे पालिकेचे तीन कर्मचारी निलंबीत

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ जानेवारी**

शहराच्या स्वच्छतेच्या कामात विनापरवानगी गैरहजर राहणे ही बाब अतिशय गंभीर स्वरूपाची असून, ती कार्यालयीन शिस्तीच्या विरोधात आहे. या पार्श्वभूमीवर मुख्याधिकारी अरविंद मुंडे यांनी महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ चे कलम ७९(२) अन्वये तीन (०३) सफाई कर्मचाऱ्यांना दिनांक २१/०१/२०२६ पासून पुढील आदेशापर्यंत नगरपालिका सेवेतून निलंबित करण्याचा निर्णय घेतला आहे.

हिंगोली शहरामध्ये दैनंदिन स्वच्छतेचे काम मनुष्यबळ पुरवठा तसेच कायमस्वरूपी सफाई कर्मचारी यांच्या मार्फत नियमितपणे सुरु आहे. शहरातील स्वच्छता व्यवस्था सुरळीत राहावी यासाठी नगराध्यक्षा सौ रेखा श्रीराम बांगर यांच्या अध्यक्षतेखाली दि १६ जानेवारी रोजी स्वच्छता विभागातील सर्व कर्मचारी व सफाई कामगारांची संयुक्त बैठक घेण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये सर्व सफाई कर्मचारी व कामगारांना नियमितपणे कामावर हजर राहून शहर स्वच्छतेचे काम जबाबदारीने पार पाडण्याच्या स्पष्ट सूचना दिलेल्या होत्या. तथापि, त्यानंतरही काही सफाई कर्मचारी विनापूर्वपरवानगी परस्पर शहर स्वच्छतेच्या कामावर गैरहजर राहत असल्याचे निदर्शनास आले. यामुळे दैनंदिन शहर स्वच्छतेच्या कामकाजात अडथळे निर्माण होत असून, कार्यालयीन शिस्तीचा भंग होत आहे. याबाबत संबंधित सफाई कर्मचाऱ्यांना यापूर्वी अनेक वेळा कारणे दाखवा नोटीस देण्यात आल्या होत्या. मात्र, सदर नोटीसांना कोणतेही समाधानकारक उत्तर न देता संबंधित कर्मचारी दीर्घकाळ गैरहजर राहिले.

सध्या हिंगोली नगरपरिषदेमध्ये नगराध्यक्ष तसेच सर्व नवनिर्वाचित सदस्य कार्यरत झाल्याने स्वच्छता विभागाच्या जबाबदाऱ्या अधिक वाढलेल्या आहेत. हिंगोली शहरातील स्वच्छता व्यवस्था अधिक प्रभावी, शिस्तबद्ध व नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने सुचारू राहावी, यासाठी नगरपरिषद प्रशासन कटिबद्ध असून, यापुढेही कार्यालयीन शिस्तीचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कठोर कार्यवाही करण्यात येईल असा इशारा मुख्याधिकारी यांनी दिला आहे.

# भारतीय संविधान विचार जागर स्पर्धेला शिरड शहापूरात प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा**
**औंढा नागनाथ, २३ जानेवारी**

संविधानाची जाण समृद्ध राष्ट्र निर्माण करते या प्रेरणादायी भावनेतून यशवंत बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, शिरड शहापूर यांच्या वतीने शिरड शहापूर व परिसरातील शाळांमध्ये भारतीय संविधान या विषयावर प्रश्नमंजुषा स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

ही स्पर्धा शिरड शहापूर जिल्हा परिषद प्रशाला माध्यमिक शाळा, जिल्हा परिषद उर्दू माध्यमिक शाळा, शांती विद्यामंदिर माध्यमिक शाळा, काठोडा तांडा, शेंदूरसना व शिरला येथील जिल्हा परिषद शाळा येथे उत्साहात पार पडली. संविधानाबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती व्हावी, लोकशाही मूल्यांची ओळख व्हावी आणि नागरिकत्वाची जाणीव वृद्धिंगत व्हावी, या उद्देशाने ही स्पर्धा घेण्यात आली. संस्थेचे अध्यक्ष अनिल कांबळे यांनी प्रत्येक शाळेस भेट देत विद्यार्थ्यांशी संवाद साधला व स्पर्धेला शुभेच्छा दिल्या. या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा भरघोस प्रतिसाद लाभला असून एकूण ११०० विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग नोंदविला.

हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये संविधानिक मूल्यांची रुजवण करणारा ठरेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. संस्थेचे स्वयंसेवक आनंद ढेंबरे, शामसुंदर ठोंबरे, विकी सूर्यतळ, यश राठोड, दीपक सूर्यतळ, गजानन बिचेवार, चक्रवर्ती जगताप, राजू मुकाडे, यशवंत कांबळे, लक्ष्मण मोगल यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोलाचे योगदान दिले.

# मत्स्य व्यवसाय विभागाकडून मत्स्यबीज वाटपास सुरूवात, लाभार्थ्यांची गर्दी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ जानेवारी**

जिल्ह्यातील मत्स्यपालनाला चालना देण्यासाठी मत्स्य व्यवसाय विभाग, हिंगोलीच्या वतीने मत्स्यबीज वाटपाची प्रक्रिया उत्साहात सुरू झाली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी जिल्ह्यातील विविध तालुक्यांमधून आलेल्या मत्स्योद्योजकांनी आणि शेतकरी बांधवांनी कार्यालयामध्ये मोठी गर्दी केली आहे.

मत्स्यबीज वाटप प्रक्रियेत पारदर्शकता राहावी आणि गरजू लाभार्थ्यांपर्यंत लाभ पोहोचावा, यासाठी विभागाने काही महत्त्वाच्या कागदपत्रांची अट घातली आहे. लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह कार्यालयात उपस्थित राहून आपले मत्स्यबीज घेऊन जावे, असे आवाहन मत्स्य व्यवसाय कार्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे. कागदपत्रांमध्ये सातबारा (७/१२) उतारा व ८–अ चा उतारा, आधार कार्ड व बँक पासबुकची छायांकित प्रत, तलाव किंवा शेततळे भाडेतत्त्वावर असल्यास त्याचे करारपत्र, मत्स्य व्यवसाय सहकारी संस्थेचे सभासद असल्यास त्याचे प्रमाणपत्र, पासपोर्ट आकाराचे फोटो यांचा समावेश आहे. योग्य वेळेत मत्स्यबीज मिळाल्यास उत्पादनात वाढ होते, ही बाब लक्षात घेऊन मत्स्य विभागाने ही प्रक्रिया गतिमान केली आहे. कार्यालयाच्या परिसरात सध्या अर्ज भरणे आणि बीज संकलित करण्यासाठी लाभार्थ्यांची लगबग पाहायला मिळत आहे. पात्र लाभार्थ्यांनी गर्दीमध्ये गोंधळ न करता, सर्व आवश्यक कागदपत्रांच्या फाईलसह कार्यालयात संपर्क साधावा. तांत्रिक बाबी पूर्ण करून त्वरित मत्स्यबीज ताब्यात घ्यावे, जेणेकरून पुढील संगोपन प्रक्रियेत अडथळा येणार नाही.

# महानगर किर्तन दरम्यान घरासमोर रंगीबेरंगी फुलं, रांगोळींनी सजावट करून सहभाग नोंदवावा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २३ जानेवारी-**

हिंद-दी-चादर श्री गुरू तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम वर्षानिमीत्त श्री गुरूग्रंथ साहीब नगर किर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर महानगर किर्तनास शनिवार २४ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ८ वा. गुरूव्दारा गेट नं १ पासून गुरूव्दारा चौक-महाविर चौक- वजिराबाद मार्केट येथून वजिराबाद चौक-तिरंगा चौक-रामसेतू दादरा-रविनगर-नागार्जून पब्लिक स्कूल-मामा चौक या मार्गाने मोदी मैदान मुख्य कार्यक्रम स्थळी पोहचणार आहे.

या मार्गातील सर्व रहिवाशी यांनी या महानगर किर्तनादरम्यान आपण आपल्या घरासमोर, दुकानासमोर रंगीबेरंगी फुलांनी अथवा रांगोळीनी संपूर्ण रस्त्याच्या बाजूने सजावट करावी. तसेच आपल्या घरावर,




दुकानावर विद्युत रोशनाई तसेच दिवे लावून पालखीचे स्वागत करून भव्य महानगर किर्तनात सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

**५० पेशन्ट ट्रान्सफर शीट्सचे वितरण**

शहरात दि. २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी 'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास केंद्रीय मंत्री, विविध राज्यांचे मुख्यमंत्री, मंत्री, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांच्यासह देश-विदेशातून लाखो भाविक उपस्थित राहणार आहेत. या पार्श्वभूमीवर कार्यक्रमाची पूर्वतयारी व सज्जता युद्धपातळीवर सुरू आहे.

लाखो भाविकांच्या उपस्थितीमुळे आपत्कालीन परिस्थितीत वैद्यकीय व्यवस्थेची तत्काळ सुविधा उपलब्ध राहावी, या दृष्टीने जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय पेरके यांनी जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड राहुल कर्डिले यांच्याकडे ५० पेशन्ट ट्रान्सफर शीट्स (स्ट्रेचर) उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. या मागणीस जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ मान्यता देत आज दि. २३ जानेवारी २०२६ रोजी जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयास त्यांच्या हस्ते सदर साहित्य वितरीत केले.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण किरण अंबेकर, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी किशोर कु-हे, महसूल सहायक बारकुजी मोरे, गौरव तिवारी (डीडीएमएस) तसेच जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

ही ५० पेशन्ट ट्रान्सफर शीट्स आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना कार्यक्रमस्थळावरून मुख्य रस्त्यापर्यंत, रुग्णवाहिकेपर्यंत व रुग्णालयापर्यंत सुरक्षितपणे पोहोचविण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहेत. 'हिंद दी चादर' या भव्य सोहळ्यासह नांदेड शहर व जिल्ह्यात होणाऱ्या इतर मोठ्या कार्यक्रमांदरम्यान तसेच भविष्यातील आपत्कालीन परिस्थितीतही या साहित्याचा कायमस्वरूपी उपयोग होणार आहे.

**सर्व शैक्षणिक संस्थांना २४ जानेवारी रोजी सुट्टी जाहीर**

कार्यक्रमासाठी नांदेड जिल्ह्यासह राज्यातील १२ जिल्हे तसेच देशातील विविध राज्यांतून सुमारे ८ ते १० लाख भाविक उपस्थित राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे कार्यक्रमाच्या कालावधीत शहर व शहरालगतच्या ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होण्याची शक्यता असून, कोणत्याही अनुचित घटना घडू नयेत तसेच आपत्कालीन परिस्थितीचा शालेय विद्यार्थ्यांवर परिणाम होऊ नये, या अनुषंगाने प्रतिबंधात्मक उपाययोजना आवश्यक ठरल्या आहेत.

त्या पार्श्वभूमीवर नांदेड तालुका हद्दीतील सर्व अंगणवाडी, शासकीय व खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळा, जिल्हा परिषद शाळा, महानगरपालिका शाळा, अनुदानित व विनाअनुदानित शाळा, सर्व आश्रमशाळा, महाविद्यालये, खाजगी शिकवणी तसेच आयुक्त व्यवसाय व प्रशिक्षण केंद्रांतर्गत असलेल्या सर्व शैक्षणिक संस्थांना २४ जानेवारी २०२६ (शनिवार) रोजी सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

तथापि, ज्या ठिकाणी परीक्षा सुरू आहेत त्या परीक्षा नियोजित वेळापत्रकानुसार नियमितपणे सुरू राहतील. तसेच दि. २४ जानेवारी २०२६ रोजी जाहीर करण्यात आलेली सुट्टी पुढील शालेय व महाविद्यालयीन कामकाजात अर्धा दिवस वाढवून भरून काढण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. हे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष राहुल कर्डिले यांनी निर्गमित केला आहे.

# नामस्मरण सोहळ्यातून दत्तभक्ती, सेवा आणि पर्यावरण संवर्धनाचा आमृतकुंडावर त्रिवेणी संगम!

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. २३ जानेवारी-**

मनात भगवंताची प्रतिमा तयार करणे आणि त्या रुपाशी समरस होऊन दोषमुक्त होणे!' या उद्देशाने माहूरच्या दत्तगड परिसरातील अमृतकुंड येथे दत्तभक्तांच्या उपस्थितीत दिनांक २० ते २२ जानेवारी २०२६ दरम्यान आयोजित करण्यात आलेला तीन दिवसीय नामस्मरण सोहळा मोठ्या भक्तिमय वातावरणात व उत्साहात संपन्न झाला.

या तीन दिवसीय कार्यक्रमाची सुरुवात दररोज सकाळी ६ ते ९ या वेळेत नामस्मरणाने करण्यात येत होती. त्यानंतर ९ ते १० या वेळेत दत्तनामावर आधारित प्रवचन, तर सकाळी १० नंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. दुपारी ३ ते ५ या वेळेत दत्तप्रभूच्या नामाची पोथी वाचन, तसेच सायंकाळी ६ ते ९ या वेळेत पुन्हा नामस्मरण आणि रात्री ९ वाजता कीर्तन असे भक्तिमय कार्यक्रम पार पडले.

ईश्वराचे, सद्गुरूंचे किंवा मंत्राचे नाम सतत मनात किंवा वाणीने उच्चारणे म्हणजेच नामस्मरण भक्ती होय. हा सोहळा मनाला शांती, भक्ती आणि एकाग्रता मिळवून देणारा आहे. कलियुगात भगवंताचे नाव घेणे हाच उद्धाराचा सर्वात सोपा मार्ग मानला जातो, ज्यामुळे मनातील दु:खाचा दगड



वितळून जातो, असा विश्वास भक्तांमध्ये मानला जातो. यामुळे मनाची एकाग्रता वाढते, ताणतणाव कमी होतो, आणि मनाला शांती मिळते. हे मोक्षाचे साधन मानले जाते. याच उद्देशाने अमृतकुंड येथे आयोजित या तीन दिवसीय नामस्मरण सोहळ्यामध्ये अनेक भक्तांनी एकत्र येऊन ईश्वराचा नामजागर केला.

या तीन दिवसीय धार्मिक कार्यक्रमासोबतच विविध सामाजिक उपक्रमांचाही समावेश करण्यात आला होता. यामध्ये वनराई बंधारे उभारणी, वृक्षारोपण, तसेच अमृतकुंड परिसराची स्वच्छता करण्यात आली. धार्मिकतेसोबतच पर्यावरण व सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेशही या उपक्रमांतून देण्यात आला.

कार्यक्रमाची सांगता पुरणपोळी व आंब्याच्या रसाच्या महाप्रसादाने करण्यात आली. अमृतकुंड हे दत्त महाराजांचे चरणस्पर्श झालेलं पवित्र कुंड असून येथे साधना केल्यास विशेष आध्यात्मिक अनुभूती मिळते, असे मानले जाते. राहायचं असेल तर यक्ष-निशब्द बिंदू साक्ष ठेवून, ओम बिंदूवर लक्ष केंद्रित केल्यासच दत्तानंद प्राप्त होतो, असा संदेश यावेळी देण्यात आला. कीर्तनातून राष्ट्रसंत साईनाथ महाराजांनी आपले विचार मांडताना, भक्ती निष्काम असावी. मागणे एकच असावे'तुझा विसर कधीही पडू नये', असा भावनिक संदेश भाविकांना दिला.

या कार्यक्रमाचे आयोजन जवाहरलाल जैस्वाल यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. कार्यक्रमास आयोजकांच्या पत्नी सौ. कांचन जवाहरलाल जैस्वाल, भाऊ पाटील, संभाजीनगर विभाग संघचालक बबनराव जमाडे, महागाव नगराध्यक्ष दिलीपराव कोपरकर, तंटामुक्त समिती अध्यक्ष निळू पाटील, नथ्थूपाटील करंजखेड यांच्यासह परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बारडमध्ये गणेश जन्मोत्सावा निमित्त भाविकांसाठी भाजी भाकरीचा महाप्रसाद

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. २३ जानेवारी-**

मुदखेड तालुक्यातील बारड येथील माळ्याच्या मळ्यातील गणपती ग्रामस्थांचे श्रद्धा स्थान बनले असून गणेश जन्मोत्सवानिमित्त भाविकांसाठी भाजी भाकरीचा महाप्रसाद वाटप करण्यात आला असून ओम ग गणपतये नमः च्या मंत्रात भाविकांनी मनोभावे महापूजा केली.

गावालगत माळ्याच्या मळ्यात पुरातन काळातील श्री गणेश मंदिर आहे . या मंदिराचा ग्रामस्थांच्या पुढाकारातून जिरनो उद्धार करण्यात आला आहे . दर चतुर्थीला पंच क्रोषीतील भक्तगण मोठ्या भक्ती भावे दर्शनासाठी येत असतात . या मंदिराची देखभाल कोरबनवाड परिवार यांच्याकडे आहे . निसर्गरम्य परिसरात भव्य मंदिर उभारण्यात आले आहे . विघ्नहर्ता संस्थेच्या वतीने दर चतुर्थीला भक्तांसाठी



महाप्रसाद ठेवला जातो . यानिमित्त भजनी मंडळ महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात वारकरी संप्रदायातील भक्तगण सहभागी झाले होते.

श्री गणेश मंदिरात विघ्नहर्ता संस्थेचे विश्वस्त गंगाधर कोरबनवाड यांच्या हस्ते दूध अभिषेक सामूहिक महापूजा करण्यात आली . या पूजेत कचरू कोरबनवाड, मारुती कोरबनवाड , रामेश्वर कोरबनवाड, मधुकर कोरबनवाड , पुंडलिक कोरबनवाड, सिताराम कोरबनवाड, यांच्या सहकुटुंब परिवाराने मनोभावी पूजा केली . श्री विघ्नहर्ता मंदिराची कोरबनवाड परिवाराने साफसफाई करून फुलांची सजावट केली होती . यावेळी श्री गणेशाचा नामजप करण्यात आला . पंचक्रोषितील गणेश भक्तांसाठी भाजी भाकरीचा महाप्रसाद ठेवण्यात आला असून मोठ्या संख्येत भक्तांनी लाभ घेतले. गणेश महोत्सवासाठी सुरेश देशमुख , संजय मालीपाटील , संदीप कोरबनवाड , मुकुंद कोरबनवाड, विलास कोरबनवाड, ज्ञानेश्वर कोरबनवाड , सुनील कोरबनवाड, सखाराम कोरबनवाड, राहुल कोरबनवाड,परमेश्वर कोरबनवाड ,दिलीप कोरबनवाड,अनिल कोरबनवाड, अंकुश कोरबनवाड, संतोष कोरबनवाड, साहिल कोरबनवाड, बाळू कोरबनवाड, दत्ता कोरबनवाड , यांच्यासह ग्रामस्थांनी पुढाकार घेतला होता.

## किनवट येथे स्व.बाळासाहेब ठाकरे यांचा जन्मशताब्दीवर्ष उत्साहात

**किनवट** - हिंदुरुदयसम्राट शिवसेनाप्रमुख स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांचा जन्मशताब्दी सोहळा किनवट शहरात उत्साहात साजरा करण्यात आला असुन या निमित्त छत्रपती शिवाजी महाराज चौकात ध्वजारोहन करून मिठाईचे वाटप करण्यात आले. यावेळी जय भवानी जय शिवाजीच्या घोषणानी परिसर दाणाणून गेला होता. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे किनवट शहर व तालुक्याच्यावतीने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. प्रारंभी स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त युवानेते करण एंड्रलवार यांच्या हस्ते भगव्या ध्वजाचे ध्वजारोहन करण्यात आले असुन छत्रपती शिवाजी महाराज आणि स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेलाउपस्थितानी हार अर्पण करून अभिवादन केले. हिंदुरुदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे यांचे हे जन्मशताब्दी वर्षे असल्यामुळे शिवसैनिकांनी मिठाई वाटप करून आनंदोत्सव साजरा केला. यावेळी जय भवानी जय शिवाजी..! व हिंदुरुदयसम्राट बाळासाहेब ठाकरे अमर रहे.. अमर रहे..! अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. या कार्यक्रमास शिवसेना तालुकाप्रमुख मारोती दिवसे पाटील, माजी तालुकाप्रमुख राम पाटील कोरडे,शहर प्रमुख प्रशांत कोरडे, युवासेना तालुका प्रमुख अतुल दर्शनवाड,संतोष यलचलवार,प्रभू कोल्हे, राकेश गंनोजवार,प्रमोद जाधव, संतोष तक्कलवार, सुनील तक्कलवार,महेश भंडारे, शिवा तिरमनवार,निशांत बोलेनवार, विकास गंनोजीवार, अनंत क्यतमवार, राजू जोशी, राजू सातूरवार,प्रवीण रेड्डी, संतोष कटकमवार, गोलू ताडपेल्लीवार,मोहक पांचाळ, गजानन सूर्यवंशी, संजय मेश्राम, मुबारक भाई, श्याम कोरडे पाटील यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**गोकुंदा येथील ठाकरे चौकात अभिवादन**

किनवटपासून जवळच असलेल्या गोकुंदा येथील स्व बाळासाहेब ठाकरे चौकातही शेकडो शिवसैनिकांनी स्व बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन केले. युवासेना तालुकाप्रमुख अतुल दर्शनवाड व संजय मेश्राम यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

## क्रीडा भारतीच्या पुढाकाराने कबड्डी स्पर्धेस उत्स्फूर्त प्रतिसाद

**नवीन नांदेड** - क्रीडा भारती, देवगिरी प्रांत यांच्या पुढाकाराने दिनांक २३जानेवारी रोजी सकाळी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथील क्रीडा संकुल मैदानावर कबड्डी क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या खेळाद्वारे सध्या सोशल मीडियाचा विद्यार्थ्यांच्या डोक्यावर झालेला परिणाम काहीसा दूर होऊन विद्यार्थ्यांचे लक्ष स्वतः च्या करिअरकडे लागले पाहिजे हा मुख्य उद्देश या स्पर्धेचा होता. ही स्पर्धा डॉ.सिंकुकुमार सिंह त्यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजत करण्यात आली होती. या स्पर्धेस प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथील क्रीडा संकुलाच्या मैदानावर नांदेड शहरातील बरेच विद्यार्थी पोलीस भरती सारख्या अन्य भरतीची तयारी करण्यासाठी या ठिकाणी मुली व मुले तयारी करण्यासाठी रोज येत असतात ही बाब लक्षात घेऊन डॉ. सिंकूकुमार सिंह यांनी येथील मुलांचे व मुलींचे संघ तयार करून या स्पर्धेत पुरुष विरुद्ध पुरुष, महिला विरुद्ध महिला तसेच महिला विरुद्ध पुरुष अशा गटांमध्ये थरारक सामने खेळविण्यात आले. एकूण सहा संघांनी सहभाग घेतला असून त्यामध्ये दोन महिला संघ व चार पुरुष संघांचा समावेश होता. सर्व खेळाडूंनी उत्कृष्ट क्रीडा कौशल्य, शिस्तबद्ध खेळ आणि खऱ्या क्रीडाभावनेचे दर्शन घडविले.या स्पर्धेचे उद्घाटन डॉ. चंद्रकांत कराड, प्राचार्य, शारीरिक शिक्षण महाविद्यालय, उदगीर यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. ही स्पर्धा क्रीडा भारती, देवगिरी प्रांतचे उपाध्यक्ष डॉ. सिंकुकुमार सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडली. पंच म्हणून भीमा केंगले, डॉ. धनंजय शिर्साठ, डॉ. परस यादव, डॉ. कुलजीतसिंह, आकाश डगलस, पूनम जाधव, सुभांगी व सोहन सोनकांबळे यांनी निष्पक्षता व शिस्त राखून आपली भूमिका बजावली.

# पराभवाचा वचपा काढण्यासाठी निमंत्रण पत्रिकेतून उपाध्यक्षांना डावलले

## कार्यालयीन अधीक्षकांचा प्रताप ?

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २३ जानेवारी-**

हदगाव नगरपरिषदेत शिवसेना- काँग्रेस युतीचे बहुमत आहे. परंतु बहुमताने आलेल्या उपाध्यक्षांनाच प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रम पत्रिकेतून डावलण्यात आले असून कार्यालय अधीक्षकांनी पराभवाचा वचपा काढला की काय? असा प्रश्न जनता उपस्थित करत आहे.

दि. २६ जानेवारी रोजी हदगाव नगर परिषदेच्या वतीने प्रजासत्ताक दिन साजरा होत आहे. नगराध्यक्षा रोहिणीताई वानखेडे यांच्या हस्ते मुख्य ध्वजारोहण होत असून या अनुषंगाने कार्यक्रम पत्रिका काढण्यात आली आहे. परंतु या पत्रिकेवर कार्यालय अधीक्षकांनी उपाध्यक्ष सुनंदा भोळे यांचे नाव टाकले नाही.हदगाव नगर परिषदेत शिवसेना (उबाठा) सात, काँग्रेस पाच असे एकूण १२ सदस्य तर नगराध्यक्ष एक, शिवसेना शिंदे गट पाच, भाजपा असे एकूण नऊ सदस्य आहेत. शिवसेना-काँग्रेसचे बहुमत असताना त्यांचा उपाध्यक्ष असताना कार्यालयीन अधीक्षकांनी



उपाध्यक्षांना निमंत्रण पत्रिकेतून डावल्याने आश्चर्य व्यक्त होत असून याप्रकरणी जिल्हाधिकाऱ्याकडे तक्रार करण्यात येणार असल्याची माहिती आहे.

दरम्यान कार्यालयीन अधीक्षकांनी प्रभारी मुख्याधिकारी यांची परवानगी न घेता हा प्रताप केला असून कार्यालय अधीक्षकांच्या मातोश्रींनी शिवसेना शिंदे गटाकडून हदगाव नगर परिषदेसाठी निवडणूक लढवली होती. या निवडणुकीत त्यांचा दारुण पराभव झाला. या पराभवाच्या मानसिकतेतून त्यांनी हा प्रकार केला असावा अशी चर्चा हदगाव शहरात ऐकावयास मिळत आहे.

# अर्जापुर शिवारातील जुगार अड्ड्यावर कुंडलवाडी पोलीसांची धाड ; ५ आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि. २३ जानेवारी-**

कुंडलवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या अर्जापुर शिवारातील अर्जापुर ते कोंडलापुर रोड लगत पाणंद रस्त्यावर लपुन-छपुन सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर कुंडलवाडी पोलिसांनी दि. २२ जानेवारी २०२६ रोजी सांयकाळी ६:३० वाजेच्या सुमारास धाड टाकत नगदी २३ हजार ६०० रुपये व ८० हजार रुपयांची मोटारसायकल व जुगाराच्या साहित्य असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी ५ आरोपीविरुद्ध कुंडलवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कुंडलवाडी पोलीसांना अर्जापुर शिवारातील अर्जापुर ते कोंडलापुर रोड लगत पाणंद रस्त्यावर लपुन-छपुन जुगार अड्डा सुरू असल्याचे गुप्त माहिती मिळाल्यावरून सहायक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे, पोलीस उपनिरीक्षक गजेंद्र मांजरमकर, सहायक पोलिस उपनिरीक्षक गफुर शेख, पोलीस कर्मचारी आनंद बोडके, रघुवीरसिंह चौहाण, व्यंकट घोंगडे, ज्ञानेश्वर डाकेवाड, रामेश्वर पाटील यांनी अर्जापुर शिवारातील अर्जापुर ते कोंडलापुर रोड लगत पाणंद रस्त्यावरील अड्ड्यावर दि. २२ जानेवारी २०२६ रोजी सांयकाळी ६:३० वाजता धाड मारली.

ावेळी रामचंद्र मोगलाजी जकले (रा. सुतार गल्ली, बिलोली), विनोद बाबुराव वाघमारे (रा. रविंद्र नगर, बिलोली), शेख आसिफ शेख अहेमद (देशमुख नगर, बिलोली), संतोष मनोहर नुग्रावार (रा. लोहार गल्ली, बिलोली) आणि राजु बसलिंग अप्पा स्वामी (रा. छोटी गल्ली, बिलोली) हे ५ जण



अंदर-बाहर नावाचा जुगार पत्ते पैसे लावुन खेळत व खेळवित असताना कुंडलवाडी पोलिसांनी पकडले. या धाडीत नगदी २३ हजार ६०० रुपये व ८० हजार रुपयांची मोटारसायकल व जुगाराचे साहित्य असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

व सहायक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे यांच्या फिर्यादीवरून रामचंद्र मोगलाजी जकले, विनोद बाबुराव वाघमारे, शेख आसिफ शेख अहेमद, संतोष मनोहर नुग्रावार, राजु बसलिंग अप्पा स्वामी या ५ आरोपीविरुद्ध गु.र.नं.५/२०२६, कलम १२ (अ), महाराष्ट्र जुगार कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहायक पोलिस उपनिरीक्षक गफुर शेख हे करीत आहेत.

सदरील कारवाई पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार, अप्पर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी दशरथ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# जात्यावरच्या ओव्यांतून मराठी कवितेचा श्वास आजही जिवंत : नारायण पूरी

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. २३ जानेवारी-**

डिजिटल युगात मोबाईल, इंटरनेट व सोशल मीडियामुळे संवाद सुलभ झाला असला, तरी मोबाईलचा अतिरेकी वापर तरुण पिढीसमोर अनेक सामाजिक व मानसिक समस्या उभ्या करीत आहे. त्यामुळे युवकांनी मोबाईलचा सकारात्मक आणि योग्य वापर करणे अत्यावश्यक आहे, असे स्पष्ट मत महाराष्ट्रातील प्रसिद्ध कवी व लोकगायक नारायण पूरी यांनी व्यक्त केले. आज स्त्रीयांच्या आयुष्यातून जाते निघून गेले, परंतु जात्यावरच्या ओव्यांनी मात्र मराठी कवितेचा श्वास जिवंत ठेवला आहे. जात्याभोवती गायले जाणाऱ्या ओव्यांचा मराठी साहित्याला समृद्ध केले आहे, असे वक्तव्य सुप्रसिद्ध कवी नारायण पूरी यांनी केले आहे. ते देगलूर महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते.

महाराष्ट्राला संत, थोर साहित्यिक व कवींचा समृद्ध वारसा लाभलेला असून,



या मातीतील महिलांनी जात्यावरच्या ओव्या गाऊन मराठी साहित्य वैभवसंपन्न केले आहे. आई, आत्या, काकू, आजी यांच्याकडून जाते फिरवताना गायल्या जाणाऱ्या ओव्यांमधून जीवनानुभव, संस्कृती व संवेदना व्यक्त होत असत; मात्र आज या ओव्या हळूहळू लुप्त होत चालल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. मराठी लोकसाहित्य जतन करण्यासाठी नव्या पिढीने पुढाकार घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

या उद्घाटन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेम्बरेकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष जनार्धन चिद्रावार, सचिव डॉ. कर्मवीर उनग्रतवार, सहसचिव राजकुमार महाजन उपस्थित होते. तसेच संस्थेच्या कार्यकारिणी मंडळाचे सदस्य सूर्यकांत नारलावार, देवेंद्र बालाजीराव मोतेवार, गंगाधरराव जोशी, चंद्रकांत नारलावार, गुरुराज चिद्रावार, रविंद्र अप्पा द्याडे, विजय उनग्रतवार यांच्यासह महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ उपस्थित होते.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रा. सोमनाथ पवार व प्रकाश सोनकांबळे यांनी स्वागतगीत सादर करून वातावरण भारावून टाकले. प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. मोहन खताळ यांनी महाविद्यालयाच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या शैक्षणिक व सामाजिक वाटचालीचा आढावा घेतला. स्नेहसंमेलनाचे प्रभारी प्रा. डॉ. संजय पाटील यांनी शैक्षणिक, क्रीडाविषयक व संशोधनात्मक कार्याचा सविस्तर अहवाल वाचन केला. यावेळी गंगाधरराव जोशी यांनी मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय समारोपात संस्थेचे सचिव डॉ. कर्मवीर उनग्रतवार यांनी वार्षिक स्नेहसंमेलन हा प्रत्येक तरुण-तरुणीच्या आयुष्यातील अविस्मरणीय काळ असून, कला, क्रीडा, साहित्य व सांस्कृतिक उपक्रमांतून सुप्त गुणांना वाव मिळतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी मिळणाऱ्या प्रत्येक संधीचा पुरेपूर लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, डॉ. व्ही. जी. शेरीकर, पर्यवेक्षक संग्राम पाटील, कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी, सर्व प्राध्यापक, कर्मचारी तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. राजेश्वर दुडूकनाळे यांनी केले तर आभार प्रा. संग्राम पाटील यांनी मानले.

**आनंदनगरी महोत्सवातून ६५ हजार रुपयांची विक्रमी उलाढाल**

दरम्यान सकाळी १० वाजता देगलूर महाविद्यालयात 'आनंदनगरी महोत्सवाचे' उद्घाटन विभागीय शिक्षण सहाय्यक उपसंचालक (लातूर) श्री. पंचगले यांच्या हस्ते करण्यात आले. या महोत्सवात तब्बल ३५ विद्यार्थी-विद्यार्थिनींनी विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल्स उभारले होते. गुलाबजामून, जिलेबी, पावभाजी, पाणीपुरी, समोसा, कचोरी, पेस्ट्री, लाडू, इडली, दहीवडा, मेंदूवडा, खिचडी, चाट प्रकार, फळे व विविध पदार्थांना मोठी मागणी होती. या महोत्सवातून सुमारे ६५ हजार रुपयांची विक्रमी विक्री झाली. स्टॉलवर खरेदीसाठी प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांची मोठी गर्दी झाली होती. या उपक्रमाला उदंड प्रतिसाद मिळाला. या आनंदनगरी महोत्सवाचे यशस्वी संयोजन डॉ. एस. व्ही. येरावार यांनी केले.